
• पुणे, गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 274 • वर्ष ३ रे, अंक २७४ • किंमत रु ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



## उदे गं अंबे उदे भवानी...

**साने गुरुजी तरुण मंडळाने साकारले तुळजाभवानीचे देवीचे मंदिर**

**भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या नेतृत्वाखाली साने गुरुजी गणेशोत्सव मंडळाने यंदा तुळजापूर येथील तुळजाभवानी देवी मंदिराच्या प्रतिकृती देखाव्याची उभारणी केली आहे . राज्यभरातून हा देखावा पाहण्यासाठी गर्दी होत आहे**

### गौरी पूजनाच्या मुहूर्तावर पुणेकरांसाठी खुशखबर

# हिंजवडीत मायक्रोसॉफ्टची ५०० कोटीची गुंतवणूक

## २० लाख लोकांना मिळणार रोजगार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे ,:** आज घरोघरी महालक्ष्मीच्या पूजनाचा सोहळा साजरा केला जात असताना पुणेकरांच्या रोजगारासाठी एक महत्त्वपूर्ण घटना घडली आहे पुण्याच्या आयटी हब म्हणून ओळखले जाणारा हिंजवडी मध्ये मायक्रोसॉफ्टने अतिरिक्त ५०० कोटीचे गुंतवणूक केली असून आपल्या प्लॅनच्या सलगची १६ एकर हून अधिकचे जमीन खरेदी केली आहे या ठिकाणी नवा उद्योग प्रस्तावित असून त्यामधून सुमारे २० लाख लोकांना रोजगार मिळेल अशी माहिती देण्यात आली आहे.

. मायक्रोसॉफ्टने आपल्या डेटा सेंटरऑपरेशनचा विस्तार करण्याच्या दृष्टीने तसेच भारतात आपली स्थिती मजबूत करण्याच्या मोठ्या योजनेचा एक भाग म्हणून हे पाऊल उचलले आहे. पुणेकरांना याचा थेट लाभ मिळणार आहे. अलीकडच्या काही वर्षांत मायक्रोसॉफ्टने भारतातील व्यावसायिक रिअल इस्टेटमध्ये आपली गुंतवणूक वाढवली आहे. डेटा सेंटर्स, विकास सुविधांवर तिने लक्ष केंद्रित केले आहे. एका अहवालानुसार, मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशन (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडने पुण्यातील हिंजवडी येथे ६६,४१४.५ चौरस मीटर (१६.४ एकर) जमीन संपादित केली. ऑगस्टमध्ये पूर्ण झालेल्या या व्यवहारात इंडो ग्लोबल इन्फोटेक सिटी एलएलपीकडून जमीन खरेदी करण्यात आली असून, कंपनीने मुद्रांक शुल्कापोटी ३१.१८ कोटी रुपये आणि नोंदणी शुल्क म्हणून ३० हजार रुपये भरले.



याशिवाय मायक्रोसॉफ्टने २०२२ मध्ये पिंपरी-चिंचवडमधील २५ एकर जमीन ३२८ कोटी रुपयांना खरेदी केली, तर हैदराबादमधील ४८ एकर जमीन २६७ कोटी रुपयांना खरेदी केली. हे अधिग्रहण भारतात, विशेषतः डेटा सेंटर क्षेत्रात आपला विस्तार करण्याच्या कंपनीच्या धोरणाशी सुसंगत आहे. मायक्रोसॉफ्टच्या नेटवर्कमध्ये पुणे, मुंबई आणि चेन्नई सारख्या महत्त्वाच्या बाजारपेठांचा समावेश आहे.

सध्या मायक्रोसॉफ्ट भारतामध्ये २३,००० हून अधिक कर्मचारी कार्यरत असून बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, मुंबई आणि पुणे या शहरांमध्ये कंपनीची

## » At a Glance

### लिव्ह इनमधील महिलेची हत्या

**वाकड :** लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये असलेल्या एका महिलेची तिच्या जोडीदाराने हत्या केली. पतीने तिचा मृतदेह रिक्षातून नेला आणि काळेवाडी स्मशानभूमीजवळ असलेल्या तिच्या आईच्या घरासमोर ठेवला. ही घटना आज सकाळी » पान ७ वर

### दिल्लीसह उत्तर भारतात भूकंप

**नवी दिल्ली:** दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतातील अनेक भागात आज ( दि. ११ सप्टेंबर) दुपारी भूकंपाचे धक्के जाणवले. पाकिस्तानातील डेरा गाझी खान येथे भूकंपाचा केंद्रबिंदू होता. याची तीव्रता ५.८ रिश्टर स्केल इतकी नोंदली गेली. » पान ७ वर

### कालिंदी एक्स्प्रेस प्रकरणी चौकशी

**कानपूर :** दोन दिवसांपूर्वी कालिंदी एक्स्प्रेस रुळावरून घसरण्याच्या प्रकरणी दोन डझनहून अधिकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. भिवानी-प्रयागराज कालिंदी एक्स्प्रेस येथे » पान ७ वर

### पुणे-नागपूर वंदे भारत ट्रेन

**पुणे :** शहरांतर्गत कनेक्टिव्हिटीला चालना देण्यासाठी, १५ सप्टेंबर रोजी जमशेदपूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू होणाऱ्या १० वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनपैकी पुणे-नागपूर ही एक असेल. रेल्वे अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पहिल्यांदाच एकावेळी १० वंदे भारत ट्रेनचे उद्घाटन होणार आहे. या मार्गावर वंदे भारत सुरू केल्याने, आरक्षणाची गर्दी कमी होईल आणि प्रवासाचा वेळ कमी होईल, असे मानले » पान ७ वर

# फुले की टिळक? वाद रंगणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी लोकमान्य टिळक यांनी शोधून काढली, असे व्यक्तव्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केल्यानंतर, महात्मा फुले की लोकमान्य टिळक असा नवा वाद रंगणार असल्याचे स्पष्ट झाले. रायगडावरील महाराजांची समाधी महात्मा ज्योतिबा फुले यांनीच शोधून काढली हा इतिहास कोणी पुसून काढू शकत नाही, अशा शब्दांत त्यांना महायुती सरकारमधील मंत्र्यांसह विरोधकांनी सुनावले आहे.

मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्यामुळे महायुती सरकारला मोठ्या संकटाला सामोरे जावे लागले असतानाच, आता रायगडावरील समाधीचा वाद उद्भवला आहे.

सरसंघचालक भागवत यांनी नुकतेच पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांची रायगडावरील समाधी लोकमान्य टिळकांनी शोधून काढल्याचे म्हटले होते. त्यांच्या या विधानावरून विरोधकांनी त्यांच्यावर टीका सुरू केली आहे. महायुती सरकारमधील ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनीही त्यांचा दावा खोडून काढला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची रायगडावरची समाधी महात्मा ज्योतिबा फुले यांनी शोधून काढली, हा इतिहास कोणालाही बदलता येणार नाही. त्याचबरोबर शिवजयंती उत्सवदेखील ज्योतिबा फुले यांनीच सुरू केला आहे, असे भुजबळ म्हणाले.

विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही भागवत यांच्या विधानावर संताप व्यक्त केला आहे. १८६९ साली महात्मा फुले रायगडावर गेले होते. त्यावेळी त्यांनी महाराजांच्या समाधीचा शोध घेतला. समाधीला पुष्पहार अर्पण करून ते पुण्याला आले. त्यांनी महाराजांच्या जीवनावर पोवाडा लिहिला आणि या देशातील पहिल्या शिवजयंती उत्सवाला फुले यांनी सुरुवात केली. इतिहासाचा विपर्यास करू नये, खोटा इतिहास लोकांना सांगू नका, असे आवाहन इतिहासाचे अभ्यासक श्रीमंत कोकाटे यांनी केले. मोहन भागवतांच्या विधानावरून शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही संताप व्यक्त केला. ते म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांनी ही समाधी कष्टाने शोधून काढली. त्यांनी छत्रपती शिवरायांची समाधी व्यवस्थित करून घेतली. त्यामुळे आपण जे बोलता, त्याला आम्ही इतिहासाचे विकृतीकरण म्हणतो, असे आव्हाड म्हणाले.



## उधमपूरमध्ये चकमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर:** जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यातील कठुआ- बसंतगड सीमा परिसरात बुधवारी दुपारी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक सुरु झाली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या परिसरात ३ ते ४ दहशतवादी लपले असून त्यांना सुरक्षा दलाच्या जवानांनी घेरले असल्याचे सुत्रांनी सांगितले.

बसंतगड परिसरात दहशतवादी लपले असल्याची माहिती मिळाल्यानंतर, » पान ७ वर

# पुण्यात अडीच हजार सायकलपटुंची भव्य रॅली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोथरूड ते धर्मवीर संभाजी महाराज पुतळा डेक्कन जिमखाना अशी तब्बल अडीच हजार सायकल पटुंची भव्य रॅली आयोजित करून पुणे हे मूळ सायकलींचे शहर असण्याची ओळख पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आरोग्याचे, पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्व जनमानसात रुजविण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.



केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते या रॅलीचे उद्घाटन होणार असून, स्कायडाव्हर पद्मश्री शीतल महाजन व भारतीय क्रिकेटपटू राहुल त्रिपाठी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सायकल वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम गेल्या पाच वर्षांपासून आयोजित केला जात आहे, अशी माहिती संयोजिका, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी दिली.

> पुणे हे सायकलचे शहर म्हणून ओळखले जाते. बहुगुणी अशी सायकल वापरणे आरोग्यासाठी लाभदायक आहे. सायकलप्रेमी पुणेकरांनी याआधीही खूप चांगला प्रतिसाद दिला आहे. यंदाच्या सायकल रॅलीतही अडीच हजारांहून अधिक सायकलस्वारांनी सहभाग नोंदवला आहे. या सायकल रॅलीचा भव्य सोहळा पाहण्यासाठी अधिकाधिक पुणेकरांनी सहभागी व्हावे
>
> **-खासदार मेधा कुलकर्णी**

### महायुतीसमोर आव्हान जागावाटपाचे

# शिंदेंच्या शिवसेनेला हव्यात १०० जागा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीला अवघे काही महिने शिल्लक आहेत. तथापि, महायुतीतील जागावाटपाचा पेच अद्याप सुटलेला नाही. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसकडून याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा नुकतेच महाराष्ट्रात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने १०० जागांची मागणी केली आहे, अशी माहिती आहे. राज्यातील २८८ जागांसाठी नोव्हेंबरमध्ये निवडणूक होण्याची शक्यता आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, शिवसेना १०० ते १०५ जागांवर दावा करत असून, भाजपला १६० जागांवर उमेदवार उभे करायचे आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस ६० ते ८० जागा लढवण्यास इच्छुक आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण जागांची संख्या २८८ आहे. यापूर्वी २०१९ ची विधानसभा निवडणूक भाजप आणि अविभाजित शिवसेनेने एकत्र लढवली होती.

केंद्रीय गृहमंत्री शहा यांच्या दौऱ्यादरम्यान शिवसेनेने १०० पेक्षा जास्त जागा लढवण्याची चर्चा केली आहे. यापूर्वीच्या अविभाजित शिवसेना तसेच लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचे सादरीकरण गृहमंत्री शाह यांना करण्यात आले. युतीला मिळालेली मराठी आणि हिंदुत्ववादी मते अबाधित राहण्यासाठी शिवसेनेने १०० जागा मागितल्या आहेत. शिवसेनेला स्वबळावर फारशी मते » पान ७ वर

## एमपॉक्सचा रुग्ण आढळल्याने सतर्कता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतातील पहिला रुग्ण आढळल्यानंतर राज्याच्या आरोग्य विभागाने सतर्कतेचा विस्तार करत, प्रमुख विमानतळांवर देशांतर्गत प्रवाशांची एमपॉक्ससारखी लक्षणे आढळल्यास त्यांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. पूर्वी केवळ बाधित भागातील आंतरराष्ट्रीय प्रवाशांची तपासणी करणे आवश्यक होते. मात्र, आता देशांतर्गत प्रवाशांचीही तपासणी केली जात आहे.

एका व्यक्तीमध्ये एमपीओक्सचा पहिला रुग्ण आढळल्यानंतर दुसऱ्याच दिवशी हा निर्णय घेण्यात आला. रुग्णाची प्रकृती स्थिर असली, तरी नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केले आहे.

मुंबई, पुणे आणि नागपूर सारख्या महत्त्वाच्या केंद्रांवर विशेष भर देत सर्व विमानतळांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या शहरांमधील रुग्णालयांना विलगीकरण कक्ष तयार करण्याचे आणि त्वचेवर पुरळ, ताप, डोकेदुखी आणि स्नायू दुखणे अशी लक्षणे असलेल्या बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णांवर लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.


## SINHGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY

19/15, Erandawane, Smt. Khilare Marg, Off. Karve Road, Pune-411004
Phone: 020-25431001 E-mail: admissions@sinhgad.edu Web: www.sinhgad.edu

Sinhgad Institutes

## ADMISSIONS OPEN : 2024-25

**All the following institutes are Accredited by NAAC**

Applications are invited from eligible candidates under **the vacant seats against CAP** for admission to **First Year** of full time degree course in B. Arch. in our institutes for the A. Y. 2024-25.

### SINHGAD COLLEGE OF ARCHITECTURE
VADGAON-AMBEGAON (BK), PUNE - 411041

Approved by the Council of Architecture; Recognized by the Government of Maharashtra; Affiliated to Savitribai Phule Pune University

**Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone: 020-24351439**

**B. Arch. ▸ DTE Code: AR 6263**

Principal : Dr. Banani Banerjee [09423582390]

### SMT. KASHIBAI NAVALE COLLEGE OF ARCHITECTURE
VADGAON-AMBEGAON (BK), PUNE - 411041

Approved by the Council of Architecture; Recognized by the Government of Maharashtra; Affiliated to Savitribai Phule Pune University

**Vadgaon-Ambegaon (Bk), Off Sinhgad Road, Pune - 411041 Phone: 020-24351438**

**B. Arch. ▸ DTE Code: AR 6885**

Principal : Dr. Sudhir D. Chavan [09923056961]

**Eligibility:** Passed HSC (Std. 12th) Examination or its equivalent with Physics and Mathematics as compulsory subject along with either Chemistry or Biology or Technical Vocational Subject or Computer Science or Information Technology or Informatics Practices or Engineering Graphics or Business Studies with at least 45% marks (at least 40% marks for candidates from the Reserved Categories, Economically Weaker Section and Person with Disability candidates belonging to Maharashtra State only) in aggregate; or candidate should have passed 10+3 Diploma Examination with Mathematics as compulsory subject with at least 45% marks (at least 40% marks for candidate from the Reserved Categories, Economically Weaker Section and Person with Disability Category belonging to the Maharashtra State only) in aggregate; and also qualified an aptitude test in architecture conducted either by NTA ( i.e., JEE) or NATA conducted by the Council of Architecture; and any other criterion declared by the appropriate authority.

**Admission Procedure:** The Admission Form & Prospectus are available at respective college office on payment of Rs. 1000/-. The duly filled in application form along with testimonials should be submitted in the office of the respective college during working hours. Candidate should directly approach to the **Principal of the College** or **Dy. Registrar (Admissions) - 096234 48939 / 073500 07033**. Admission can be given immediately on payment of full fees.

**Unique Features:** • Excellent Placement Track Record • Well Stocked Library • e-Library & Multimedia • Round the Clock Internet & Wi-Fi Connectivity • Separate Hostels for Boys & Girls with Mess Facility • Play Fields & Gymnasium • On Campus Medical Facility, Banking Facility, Shopping Complex • Students Amenities in the Campus.

**Note:** Sinhgad Technical Education Society has not authorized any person / Agency / Organization / Association / Representative for admissions to the courses conducted by all institutes under Sinhgad Technical Education Society. The candidates are advised to remain in touch with the Dy. Registrar (Admissions) / College Principal / Authorized College Staff only.

*Subject to Pune Jurisdiction Only

**Prof. M. N. Navale**
Founder President


### गणेशोत्सवासाठी दर्शनासाठी आलेल्या पर्यटकांची

# पुणेकर रिक्षावाल्यांकडून लूट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील गणेशोत्सवासाठी येणाऱ्या राज्यभरातील पर्यटकांकडून आवाच्या सव्वा भाडे आकारत पुणेकर रिक्षावाल्यांनी अक्षरशः लूट चालवली आहे. गेल्या दोन दिवसापासून याच्या अनेक तक्रारी प्रशासन , पोलीस, कार्यकर्ते येथील नगरसेवक यांच्याकडे येत आहेत. पुण्यातील गणेशोत्सव हा संपूर्ण देशभराकरिता आकर्षणाचा आणि भक्तीभावाचा विषय आहे. राज्यभरातून अनेक गणेशभक्त गणेशोत्सवाच्या कार्यकाळामध्ये पुण्यातील आकर्षक देखावे तसेच मानाचे गणपती आणि दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी येत असतात. महाराष्ट्रभर येथील गणेशोत्सवाची ख्याती पसरल्यामुळे तसेच टीव्ही youtube चॅनेल आणि अनेक रिव्हर्समधून येथील अतिभव्य देखावे कार्यक्रम संकल्पना याची चर्चा आणि दृकश्राव्य माध्यमातून त्याचा प्रचार प्रसार होत असल्यामुळे राज्यभरातील गणेशभक्त पुण्याकडे आकर्षित होत आहेत




> मनपाच्या मागे टिळक ब्रिजवर रिक्षा उभ्या आहेत त्या दगडूशेठला सोडायला 160 ते दोनशे रुपये सांगत आहेत . कोथरूडला येत नाहीत आणि ऑनलाईन येत नाहीत मी स्वतः अनुभव घेतला आहे
>
> **- शिरीष कुलकर्णी**

परंतु पुण्यामध्ये आल्यानंतर रिक्षावाल्यांचे दर ऐकून गणेशभक्तांना अक्षरशः हैराणी आली आहे पुणे स्टेशन आणि स्वारगेट पासून निघणाऱ्या रिक्षावाल्यांकडून सरसकट 100 ते 250 रुपये सांगितले जात आहेत मीटर खराब आहे गर्दीमध्ये मीटर चालत नाहीत सध्या मीटर बंद आहे असे अनेक कारणे सांगून रिक्षावाला मीटर चालू करत नाही » पान ७ वर #रा

## मोठा अपघात टळला

# मेट्रो ब्रिजचे बॅरीगेट्स पडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** काल सायंकाळी कात्रजच्या भर चौकामध्ये मेट्रोच्या सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामावरील मोठे दोन लोखंडी बॅरिगेट्स भर चौकात खाली पडले सुदैवाने सिग्नल सुरू असल्यामुळे सर्व वाहने चौकाच्या एका बाजूला थांबले होते त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

सध्या पुणे शहरामध्ये ठीक ठिकाणी उड्डाणपुलाची कामे सुरू आहेत. शहरांतर्गत रस्ते उड्डाणपूल आणि मेट्रो अशा तिन्ही स्तरावरती काम सुरू असल्यामुळे बहुतांश ठिकाणी हे रस्त्याचे कामे सुरू असल्याचे दिसते.

अशातच कात्रज चौकामध्ये देखील उड्डाणपूल आणि मेट्रो याचे काम सुरू आहे. अनेकदा ही कामे वेगात एका परिस्थितीमध्ये आणि पुरेशी खबरदारी न घेता होत असल्याची ओरड होत आहे, तथापि काल सायंकाळी आणि वाहतुकीच्या वेळी कात्रज चौकामध्ये घडलेला प्रकार सर्वांचा थरका पुरविणारा होता सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास गरजेच्या वेळी कात्रज चौकामध्ये सुरू असलेल्या पुलाच्या कामावरून दोन भले मोठे लोखंडी बॅरिगेट्स भर चौकात खाली जमिनीवरती कोसळले.

सुदैवाने त्यावेळी सिग्नल चालू असल्यामुळे एकही गाडी चौकात नव्हती सर्व गाड्या कडेला सिग्नल जवळ थांबल्या होत्या.

समोर उभे असलेल्या पोलिसांसमोरच हा प्रकार घडला प्रसंगावधान राखून लगेचच वाहतूक पोलिसांनी सर्व सिग्नस थांबवत वाहतूक ठप्प केले आणि तातडीने बॅरिगेट्स हटवण्याचे काम हातामध्ये घेतले.

त्यानंतर अन्य कुठली बॅरिगेट सैल झालेत का वरून काही लोखंडाच्या सळ्या खाली पडू शकतील का याबाबतची पाहणी केली काही धोका नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी वाहतूक पूर्ववत केली.

या भागातील समाजसेवक आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि मलबार हटविण्यासाठी कार्यकर्त्यांना झोपले.

शहरात ठीक ठिकाणी अशा पद्धतीचे बांधकामे सुरू असल्यामुळे अनेक ठिकाणी हा धोका संभावतो त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी योग्यता मार्गदर्शक सूचना फलकावरती लावाव्यात अन्यथा सरळ बॅरॅकेट्स टाकून तेवढा रस्ता तात्पुरता स्वरूपात बंद करावा अशी मागणी यावेळी मोरे यांनी केली.



**धोकादायक कामाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी खबरदारी घ्यावी**

"शहरामध्ये अनेक ठिकाणी मेट्रोची तसेच रस्त्यांची कामे सुरू आहेत या ठिकाणी अनेक वेळेला मलबा पडणे किंवा स्लॅप पडणे किंवा वरून लोखंडी बॅरिकेज पडण्याच्या घटना होत असतात त्यामुळे जीवितहानी होऊ शकते ज्या ठिकाणी अशा पद्धतीची अतिरिक्त खबरदारी घेण्याची कामे सुरू आहे त्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी तात्पुरता रस्ता बंद करून ही कामे करावीत अशी विनंती मी प्रशासनाला करणार आहे " — वसंत मोरे

## शिरोळे यांना महाराष्ट्र विधानसभा 'उत्कृष्ठ भाषण' पुरस्कार प्रदान



**पुणे :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आमदार सिद्धार्थ शिरोळे यांना 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई येथील विधानभवनामधील मध्यवर्ती सभागृहात आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. राज्य सरकारच्या राष्ट्रकुल संसदिय मंडळाच्या वतीने २०२१-२२ या वर्षातील उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी शिरोळे यांची निवड करण्यात आली होती.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ आणि विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभेत छत्रपती शिवाजीनगर मतदार संघातील विविध प्रश्न मांडत असतांनाच राज्यातीलही अनेक विषय सभागृहात प्रभावीपणे मांडले होते. समस्या मांडत असतांनाच त्या सोडवण्यासाठीच्या सूचना करीत सभागृहात छाप पाडणाऱ्या शिरोळे यांना उत्कृष्ट भाषण' पुरस्कार प्रदान करीत गौरवण्यात आले. सिद्धार्थ शिरोळे यांनी विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी, खडकी कॅन्टोनमेंटचा महापालिका हद्दीत समावेश, नदीतील जलपर्णी, मराठा आरक्षण, मतदार संघातील पूरग्रस्त वसाहती यांसोबतच इतर अनेक सभागृहात प्रभावी मांडणी केली.

## वाहतूक पोलिसांची विशेष मोहीम

**पुणे:** वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, यासाठी वाहतूक शाखेकडून शहरात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत एक ऑगस्ट ते १० सप्टेंबरदरम्यान रस्त्यांवर विरुद्ध दिशेने आणि ट्रिपल सीट वाहन चालविणाऱ्या १४ हजार ७७६ चालकांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ९४ लाख ६९ हजार रुपये दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अशा चालकांविरुद्ध वाहतूक शाखेने विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक पोलिसांकडून गणेशोत्सवाच्या कालावधीत शनिवार ते मंगळवारपर्यंत कारवाई करण्यात आली.



## जया किशोरी यांनी घेतले भाऊसाहेब रंगारी गणपतीचे दर्शन

प्रेरणादायी वक्त्या जया किशोरी यांनी मंगळवारी (दि.१०) हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती असलेल्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीचे दर्शन घेत बाप्पाची आरती केली . यावेळी उत्सव प्रमुख व विश्वस्त पुनीत बालन यांच्याकडून जया किशोरी यांचे स्वागत करत त्यांचा सन्मान करण्यात आला.

## सामान्य कार्यकर्त्याच्या मुलीचा अपघात समजताच

# चंद्रकांतदादांनी दिला मोलाचा आधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोथरूडचे लोकप्रतिनिधी आणि तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील हे आपल्या कार्यकर्त्यांच्याप्रती नेहमी जागृत असल्याचे दिसून येते भाजपा कार्यकर्ते महेश कोपकर यांच्या मुलीला काही दिवसापूर्वी झालेला अपघात आज त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने त्याच्या घरी जाऊन मुलीच्या उपचाराचा सर्व खर्च उचलण्याचा निर्णय घेतला अचानक आलेल्या दादांच्या ताफ्यामुळे कार्यकर्ते गडबडून गेले परंतु अपघाताची माहिती मिळताच कुठलीही शिक्युरिटी प्रोटोकॉल न घेता तडक भेटीसाठी आलो असे सांगत दादांनी सुमारे तासभर त्यांच्या घरी गप्पागोष्टी केल्या आणि ही अनौपचारिक भेट संपत असताना संपूर्ण उपचाराचा खर्च देऊ केला.

राजकीय जीवनात काम करणारा व्यक्ती नेता होतो, तेव्हा अनेकदा तो कार्यकर्त्यांना विसरतो. पण राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील हे एक वेगळंच व्यक्तीमत्व आहे. समाज हे आपलं कुटुंब मानून नेहमीच काम करत असतात.

काही दिवसांपूर्वी कोथरुड मधील भाजपा कार्यकर्ते महेश खोपकर यांची लेक शिवन्या शाळेतून घरी परत येत असताना दुर्दैवी अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता; की महेशही हादरुन गेला होता. या अपघातामुळे महेश पूर्ण हतबल झाला होता. कारण आपल्या मुलीवर ओढवलेल्या या कठीण प्रसंगातून तिची सुटका होईल की नाही ही चिंता त्याला सतावत होती.

मात्र, आपल्या कार्यकर्त्यावर ओढवलेल्या संकटाची माहिती मिळताच चंद्रकांत दादा मदतीला धावून गेले. अन् शिवान्याचा उपचाराचा सर्व खर्च उचलून, एक मोठा आधार दिला. त्यामुळे शिवन्याने देखील या संकटाला धैर्याने आणि आत्मविश्वासाने तोंड दिले. आणि आज तिच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होत आहे, हे पाहून दादांनी देखील मोठे समाधान व्यक्त केले.



**कार्यकर्ता हा परिवार**

भाजपाचा कार्यकर्ता हा केवळ राजकीय पदाधिकारी किंवा कार्यकर्ता नसून तो भाजपाचा परिवार सदस्य आहे असे मी मानतो अशा या परिवाराच्या एकीकरणानेच ही पार्टी दोन खासदारावरून ३०० खासदारावरती गेली प्रत्येक कार्यकर्त्याचा परिवार आणि त्याची देखभाल याची काळजी नेतृत्वाला असते -चंद्रकांत पाटील



## Selected

## सुरक्षित व सक्षम महाराष्ट्रासाठी सेलिब्रिटींची बाप्पाकडे प्रार्थना

**पुणे :** विघ्नहर्ता गणपती बाप्पाने महाराष्ट्रावरील सर्व विघ्ने दूर करून सुरक्षित व सक्षम बनवावे, सर्वांना सुबुद्धी द्यावी, विवेकी विचाराने वागावे आणि महिलांवरील अन्याय, अत्याचार थांबावेत, यासाठी मराठी-हिंदी चित्रपट सृष्टीतील सेलिब्रिटींनी गणपती बाप्पाकडे प्रार्थना करत सर्वांना सुख, समृद्धी आणि आनंद द्यावा, असा आशीर्वाद मागितला. ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या संस्थापिका उषा काकडे यांच्या घरच्या बाप्पांचे दर्शन घेत सेलिब्रिटींनी गणपतीची महाआरती केली. पुणे अंध मुलींच्या शाळेतील ढोलपथकाने मनोहारी ढोलवादन करत मान्यवरांचे स्वागत केले. अनेक कलाकारांनी या अंध मुलींसमवेत ढोलवादनाचा आनंद घेतला. ग्रॅव्हिट्स फाउंडेशनच्या माध्यमातून उषा काकडे करत असलेले काम अतिशय समाजाभिमुख असल्याची भावना सर्वच कलाकारांनी व्यक्त केली.गणेशखिंड रस्त्यावरील काकडे यांच्या निवासस्थानी झालेल्या या महाआरतीवेळी ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान, अभिनेत्री उर्मिला मातोंडकर, नीलम कोठारी, तनिषा मुखर्जी, झरीन खान, 'सैराट'फेम रिंकू राजगुरू व आकाश ठोसर, अभिनेता गोविंदा यांच्या पत्नी सुनीता अहुजा, लक्ष्मीनारायण त्रिपाठी यांच्यासह कलाकार, उद्योग व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## शिवगर्जना ढोल-ताशा पथकाच्या मिरवणुकीत महिलांच्या सुरक्षेचा जागर

**पुणे :** पुण्यातील प्रसिद्ध शिवगर्जना ढोल-ताशा पथकाने यंदाच्या गणेशोत्सवात एक अनोखा सामाजिक संदेश देत महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा उचलला आहे. महिलांच्या सहभागासाठी ओळखले जाणारे हे पथक, त्यांच्या मिरवणुकीत महिलांच्या सुरक्षेचा जागर करत आहे. *तुळशीबाग गणपती आगमन सोहळा २०२४* मध्ये त्यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी विविध संदेश असलेले फलक आणि बॅनर्स हातात धरले आणि समाजाला जागरूक करण्यासाठी एक प्रभावी पाऊल उचलले.

**समान सहभाग आणि सुरक्षा**- शिवगर्जना पथक हे फक्त ढोल-ताशाच्या गजरापुरतं मर्यादित नाही, तर सामाजिक प्रश्नांवर देखील लक्ष केंद्रित करत आहे. ललित पवार यांच्या नेतृत्वाखाली या पथकाने पुरुष आणि महिलांच्या समान सहभागाला प्रोत्साहन दिलं आहे. त्यांच्या मिरवणुकीत महिलांसोबत काम करणं हे त्यांचं वैशिष्ट्य आहे. यंदाच्या मिरवणुकीत मात्र त्यांनी महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा हिरीरीने उचलला. ललित पवार यांनी सांगितलं, "शिवगर्जना पथकाची स्थापना फक्त ढोल-ताशा वादनासाठीच नाही तर समाजात पुरुष आणि महिलांच्या समान सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी झाली आहे. सध्या महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांनी आम्हाला अस्वस्थ केलं आहे आणि या समस्येवर लक्ष वेधण्यासाठी गणेशोत्सवासारख्या मोठ्या व्यासपीठाचा वापर करण्याचं ठरवलं आहे."

**फलकांवर सामाजिक संदेश**-तुळशीबाग गणपती आगमन सोहळा २०२४* मध्ये शिवगर्जना पथकाच्या सदस्यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध फलक आणि बॅनर्स मिरवणुकीत उचलले होते. ढोल-ताशाच्या नादात या संदेशांनी मिरवणुकीला वेगळाच सामाजिक आणि संवेदनशील रंग दिला.

## दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या अध्यक्षपदी बनसोड

**पुणे :** दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री(डिक्की)



पुणे च्या अध्यक्षपदी ललित बनसोड यांची निवड करण्यात आली आहे .उद्योग क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल बनसोड यांची निवड करण्यात आली आहे.डिक्की ही देशभरातील दलित उद्योजकांची शिखर संस्था आहे . डिक्की च्या नुकत्याच झालेल्या बैठकीत संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मिलिंद कांबळे उपस्थित होते. याप्वेळी डिक्की चे प्रदेशाध्यक्ष मुकुंद कमलाकर ,माजी अध्यक्ष राजू साळवे ,अविनाश जगताप यासह दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिक्की ) चे राज्यभरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते .यावेळी सर्वानुमते बनसोड यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

## पाण्याच्या टाकीत बुडून सहा वर्षांच्या मुलीचा मृत्यू

**पुणे :** पुणे शहराच्या वाघोली भागातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पाण्याच्या टाकीत बुडून सहा वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी जबाबदार असल्याप्रकरणी एकावर लोणीकंद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रेखा मुकेशसिंग चौहान (वय ६) असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव आहे. याप्रकरणी रमेश बालाजी मुंडे (वय ४०, रा. कवडे वस्ती, वाघोली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मुकेशसिंग चौहान (वय २९, रा. खांदवेनगर, वाघोली) याने लोणीकंद पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, वाघोलीतील कवडे वस्तीत मुंडे याची तीन मजली इमारत आहे. इमारतीचे बांधकाम अर्धवट झाले आहे. तेथे असलेल्या पाण्याच्या टाकीला झाकण नाही. सुरक्षेच्या दृष्टीने पाण्याच्या टाकीला झाकण बसणे गरजेचे होते. मात्र, त्यांनी ते बसवले नव्हते. मुकेशसिंग याची सहा वर्षांची मुलगी रेखा अर्धवट बांधकाम झालेल्या इमारतीतील टाकीजवळ गेली. टाकीत ती तोल जाऊन पडली. टाकीत बुडालेली रेखा घरी न परतल्याने तिच्या कुटुंबीयांनी शोध घेतला. तेव्हा ती टाकीत बुडाल्याचे आढळून आले.

# भ्रष्टाचाराचं फोडाफोडीचं राजकारणाचं विघ्न दूर होऊ दे : डॉ. अमोल कोल्हे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रवरचं भ्रष्टाचाराचा फोडाफोडीचा राजकारणाचं, महिलांच्या असुरक्षिततेचे विघ्न दूर होऊ दे, असे साकडे गणपती बाप्पांकडे घातल्याचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले. विविध गणेशोत्सव मंडळाला भेटी दिल्यावर कोल्हे पत्रकारांशी आज बोलत होते.

डॉ. कोल्हे म्हणाले, महायुतीच्या सरकारमध्ये एक वाक्यता नाहीये. योजनांची नावे प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी येत आहे. वर्षा बंगल्यावर देखाव्यात उपमुख्यमंत्र्यांचा फोटो नाही. महायुतीचा कारभाराला महाराष्ट्राची जनता कंटाळली आहे. काल एक सर्वे समोर आलाय. महाराष्ट्राच्या मनात महाविकास आघाडीसोबत असल्याचे सांगण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. अशा प्रकारचे कोणी विधान केले तरी इतिहास बदलणार नाही. मागेदेखील सुरतेच्या लुटेबाबत विधान केलं. महाराष्ट्राची जनता हे सर्व पाहतेय. महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाला अजिबात थरा नाही. पवार साहेबांना सोडून गेलेला नेता जास्त का राजकारणात टिकत नाही. रोहित पवार मतदारसंघात सातत्याने काम करतात. विधानसभेचे एकूण वातावरण पाहिलं तर महाविकास आघाडीला अनुकूल आहे. त्यामुळे अनेक जण उमेदवारीसाठी इच्छुक आहेत.

महाविकास आघाडीची जागा वाटपाची बैठक झालेली नाही. गणेशोत्सवानंतर कोणत्या पक्षाला कोणती जागा आहे ते ठरेल. भाजपच्या मेगा भरतीला आपण शरीरसौष्ट म्हणायचं की सूज हे तुम्हाला कळलं आहे. पावडर खाऊन बनवलेली बॉडी आणि पवार साहेबांना सोडून गेलेला नेता जास्त काळ टिकतं नाही, असा चिमटाही कोल्हे यांनी काढला.

## पुणे फेस्टिव्हलमध्ये 'पुणे व महाराष्ट्राचा पर्यटन विकास'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे व महाराष्ट्रच्या पर्यटनाचा विकास होत अधिकाधिक देशी-विदेशी पर्यटक पुण्यात यावेत व पुण्याच्या विकासात भर पडावी आणि पुण्याचे जगभर ब्रॅंडिंग व्हावी यासाठी गुरुवारी दु. १२.०० वाजता बालगंधर्व कलादालन येथे 'पुणे व महाराष्ट्राचा पर्यटन विकास' या विषयावार विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे फेस्टिव्हल आणि महाराष्ट्र सरकारच्या पर्यटन विभागाचे पर्यटन संचलनालय यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे फेस्टिव्हलतर्फे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल व मुख्य समन्वयक अ‍ॅड. अभय छाजेड, पर्यटन संचलनालयच्या पुणे विभागाच्या उपसंचालिका शमा पवार, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अ‍ॅन्ड अ‍ॅग्रि.च्या वतीने डायरेक्टर सुधनवा कोपर्डेकर आणि निवडक ट्रॅव्हल्स कंपनीचे अधिकारी सहभागी होणार आहे. करूणा पाटील सूत्रसंचालन करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून पुणेकरांनी यात जरूर सहभाग घ्यावा असे पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी म्हटले आहे.

## महामेट्रोच्या १७ फूट पादचारी मार्गावरून समस्या

# मेट्रोने अडविला गणरायाचा मार्ग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महामेट्रोचे बहुतांशी कामे पूर्ण होत आल्यानंतर यंदाचा गणेशोत्सव येत आहे मागील गणेशोत्सवावेळी बहुतांचे फुलांची कामे झालेली नव्हती त्यामुळे विसर्जन मिरवणुकीला नेमका कोणत्या मार्गांचा अडथळा होईल याबाबतची कल्पना नव्हती यांना मात्र बहुतांश ठिकाणी पूल झाल्याने काही ठिकाणचे गणरायाचे मार्ग अडविले गेल्याचे दिसत आहेत.



पुणे महा मेट्रोने जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यान समोर मेट्रोच्या पादचारी मार्गाची उंची ही १७ फूट ठेवली आहे परंतु पुणे शहराचा गणेशोत्सव मिरवणुकीतील हा प्रमुख रस्ता असल्यामुळे अनेक गणेश मिरवणुकींना या रस्त्याचा अडथळा होऊ शकतो.

आज श्री गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवशी ही वस्तुस्थिती लक्षात आल्याने अनेक कार्यकर्त्यांनी याबाबत मेट्रोकडे तक्रार केली.

पुण्याचा गणेशोत्सव पाहण्यासाठी केवळ पुणेकर नव्हे तर महाराष्ट्रभरातून गणेश प्रेमी येत असतात पुण्याच्या पर्यटन विकासाच्या दृष्टिकोनातून येथील गणेशोत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे या गणेशोत्सवामध्ये गणरायाच्या दहाव्या दिवसाचा मिरवणुका हा देखील प्रमुख आकर्षणाचा बिंदू असतो. सर्वसाधारणपणे पुणे मध्य भागातील पेठ परिसर टिळक रस्ता अलका चौक फर्ग्युसन कॉलेज रस्ता जंगली महाराज रस्ता स्टेशन रोड या भागामध्ये मिरवणुका पाहण्यासारख्या असतात तथापि यंदा पुणे मेट्रोच्या एका उड्डाणपुलामुळे मूर्तीचे देखावे आणि मिरवणुकाला अडथळा निर्माण झाला आहे. महामेट्रोने जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यानासमोर पादचारी मार्गाची निर्मिती केली परंतु याची उंची केवळ १७ फूट केली यापूर्वी हा ब्रिज मानत असताना सर्व प्रकारचे न हरकत प्रमाणपत्र घेण्याचा प्रघात आहे तथापि पुणे महापालिका सामाजिक संस्था या सर्वांचे चर्चा करूनच पुणे मेट्रोचे कामकाज चालतात परंतु गणेशोत्सवामध्ये प्रमुख अडथळा ठरू शकणाऱ्या या उंचीबाबत कोणीच आक्षेप घेतला नाही याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. #रा

# जवानांनी घेतले 'दगडूशेठ' गणपतीचे दर्शन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** श्री गणेश महाराज की जय... गणपती बाप्पा मोरया... भारत माता की जय... जय हिंद अशा घोषणांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती उत्सव मंडप दुमदुमून गेला. भारतीय लष्कराच्या प्रमुख केंद्रांपैकी एक असलेल्या दक्षिण कमांड (सदर्न कमांड) मधील अधिकारी जवानांनी दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेत आरती केली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे १३२ व्या वर्षी आयोजित गणेशोत्सवात दक्षिण कमांडचे लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांचे स्वागत व सन्मान ट्रस्टतर्फे करण्यात आला. यावेळी ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी देखील सन्मानचिन्ह देऊन ट्रस्टचा गौरव केला. तसेच ट्रस्टच्या कार्याची माहिती देखील जाणून घेतली.

## शासनाने अंगणवाडी सेविकांना अक्षरशः भरडले

# कामांना आधी, लाभाला कधी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रत्येक सरकारी योजनेच्या कार्यासाठी थेट जनतेत जाण्यासाठी अंगणवाडी सेविकांचा फार मोठ्या वर्गाचा उपयोग केला जातो परंतु हा वर्ग मूलभूत सेवा सुविधा योजनांपासून दूर असल्याने आता सेविकांमध्ये देखील असंतोष निर्माण होत आहे.

महाराष्ट्र सरकारने महत्त्वकांक्षा असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी आता अंगणवाडी सेविकांची मदत घेण्याचे ठरविले आहे या अंगणवाडी सेविकांना ठिकठिकाणी जाऊन अशिक्षित महिलांकडून अर्ज भरून घेण्याची जबाबदारी देण्यात आली आहे या योजनेच्या लाभार्थी मैदानापर्यंत पोहोचविण्यासाठी आतापर्यंत ऑनलाईन प्रक्रियेचा अवलंब केला जात होता परंतु राज्यभरातील एक मोठा वर्ग या ऑनलाइन प्रक्रिया इंटरनेट मोबाईल यापासून दूर आहे त्यामुळे अशा अशिक्षित महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी आता अंगणवाडी सेविकांचा उपयोग करण्यात येत आहे तथापि या अंगणवाडी सेविकांना मूलभूत सेवा सुविधा देण्याबाबत मात्र सरकारने अद्यापही स्वारस्य असे काही दाखवलेले नाही.



### तातडीने प्रोत्साहन भत्ता मिळावा : शिंदे

● ज्या अंगणवाडी सेविकांनी लाखो लाडक्या बहिणीचे अर्ज भरले त्यांना कोट्यावधी रुपयांची वाटप झाले परंतु अर्ज भरून घेण्यासाठी मात्र या अंगणवाडी सेविकांना आश्वासित केलेले प्रोत्साहन भत्ते मात्र मिळालेले नाहीत त्यामुळे तातडीने यांना प्रोत्साहन भत्ता मिळावा आणि या अंगणवाडी सेविका देखील आपल्या लाडक्या बहिणी आहेत हे मुख्यमंत्र्यांनी सिद्ध करावे अशी मागणी राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांनी केली आहे

सेतूपासून ते दाखल्यांपर्यंत आणि विद्यार्थी नोंदणीपासून ते आता लाडकी बहीण योजनेपर्यंत अनेक योजनांसाठी या अंगणवाडी सेविकांना राबविले जाते. परंतु या सेविकांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत मात्र शासन हात आखडता घेत आहे .

अंगणवाडी सेविका या मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण नाहीत का ? असा प्रश्न आता सेविकांमधून विचारले जात आहे ऑनलाइन पोर्टलवर यशस्वी नोंदणी झाल्यानंतर प्रति यशस्वी पात्र लाभार्थ्यांना प्रति अर्जामागे 50 याप्रमाणे अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले होते परंतु आतापर्यंत एकाही अंगणवाडी सेविकाला एकही रुपया मिळालेला नाही. या सेविकांकडून भरल्या गेलेल्या हजारो महिलांना लाडके बहीण योजनेअंतर्गत लाखो रुपये मिळाले परंतु यासाठी राबणारे अंगणवाडी सेविका मात्र वंचित राहिल्या. याबाबत राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांनी नाराजी व्यक्त करत याबाबत आंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

त्याने सांगितले की देशाची भावी पिढी सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी अंगणवाडी केंद्रात 0 ते सहा वर्षे वयोगटातील बालके गर्भवती व स्तनदामाता यांना पोषण आहार लसीकरण आरोग्य तपासणी आरोग्य शिक्षण अशा अनेक कामाबाबत या सेविका काम करत असतात त्यातील बहुतांश अंगणवाडी सेविका ह्या एकल विधवा परित्यक्त्या आहेत अतिशय कमी मानधनांमध्ये त्या काम करतात तरी देखील शासन त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करते विविध प्रश्न घेऊन प्रशासकीय पातळीवर महिला व बाल विकास विभागाचा उंबरठा झिजवावा लागतो तरीही हे प्रश्न सुटत नाहीत.

## कर्करोग हॉस्पिटलची जागा खासगी व्यावसायिकाला


# एमएसआरडीसी मेहेरबान असलेला 'तो' खासगी उद्योजक कोण?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मंगळवार पेठेमध्ये ससून रुग्णालयाच्या परिसरात असलेली सव्वा दोन एकर जागा ही रस्ते विकास महामंडळाने एका खासगी व्यावसायिकाला कवडीमोल भावाने ९० वर्षांसाठी देण्याचे कारस्थान रचले आहे. शासन मेहरबान असलेला हा बांधकाम व्यावसायिक कोण याची चर्चा मोठ्या प्रमाणात होत आहे.

पुण्यामधील प्राथमिक आरोग्यव्यवस्थेसह अतिदक्षता आणि महागड्या वैद्यकीय उपचारांची यंत्रणा मोठ्या प्रमाणामध्ये विकसित होण्याची आवश्यकता आहे त्यामुळे मंगळवार पेठेतील एका जागेमध्ये कर्करोगांसाठी एक विशेष रुग्णालय स्थापन करण्याचा संबंधिचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता या ठिकाणी असलेले सव्वादोन एकर जागा ही सार्वजनिक बांधकाम विभागाने एमएसआरडीसीला दिली या जागेवर कर्करोग रुग्णालय उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येत होते या हॉस्पिटलच्या मंजुरीसाठी देखील शासनाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आला परंतु अचानक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ म्हणजे एमएसआरडीसीने ही जागा एका बांधकाम व्यवसायिकाला कवडीमोल भावाने 90 वर्षांसाठी देण्याचा निर्णय घेतला त्यासंबंधीची निविदा देखील काढली ही निविदा तातडीने रद्द करावी यासाठी अनेक समाज घटक आंदोलन करीत आहेत.

### निविदा रद्द करा अन्यथा आंदोलन : वंदना चव्हाण



हॉस्पिटलच्या जागेच्या या पळवा-पळवी बद्दल माजी खासदार व अर्बन सेलच्या अध्यक्ष वंदना चव्हाण यांनी आवाज उठवला आहे बिल्डरांच्या फायद्याचे हे टेंडर रद्द करा आणि ही जागा पुरवत हॉस्पिटलसाठी द्या अन्यथा आंदोलन उभा करू असा इशारा चव्हाण यांनी दिला आहे."

एकीकडे समाजामध्ये कर्करोगाचे रुग्ण वाढत असताना त्यावर उत्तम उपचार मिळत नाहीत तसेच जे उपचार आहेत ते महागडे आहेत त्यामुळे सरकारी व्यवस्थेमधून अशा उपचारा बद्दलची व्यवस्था व्हावी यासाठी काही लोक प्रयत्न करीत होते या सर्व सामूहिक प्रयत्नातून या कर्करोग हॉस्पिटलचा प्रस्ताव पुढे आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संवेदनशील मुख्यमंत्री मानले जातात. असे असताना सरकारने एका खासगी व्यावसायिकाला मदत करण्याची भूमिका का घेतली असा प्रश्न आहे.

## नव्या ड्रेनेजचे काम पूर्णत्वास

# खडकी रहिवाशांची होणार दुर्गंधीपासून मुक्तता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकी भागातील रहिवाश्यांना आता जुन्या ड्रेनेज पाईपलाईनमुळे होणाऱ्या त्रासापासून मुक्तता मिळणार आहे. आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी त्यांच्या निधीतून प्रतिक्षीत असलेले हे काम पूर्णत्वास नेले असून खडकी भागातील अरुण कुमार वसाहत, दर्गा वसाहत, धोबीगल्ली, खडकी डेपो लाईन मित्र मंडळ परिसर, हुले बिल्डींग ते इंदिरानगर पर्यंत या भागातील काम पूर्णत्वास गेले आहे .

छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील खडकी भागात आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या प्रयत्नांमधून मागील काही महिन्यांत तब्बल ६ कोटींची विकासकामे पूर्ण झाली असून ५ कोटींच्या विकासकामांना प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. मंजुरी मिळालेली विकासकामे पुढील काही महिन्यांमध्ये मार्गी लागतील, अशी माहिती शिरोळे यांनी दिली.

खडकी हा भाग शिवाजीनगर मतदार संघातील एक महत्त्वाचा भाग असून या भागात मागील काही महिन्यांत दर्जी गल्ली विठ्ठल मंदिरासमोर, साईबाबा मंदिराजवळ गवळी वाडा, राजीव गांधी नगर, लक्का वाडा, महादेववाडी, अरुण कुमार वसाहत, दर्गा वसाहत, धोबीगल्ली, खडकी डेपो लाईन मित्र मंडळ परिसर, हुले बिल्डींग ते इंदिरानगर पर्यंत या भागांमध्ये नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.



याबरोबरच खडकी छावणी परिषद हद्दीतील वाडे, मोहल्ले, सोसायटी, झोपडपट्टी, चाळी परिसरातील गल्ली बोळ येथे सिमेंट- कॉंक्रीटीकरण करणे व इंटरलॉकिंग ब्लॉक टाकणे, खडकी साप्रस येथील जय शिवशंकर गृहसंस्था, शुभम पार्क सोसायटीकडे जाणारा रस्ता, तसेच गंधम नगर फेज - २, राधाकृष्ण सोसायटी, क्षितीज सहकारी गृहसंस्था या परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे, खडकी छावणी परिषद हद्दीत मैदान, व्यायाम शाळा, ओपन जिम उभारत त्यांमध्ये व्यायामाचे साहित्य पुरविणे, इंदिरा गांधी नगर येथे कॉंक्रीटीकरण करणे, वार्ड क्र. १ मधील संत शिरोमणी सावता माळी महाराज, अखिल खडकी मातंग सेवा संस्था व राजीव गांधी नगर, गंधकुटी बुद्धविहार जवळ सामाजिक सभागृह बांधणे, एकमुखी दत्त मंदिर, गाडी अड्डा या ठिकाणी अभ्यासिका उभारणी ही महत्त्वाची कामेही पूर्ण करण्यात आली आहेत.

ऑर्डनन्स फॅक्टरी एमप्लोईज एज्युकेशन सोसायटी रेंजहिल्स सेकंडरी स्कूल खडकी येथे शौचालय बांधणे व पिण्याच्या पाण्याची टाकी बसविणे, गवळीवाडा येथील साईबाबा मंदिराजवळ कॉंक्रीटीकरण करणे, खडकी धोबीगल्ली येथील मरीमाता मंदिर व संगम मित्र मंडळ परिसरात कॉंक्रीटीकरण करणे, खडकी रेल्वे स्टेशन रोड येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे आदी विकासकामे देखील शिरोळे यांच्या प्रयत्नांमधून पूर्ण करण्यात आली आहेत.

# कात्रज - कोंढवा मार्गाला मिळणार गती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अनेक वर्षांपासून रखडलेल्या कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाच्या कामाला आता आणखी गती येण्याची शक्यता आहे. अडथळ्यांची शर्यत पार करत अखेर कात्रज गावातील रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक जमिनींच्या मोजणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तब्बल १०० मिळकतींच्या मोजणी प्रक्रियेचा सविस्तर भूमापन अहवाल भूमी अभिलेख विभागाकडून महापालिकेकडे पाठविण्यात आला आहे. आता कोंढवा बुद्रूक येथील बाधित जमिनींच्या मोजणीचे कामही लवकरच पूर्ण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.!

महापालिकेकडून कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. विकास आराखड्यातील ८४ मीटर असलेला हा रस्ता ५० मीटर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले. मात्र, मालमत्ताधारकांकडून प्रारंभी जमिनी देण्यास होणारा विरोध, जमिनीचा मोबदला रोख स्वरूपात मिळण्याची करण्यात येत असलेली मागणी, विविध प्रकारच्या तांत्रिक अडचणी अशा वेगवेगळ्या कारणांमुळे रस्ता रुंदीकरणाचे काम अडखळत सुरू होते. दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी यासंदर्भात मालमत्ताधारकांशी संवाद साधून रस्ता रुंदीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर करण्यास सुरुवात केली होती.

## अवतीभवती
CITY UPDATE

### कात्रज-कोंढवा रोडवर मलमपट्टी

**पुणे :** कात्रज-कोंढवा रस्त्यावर राजस सोसायटी चौकात मोठमोठ खड्डे पडले आहेत. या रस्त्यावर स्थानिक वाहतूकीसाठी अवजड वाहनांचीही मोठी वर्दळ आहे. य खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या रस्त्याच्या अवस्थेकडे प्रशासन दुर्लक्ष केले जात असल्याची टीका स्थानिकांकडून केली जाते. त्यामुळे पथ विभागाचे प्रमुख अनिरूध्द पावसकर, अधिक्षक अभियंता साहेबराव दांडगे यांनी या रस्त्याची पाहणी करून त्वरित खड्डे भरून घेण्याचे आदेश दिले होते.कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरण रखडलेले असताना, अस्तित्वातील रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. पण खड्डे बुजविण्याचे कामही निकृष्ठ दर्जाचे केले आहे. या रस्त्यावर डांबरीकरण केल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी या ठिकणी खडी निघून गेली असून, खड्डे पडल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. य रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी अपघात होत असूनही प्रशासन गंभीर नसल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे. रस्ता दुरूस्त करण्यासाठी पथ विभागाने रविवारी रात्री खड्डे बुजविले, पण त्यानंतर अवघ्या काही तासात तेथे पुन्हा खड्डे पडल्याचे दिसून आले. खड्डे बुजविताना चांगल्या दर्जाचे डांबर वापरले नसल्याने हे खड्डे पडले असल्याची शक्यता आहे. "कात्रज-कोंढवा रस्त्यावर खड्डे बुजविल्यानंतर पुन्हा खड्डे पडल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. याची माहिती घेऊन खड्डे का पडले, डांबराचा दर्जा काय होता याची तपासणी करून संबंधितांवर कारवाई केली जाईल," असे पथ विभागाचे प्रमुख अनिरूध्द पावसकर यांनी सांगितले.

### घोरपडी उड्डाणपूल कामासाठी वाहतुकीत बदल

**पुणे :** घोरपडी रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासाठी या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.घोरपडीतील युद्ध स्मारक परिसरातून मुंढव्याकडे जाणारी वाहने केंद्रीय विद्यालय चौक ते घोरपडी पोलीस चौकीमार्गे जातील.मुंढवा, घोरपडी रेल्वे पुलावरुन युद्धस्मारकाकडे फक्त दुचाकी, रिक्षा आणि मोटारींना प्रवेश देण्यात येणार आहे. मालवाहू वाहने, जड वाहने, तसेच पीएमपी बसला या मार्गाचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. घोरपडी युद्धस्मारकाकडे येणाऱ्या जड वाहनांनी रेल्वे उड्डाणपूल (सोलापूर लोहमार्ग), बी. टी. कवडे रस्ता, सोपानबाग चौकातून सोलापूर रस्त्यावर यावे. तेथून इच्छितस्थळी जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.वाहतूक बदलाबाबत नागरिकांच्या सूचना किंवा तक्रारी असल्यास वाहतूक नियंत्रण शाखा, पोलीस उपायुक्त, येरवडा टपाल कार्यालय, जेल रस्ता येथे लेखी स्वरुपात कळवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुख्य सचिवाच्या नावाने १२ लाखांचा गंडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मंत्रालयात मुख्य सचिव नितीन करीर यांच्याशी ओळख असल्याची बतावणी करीत अनेक वर्षांपासून रखडलेला मोबदला अवघ्या दोन महिन्यात मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात असलेल्या मौजे काक्रंबा येथील जमिनीसंदर्भात हा प्रकार घडला. धर्मपाल मनोहर लांजेवार (वय ५०, रा. नागपूर) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी विजय शिवराम वाघ (वय ४५, रूपसंगम रेसिडेन्सी, पिंपळे गुरव) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा मटेरियल सप्लायचा व्यवसाय आहे. त्यांचे सासरे दगडू लिंबाजी घोगरे यांची धाराशिव जिल्ह्यातील काक्रम्बा येथे वडिलोपार्जित जमीन आहे. या २२ एकर २० गुंठे जमिनीपैकी काही क्षेत्र शासनाने काही वर्षांपूर्वी तलाव तयार करण्यासाठी अधिग्रहित केले होते. या जमिनीचा मोबदला घोगरे यांना मिळालेला नव्हता.

फिर्यादी यांना बळवंत घोगरे यांनी आपल्या वडिलोपार्जित जमिनीचा तलावासाठी अधिग्रहण झाल्यानंतर मिळणारा मोबदला शासन दरबारी अडकला असून त्यासाठी काही प्रयत्न करता येतील का? अशी विचारणा केली. २०२१ मध्ये धर्मपाल लांजेवार आणि त्याची पत्नी प्रीती लांजेवार यांच्याशी फिर्यादीची ओळख करून दिली. फिर्यादीने लांजेवार याला फोनवर मेहुण्याच्या जमिनीचा मोबदला अडकल्याची माहिती दिली. तेव्हा त्याने फिर्यादीला पनवेलला बोलावून घेतले. तेथे फिर्यादीने त्यांची भेट घेतल्यानंतर मंत्रालयात मुख्य सचिव नितीन करीर यांच्याशी ओळख असल्याची बतावणी केली. अवघ्या दोन महिन्यात जमिनीच्या मोबदल्याचे पेमेंट काढून देतो, असे आश्वासन दिले. या कामासाठी आधी आपल्याला अधिकाऱ्यांना पैसे द्यावे लागतील असे सांगून फिर्यादी यांची आरोपीने फसवणूक केल्याचे पोलिसानी सांगितले.

# नूमवि प्रशालेतील विद्यार्थीनींनी केला स्त्री शक्तीचा जागर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** घाबरु नका पण सावध रहा... महिला आहेत देशाच्या प्रगतीचा आधार करु नका त्यांच्याबद्दल वाईट विचार...स्त्रियांना समजू नका बेकार त्याच आहेत जिवनाचा आधार...नारी आता अबला नाही संघर्ष आमचा चालू राही...जब है नारी मे शक्ती सारी तो फिर क्यों नारी को कहे बेचारी...स्त्री आहे जीवनाचा आधार तिला द्या योग्य सन्मान असा संदेश देत नूमवि प्रशालेतील विद्यार्थीनींनी स्त्री शक्तीचा जागर केला. 'गणराया आमचे रक्षण कर आम्हाला सक्षम कर' असे साकडे गणरायाला घातले.



शिक्षण प्रसारक मंडळीच्या नूमवि प्रशालेतील २०० विद्यार्थीनींनी अखिल मंडई मंडळाच्या शारदा गजाननाचे दर्शन घेत आरती केली. यावेळी अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात, जयंत किराड, सुरज थोरात, मुख्याध्यापिका संगीता कांबळे उपस्थित होते. प्रिय, गणपती बाप्पा कोणत्याही महिलेवर अन्याय नको, अन्यायाचा विचार करणाऱ्याला सद्बुद्धी दे अशी प्रार्थना विद्यार्थीनींनी यावेळी केली.

# मंगलमय गणेशोत्सव आणि मान्यवरांचे श्रीगणेशदर्शन



आमदार माधुरी मिसाळ यांनी अखिल मंडई मंडळाच्या श्री शारदा गजाननाचे सहकुटुंब दर्शन घेतले व गणरायाची आरती केली. यावेळी मा. बाबाशेठ मिसाळ सोबत उपस्थित होते.



भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी गुरुजी तालीम मंडळाला भेट देत श्रींचे दर्शन घेतले तसेच मनोभावे आरती करत या मंडळांनी केलेला सत्कार स्वीकारला.



खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अखिल मंडई मंडळाच्या शारदा गणेशाचे दर्शन घेतले व आरती केली.



मराठमोळ्या खेळाडू स्वप्निल कुसळे याने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेऊन आरती केली.

# युद्ध समाप्तीचे संकेत!

सुमारे अडीच वर्षापासून रशिया–युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध समाप्त होण्याचे संकेत मिळत आहेत. युक्रेनशी सुरू असलेला संघर्ष मिटविण्यासाठी आपण भारत, ब्राझील आणि चीन या देशांशी सातत्याने संपर्कात आहोत, असे रशियन अध्यक्ष पुतीन यांनी म्हटले आहे. रशिया–युक्रेन युद्धावर तोडगा काढण्यासाठी हे तिन्ही देश प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. इस्टर्न इकॉनॉमिक फोरमच्या अधिवेशनात पुतीन यांनी केलेले हे वक्तव्य म्हणजे फेब्रुवारी २०२२ पासून सुरू असलेल्या रशिया–युक्रेन युद्धावर तोडगा निघण्याचे संकेत मानले जात आहेत. या मुद्यावर वाटाघाटीची युक्रेनची तयारी असेल तर मी पण त्या दिशेने पाऊल टाकण्यास तयार आहे, असे पुतीन म्हणाले. युक्रेनने याबाबत आधीच तयारी दाखवली आहे. गत ऑगस्ट महिन्यात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही देशांना भेट दिली होती. रशियन दौऱ्यात मोदी यांनी पुतीन यांची गळाभेट घेतली होती त्यावर युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी नाराजी व्यक्त केली होती. नंतर मोदी यांनी कीवमध्ये झेलेन्स्की यांची भेट घेतली होती. या दोन्ही देशांचा भारतावर विश्वास आहे. भारताने मध्यस्थीची भूमिका बजावावी, अशी अपेक्षा दोन्ही देशांनी व्यक्त केली आहे. मित्र आणि सहकाऱ्यांचा आम्ही आदर करतो, असे पुतीन यांनी म्हटले आहे. अडीच वर्षानंतर का होईना रक्तपात किंवा हिंसाचार थांबवण्याची गरज दोन्ही देशांना भासू लागली आहे हेही नसे थोडके! भारताच्या पुढाकाराने जगात शांतता प्रस्थापित होत असेल तर ती भारतासाठी अभिमानाची बाब आहे. कारण शांततेचा मार्गच जगाचे हित साधू शकतो. रशियन राष्ट्राध्यक्षांचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी युक्रेनशी चर्चेचा मार्ग खुला करण्यात भारताची मदत होऊ शकते, असे म्हटले आहे. पंतप्रधान मोदी आणि पुतीन यांच्यात असलेले विश्वासाचे आणि मैत्रीचे संबंध पाहता या वादावर तोडग्यासाठी तेच पहिले पाऊल उचलू शकतील, असे पेस्कोव्ह म्हणाले. रशिया–युक्रेन युद्धाला जबाबदार कोण, कोणाच्या आकांक्षा अधिक घातक होत्या, कोणी कोणाला चिथावणी दिली यावर गत अडीच वर्षात चर्वितचर्वण झाले आहे. मुद्दा असा की, ज्यांचे युद्धात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हितसंबंध गुंतले होते त्यांना त्याची झळ न पोहोचता दोन्ही देशांच्या सर्वसामान्य जनतेला त्याचा चटका सहन करावा लागला. युक्रेनला नाटोमध्ये सहभागी व्हायचे होते. अमेरिका आणि त्याचे मित्र देश यासाठी सक्रिय झाले आणि तेथेच पुतीन यांना कारण मिळाले. तेल आणि इतरही अनेक बाबींचा स्वार्थ त्याच्या मुळाशी होता. दोन्ही राष्ट्रप्रमुखांनी हे युद्ध प्रतिष्ठेचा विषय बनवला. युद्ध थोपवण्याचे प्रयत्न झाले असले तरी ते सगळे एकतर्फीच होते. मुळात जे प्रत्यक्ष युद्धात गुंतले होते त्यांनाच शांततेत फारसे स्वारस्य नव्हते. जे शांततेसाठी पुढाकार घेत होते त्यांच्यावर विश्वास नव्हता. अमेरिकेने युद्धात प्रत्यक्ष सहभाग घेतला नव्हता तरी ती युक्रेनच्या पाठीशी उभी होती. युरोपातील अन्य राष्ट्रेही अमेरिकेची री ओढत होते. त्यांनी शस्त्रापासून ते पैशापर्यंत युक्रेनला मदत केली होती. या साऱ्या बाबी रशियाला डिवचण्यास कारणीभूत ठरल्या. जेव्हा आत्मसन्मानासाठी लढावे लागते किंवा अन्यायाचा प्रतिकार करावा लागतो तेव्हा तो स्वत:च्या ताकदीवर करायचा असतो. कोणी पाठिंब्याचा शब्द दिला म्हणून आपण युद्धभूमी गाठायची नसते. स्वाभिमानासाठी लढताना नुकसान सोसावे लागले तरी त्यापासून भविष्याच्या संदर्भात प्रेरणाच मिळत असतात. युक्रेनची गल्लत येथेच झाली. रशियासमोर आपला निभाव लागू शकतो का याची त्यांना निश्चितच कल्पना असणार मात्र इतरांच्या मदतीवर आणि रसदीवर त्यांनी हे धाडस केले. युक्रेनची बाजू घेत अमेरिकेने रशियावर निर्बंध लादले. अन्य देशांनीही तसेच करावे म्हणून दबाव आणला. अमेरिका अशी उघड बाजू घेत असताना चीनने आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला. रशिया युद्धाच्या मार्गावरून मागे फिरणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली. यात अमेरिकेला शह देण्याचा स्वार्थ होता. भारत हा एकमात्र असा देश होता की, जो या दोन्ही देशांच्या दबावामुळे झुकला नाही. भारताने रशियाशी असलेल्या जुन्या मैत्रीपूर्ण संबंधांना जागत त्या देशाशी आपला व्यवहार सुरूच ठेवला. उलट इंधनाच्या आयातीसंदर्भात जे निर्णय घेतले ते भारताला लाभदायकच ठरले. भारताची युक्रेन संदर्भातली भूमिकाही संतुलितच होती. युरोपीय देशांनी भारत–रशिया संबंधांकडे बोट दाखविले तेव्हा त्याला सडेतोड उत्तर देताना आमच्या गरजा कशा पूर्ण करायच्या या संबंधी आम्हाला सूचना करण्याची गरज नाही, असे सुनावले. नकारात्मक वातावरण असले की काही वेळा त्रागा होतो. पंतप्रधान मोदी आणि पुतीन यांच्या गळाभेटीनंतर झेलेन्स्की यांनी असाच त्रागा केला होता. तेव्हाची त्यांची प्रतिक्रिया अगदी टोकाची होती. आता मात्र झेलेन्स्की यांना समजले असावे की, गळाभेट हा भारताच्या संस्कृतीचा एक भाग आहे त्यामुळे त्यांचे गैरसमज दूर झाले असावेत. भारताच्या भूमीवर शांतता बोलणी व्हावी, असा प्रस्तावही त्यांनी दिला आहे. युक्रेन–रशिया युद्धात दोन्ही देशांना भेट देणारा आणि दोन्ही देशांचा विश्वास असलेला भारत एकमेव देश आहे हे सिद्ध झाले आहे. अमेरिकेला हे युद्ध थांबवता आले असते; पण त्यांनी दुसरा मार्ग पत्करला. भारत मात्र आपल्या भूमिकेवर सातत्य ठेऊन आहे म्हणून आज दोन्ही परस्परांचे शत्रू देश भारताच्या पुढाकाराने चर्चेला तयार झाले आहेत. चर्चा सुरू होईल का, त्यातून काही निष्पन्न होईल का, याची चर्चा आताच नको. मुळात चर्चेची तयारी झाली हेच महत्त्वाचे आहे. शांतता कधीच अशक्य नसते आणि युद्ध हा कधीच अंतिम पर्याय नसतो मात्र युद्धाची खुमखुमी असणाऱ्यांना त्याची तमा नसते. जोपर्यंत ते स्वत: आणि त्यांच्या सोबत इतर त्यात पोळले जात नाहीत तोपर्यंत त्यांची खुमखुमी कायम असते. युद्धाचा उन्माद ओसरतो तेव्हा वास्तवाचे भान येण्यास सुरुवात होते आणि विचारी निर्णय घेतले जातात. आता दोन्ही देशांना युद्धविरामाचा मार्ग सापडला आहे, असे म्हणता येईल. युद्धविराम झाला तर जगात भारताची प्रतिमा झळाळून निघणार यात शंका नाही. भारत आपल्या शेजारी देशालाही शांततेचा मार्ग सुचवतोय; पण त्यांच्या ते लक्षात येत नाही. दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यातच आपले हित आहे हे भारत घसाफोड करून सांगतोय; पण शेजाऱ्याच्या ते लक्षात येत नाही. जिथे पिकते तिथे विकत नाही!

> कोलकात्यातील वैद्यकीय महाविद्यालयात झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणानंतर उसळलेला जनक्षोभ शांत करण्यासाठी पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारने महिला सुरक्षिततेसाठीचे 'अपराजिता' नावाचे विधेयक विधानसभेत पारीत केले. इतिहासात डोकावल्यास अशा घटनांनंतरचा सत्ताधाऱ्यांसाठी नवे कायदे आणणे किंवा सुधारणा करणे हा हुकमी एक्का बनला आहे. अपराजिता असो, शक्ती कायदा असो, दिशा असो किंवा पॉक्सो असो; केवळ कायदे कठोर करणे हे बलात्काराच्या प्रश्नाचे अंतिम उत्तर नाहीये, हे राजकीय नेत्यांनी आणि समाजाने लक्षात घ्यायला हवे. उलट तडकाफडकी कायदे आणून या समस्येच्या मुळाशी असणारे प्रश्न तसेच कायम राहतात. पुढचे 'प्रकरण' घडेपर्यंत...!

# आणखी एक कायदा!

**ॲड. प्रदीप उमाप, कायदे अभ्यासक**

कोलकात्यातील वैद्यकीय महाविद्यालयात झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या प्रकरणाने सबंध देश हादरून गेला असून अद्यापही या घटनेचे नेमके सत्य समोर आणण्यात यश आलेले नाहीये. कोलकाता ही पश्चिम बंगालची राजधानी. देशातील पहिल्या दहा महानगरांपैकी एक. या शहराला आनंदी शहर असेही म्हटले जाते. पण गेल्या काही दिवसांपासून हे शहर बलात्कार प्रकरणातील पीडितेला न्याय मिळावा यासाठीच्या आंदोलनांनी धुमसत आहे. केवळ कोलकाताच नव्हे तर संपूर्ण पश्चिम बंगालमध्ये या घटनेमुळे प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. हा जनक्षोभ शांत करण्यासाठी अलीकडेच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारने पश्चिम बंगालमधील महिला आणि मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने एका कायद्याचे विधेयक पारीत केले आहे. अपराजिता वूमन ॲण्ड चाइल्ड बिल (पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक २०२४) असे या विधेयकाचे नाव आहे. या मसुदा विधेयकात भारतीय न्याय संहिता कायदा, २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कायदा, २०२३ व लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्तावही आहे.

या कायद्यात बलात्कारानंतर पीडितेचा मृत्यू झाल्यास फाशीच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तसेच बलात्काराच्या प्रकरणात दोषी ठरलेल्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्याची तरतूद यामध्ये आहे. याशिवाय, बलात्कार प्रकरणांची चौकशी प्रारंभिक वैद्यकीय अहवालानंतर २१ दिवसांच्या आत पूर्ण करणे यामध्ये बंधनकारक करण्यात आले आहे. याखेरीजही अन्य काही तरतुदी यामध्ये करण्यात आल्या आहेत. सदर विधेयकाला पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींच्या सरकारला कडाडून विरोध करणाऱ्या भारतीय जनता पक्षानेही संमती दिली आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या कायद्याची चर्चा सुरू झाली तेव्हापासून आणि हे विधेयक पारित झाल्यानंतरही त्यामध्ये बलात्काराच्या प्रकरणातील दोषींना १० दिवसांत फाशीची शिक्षा दिली जाईल अशी तरतूद असल्याची चर्चा होती. परंतु पश्चिम बंगालच्या विधानसभेने पारित केलेल्या या विधेयकात याचा उल्लेख नाहीये. तो नसणे स्वाभाविकही होते. कारण प्रत्यक्षात अशा प्रकारे शिक्षा देता येणे अशक्य आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाशी ते विसंगत ठरले असते. तसेच भारतीय न्यायप्रणाली आणि न्यायदानाच्या प्रक्रियेतील तरतुदींनुसार आणि राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांनुसार कनिष्ठ न्यायालयांपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाद मागण्याची प्रक्रिया पार पडल्याशिवाय आणि त्यानंतर राष्ट्रपतींकडे केलेल्या दयेच्या अर्जावर अंतिम निर्णय जाहीर झाल्याशिवाय कोणाही गुन्हेगाराला फासावर लटकवता येत नाही. देशात आजवर अनेक प्रकरणांमध्ये ही बाब दिसून आली आहे. १२ वर्षांपूर्वी देशाची राजधानी दिल्लीमध्ये घडलेल्या निर्भया प्रकरणातील दोषींना फासावर लटकवण्यासाठी तब्बल आठ वर्षांचा काळ जावा लागला होता. आपण स्वीकारलेल्या न्यायप्रणालीतील या रचनेमागे 'शंभर दोषी सुटले तरी चालतील, पण एकाही निर्दोषाला शिक्षा होता कामा नये' हे तत्व आधारभूत आहे. त्यापलीकडे जात गुन्हेगाराला आपण केलेल्या कृत्याचा खरोखरच पश्चाताप झाला असल्यास मानवतेच्या तत्वानुसार दयेच्या अर्जाचा पर्यायही भारतीय न्यायप्रक्रियेत आहे. या सर्वांना बगल देत कोणतेही सरकार अथवा यंत्रणा दोषींना फासावर लटकवू शकत नाही. यामुळेच गेल्या २० वर्षांमध्ये बलात्कार आणि खुनासारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोप सिद्ध झालेल्या केवळ पाच दोषींना फाशीची शिक्षा देण्यात आली आहे. या सर्व वस्तुस्थितीचा विचार करुनच दहा दिवसांत फाशी अशी तरतूद 'अपराजिता' विधेयकात केलेली नाहीये. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे विद्यमान केंद्र सरकारने मध्यंतरी केलेले कायदेबदल एक जुलैपासून अमलात आले आहेत. त्यातील फौजदारी कायद्यांचा समावेश असणाऱ्या भारतीय न्याय संहितेमध्ये जघन्य गुन्ह्यांसाठी फाशीच्या शिक्षेची तरतूद समाविष्ट करण्यात आलेली आहे. त्यामुळे ममता बॅनर्जी यांनी नवा कायदा आणण्याऐवजी सध्याच्या कायद्याच्या कठोर अंमलबजावणीवर भर द्यायला हवा. जलद तपास आणि खटला चालवण्यासाठी ठरवून दिलेल्या कालमर्यादाचे काटेकोरपणे पालन कसे करावे आणि त्याचे पालन न केल्यास त्याचे काय परिणाम होतील, यावर लक्ष दिले पाहिजे.

प्रत्यक्षात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री राज्यातील महिलांना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरणनिर्मिती करण्यात अपयशी ठरल्याचे दिसत आहे. इतकेच नव्हे तर निःपक्ष तपास आणि गुन्हेगारांवर कारवाई करण्यातही त्यांची भूमिका संशयाच्या घेऱ्यात आली आहे. त्यामुळे 'अपराजिता' विधेयक हे डॅमेज कंट्रोलसाठी आणि सरकारविरोधी जनक्षोभ शांत करण्यासाठी उचललेले पाऊल म्हणावे लागेल. सबब हा कायदा करण्यामागचा उद्देश महिलांची सुरक्षितता असल्याचे सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात राजकीय बचावासाठीचा हा खटाटोप आहे.

राज्यघटनेच्या समवर्ती यादीत असलेल्या विषयांवर कायदे करण्याचा अधिकार केंद्र आणि राज्य दोघांनाही आहे. यासंदर्भात अट इतकीच आहे की राज्याचा कायदा केंद्रीय कायद्याच्या विरोधात नसावा. फौजदारी कायदे हे समवर्ती सूचीत येतात. त्यामुळे राज्य सरकारला दुरुस्ती कायदा आणण्याचा अधिकार आहे. राज्य सरकार विधानसभेतून दुरुस्ती कायदा मंजूर करु शकते. त्यानंतर हे विधेयक राज्यपालांमार्फत राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवले जाते. राष्ट्रपतींनी विधेयकाला मंजुरी दिल्यानंतरच या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते. राष्ट्रपतींनी मान्यता दिली नाही तर तो कायदा प्रत्यक्षात येत नाही. ही एक घटनात्मक आणि कायदेशीर व्यवस्था आहे. यापूर्वीही अशी प्रकरणे घडली आहेत ज्यात राज्य सरकारांनी केंद्रीय कायद्यांमध्ये सुधारणा केल्या आहेत. आंध्र प्रदेशचा २०१९चा 'दिशा' कायदा आणि २०२०मध्ये महाराष्ट्रातील महाविकास आघाडीने केलेला 'शक्ती' कायदा यांना अद्यापही राष्ट्रपतींची मंजुरी मिळालेली नाहीये.

पश्चिम बंगाल विधानसभेत सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे विधेयक विरोधकांच्या पाठिंब्याने सहज मंजूर झाले, परंतु अंमलबजावणीसाठी राज्यपाल आणि राष्ट्रपती दोघांची संमती आवश्यक आहे. महामहीम राष्ट्रपती या मंत्रीमंडळाच्या सल्ल्याने काम करतात. त्यामुळे 'अपराजिता' विधेयकाचे कायद्यात रुपांतर होणार की नाही हे केंद्र ठरवेल. तृणमूल हा भाजपचा मुख्य प्रतिस्पर्धी आहे. अशा परिस्थितीत अपराजिता विधेयकाला ग्रीन सिग्नल मिळतो की नाही हे पाहावे लागेल. भाजपच्या आमदारांनी विधानसभेत मांडलेल्या विधेयकाला पाठिंबा दिला असला तरी कोलकाता येथे घडलेला जघन्य गुन्हा झाकण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हे पाऊल उचलल्याचा आरोप पश्चिम बंगालमधील विरोधी पक्षनेते सुभेंदू अधिकारी यांनी केला. लोकांच्या रोषापासून वाचवण्यासाठी आणि त्यांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी ममतांनी हे विधेयक आणल्याचे त्यांचे म्हणणे आहे. रुग्णालयातील घटनेवरून भाजप आमदारांनी मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली. दुसरीकडे, केंद्राने सध्याच्या कायद्यात सुधारणा करावी अशी आमची इच्छा होती, पण त्यांनी त्यात रस दाखवला नाही, म्हणूनच आम्ही प्रथम हे पाऊल उचलले, असे ममता बॅनर्जींनी म्हटले आहे. त्यांनी पंतप्रधान मोदींना लिहिलेली अलीकडची दोन पत्रेही सभागृहाच्या पटलावर ठेवली. तृणमूलचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी सोशल मीडियावरील एका पोस्टमध्ये दावा केला आहे की देशात दर १५ मिनिटांनी बलात्काराची घटना घडत असल्यामुळे अशा कायद्याची मागणी वाढली आहे. ते म्हणाले की, केंद्र सरकारने संसदेच्या आगामी अधिवेशनात अध्यादेश किंवा बीएनएसएस दुरुस्तीद्वारे याबाबत निर्णायक कारवाई करावी आणि न्याय जलदगतीने दिला जाईल आणि ५० दिवसांच्या दोषींना शिक्षा ठोठावली जाईल अशा उपाययोजना कराव्यात. अपराजिता असो, शक्ती कायदा असो, दिशा असो किंवा पॉक्सो असो; केवळ कायदे कठोर करणे हे बलात्काराच्या प्रश्नाचे अंतिम उत्तर नाहीये, हे राजकीय नेत्यांनी आणि समाजाने लक्षात घ्यायला हवे. विशेषतः समाजाने भावनिकतेच्या भरात कायदे सुधारणांची मागणी सुरू केल्यास सरकारांचे आणि राजकीय नेत्यांचे काम सोपे होऊन जाते. ममतादीदींप्रमाणेच एखादा कठोरातील कठोर कायदा पुढचा–मागचा विचार न करता तयार केला जातो आणि जनताही झालं गेलं विसरून जाते. पण यामुळे मुळाशी असणारे मुद्दे तसेच कायम राहतात. ते पुढचे दुष्कृत्य घडेपर्यंत... !

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**गुरुवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२४**
भाद्रपद शु.९, बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९,क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, अदु:ख नवमी, भागवत सप्ताहारंभ, ज्येष्ठागौरी विसर्जन रात्रौ ९.५१ पर्यंत, वाशिम दोरक धारण, नक्षत्र : अनुराधा, **योग :** विष्कंभ, करण : गरज,
**सूर्योदय :** स.०६.०२ सूर्यास्त : सायं.०६.१७ वा,
**राहू काळ : दुपारी :** १:३० ते ३:००

**दिनविशेष**

*१९२६ : मराठी साहित्य संशोधक ग्रंथकार वि. ल. भावे यांचा स्मृतिदिन *१९५२ : किराणा घराण्याचे गायक–अभिनेते सवाई गंधर्व ऊर्फ रामचंद्र गणेश कुंदगोळकर यांचे निधन *१९८० : मराठी रंगभूमी अभिनेते सतीश दुभाषी यांचे निधन *१९८३ : ग्रेट रॉयल सर्कसचे नारायण वालावलकर यांचे निधन *१९९६ : चित्रपट अभिनेत्री पद्मा चव्हाण यांचे निधन.



**राशीभविष्य**

* मेष : आनंददायी दिवस. *वृषभ : नव्या ओळखी होतील. *मिथुन : छोटे प्रवास घडतील. *कर्क : प्रकृती सांभाळणे उत्तम. *सिंह : धनलाभाची शक्यता. *कन्या : कुटुंब कलह टाळा. *तुळ : गुंतवणूकीतून फायदा. *वृश्चिक : करमणुकीत वेळ जाईल. *धनु : वरिष्ठांची मर्जी राहील. *मकर : नोकरीत चांगले वातावरण. *कुंभ : कौटुंबिक ताणतणाव निवळेल. *मीन : पतीकडून कौतुक निवळेल.

**मेसेज आया**

पूजा करायच्या आधी विश्वास ठेवायला शिका....
बोलायच्या आधी ऐकायला शिका....
खर्च करायच्या आधी कमवायला शिका..
लिहायच्या आधी वाचायला शिका....
मरायच्या आधी जगायला शिका....




**मराठी व्याकरण**

### दंत्य वर्ण

जे वर्ण उच्चारताना आपल्या जीभेचे टोक वरच्या दातांच्या भागाच्या बाजूस टेकते त्यांना 'दंत्य' वर्ण असे म्हणतात. 'ॡ' हा स्वर व त्, थ, द्, ध्, न्, ल्, स् ही व्यंजने 'दंत्य वर्ण' आहेत.

**व्यक्तीविशेष**

### इरिन जोलिएट–क्युरी

इरिन जोलिएट–क्युरी या फ्रेंच वैज्ञानिक होत्या. प्रसिध्द शास्त्रज्ञ मेरी आणि पेरी क्युरी या दांपत्याच्या त्या कन्या होत. त्यांचा जन्म १२ सप्टेंबर १८९७ रोजी झाला. त्यांचे पती फ्रेडरीक जोलिएट हेही शास्त्रज्ञ होते. त्यांच्याबरोबर इरिन यांना १९३५ साली रसानशास्त्रातील संशोधनासाठीचा नोबेल पुरस्कार मिळाला. कृत्रिम रेडिओॲक्टीव्हीटीचा शोध त्यांनी लावला आणि या शोधासाठीच त्यांना नोबेल पुरस्कार मिळाला. अशा तऱ्हेने क्युरी कुटुंब हे सर्वाधिक नोबेल पुरस्कार मिळवणारे ठरले. १९२८ मध्ये त्यांनी त्यांचे पती फ्रेडरीक यांच्याबरोबर ॲटोमिक न्युक्लेईवर संशोधन सुरू केले. यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. विज्ञानाच्या इतिहासात त्यांचे नाव कोरले गेले ते त्यांनी लावलेलया कृत्रिम रेडीॲक्टीव्हीटीच्या शोधामुळे. या शोधासाठीच त्यांना आणि फ्रेडरीक यांना १९३५ चे नोबेल पारितोषिक मिळाले. अतिशय स्फोटक आणि घातक रसायनांच्या सान्निध्यात राहून संशोधन करण्याचा परिणाम इरिन यांच्या शरीरावर झाला. त्यांना रक्ताच्या कर्करोगाने ग्रासले. या आजारातच वयाच्या ५८ व्या वर्षी १७ मार्च १९५६ रोजी त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

### दूरदृष्टी

एक रानडुक्कर आपल्या सुळ्यांना दगडावर धार लावत बसले होते. समोरून एक कोल्हा आला. त्याने रानडुकराकडे पाहिले आणि विचारले, काय महाराज, काय करत आहात? रानडुक्कर म्हणाले, माझ्या सुळ्यांना धार लावत आहे. कोल्हा म्हणाला, आता तर कोणताच धोका नाही. उगीचच मूर्खासारखा वेळ का वाया घालवतो आहेस? रानडुक्कर काही बोलणार तेवढ्यात समोरून एक शिकारी येताना दिसला. आधी त्याने रानडुकरावर हल्ला करण्याच्या विचाराने त्याच्याकडे पाहिले. रानडुकराने आपले नुकतेच धार केलेले सुळे त्याला दाखवले. ते चमकणारे सुळे पाहून शिकारी घाबरला. पण त्याने तसे न दाखवता कोल्ह्यावर बाण सोडला. कोल्हा जागीच ठार झाला. **तात्पर्य : संकट सांगून येत नाही. ते झेलण्यासाठी सतत तयार असले पाहिजे.**

**भूगोल**

### पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरूवात थेरोपोड्स

सौरिशियन म्हणजे सरड्याच्या शारीरिक रचनेप्रमाणे असलेल्या डायनासोरचा हा एक उपप्रकार होता. हे प्राणी द्वीपाद होते आणि २३० दशलक्ष वर्षांपूर्वी ट्रियासिक कालखंडाच्या उत्तरार्धात ते पृथ्वीवर अस्तित्वात आले. या प्राण्यांचे सर्वांत जुने अवशेष दक्षिण अमेरिकेत सापडले आहेत. थेरोपोड्स डायनासोरच्या कालखंडातच म्हणजे २५० ते ६५ दशलक्ष वर्षांपूर्वी होतेच. शिकारी डायनासोरच्या कळपात या प्राण्यांचा समावेश केला जातो. थेरोपोड्ला पुढे अणकुचीदार नखे आणि पंजे असलेले लहान पायख, मजबूल जबडा आणि इंग्रजी एस आकाराप्रमाणे मजबूत असे मागचे पाय, असे अवयव होते. बहुतेक थेरोपोड्स गरम रक्ताचे आणि मांसाहारी होते. टी.रेक्स नावाचा महाभयंकर आणि महाकाय डायनासोर थेरोपोड्स असत. यात शाकाहारी थेरोपोडसही होते. शास्त्रज्ञांच्या मते पक्ष्यांचे डायनासोरशी जवळचे नाते आहे आणि त्यांची उत्क्रांती थेरोपोड्समधून झाली असावी. आर्कियोप्टेरिक्स हा लहान आणि पिसे असलेला पहिला पक्षी होता. तो डायनासोरच्या कालखंडातच अस्तित्वात होता.

**नवं संशोधन**

### सेरेसवर पाण्याचा बर्फ असलेली विवरे?

नासाच्या 'डॉन' या अंतराळयानाने सेरेस या खुजा ग्रहावरील बर्फाच्छादित विवरांचा शोध घेतला आहे. ही विवरे पाण्याचे बर्फ सामावून घेणारी असल्याचे दिसून आले. पाण्याचे रेणू धारण करण्याइतके वस्तुमान आणि अन्य बाबी सेरेसवर अनुकूल आहेत. तेथील कायमस्वरुपी अंधारात असलेल्या भागात अतितीव्र असे थंड हवामान आहे. बुध किंवा चंद्रावरील तापमानापेक्षाही ते थंड आहे. हवाई युनिव्हर्सिटीतील नॉर्बर्ट शॉर्गीफर यांनी याबाबतची माहिती दिली. या खुजा ग्रहाच्या काही भागांमध्ये विशेषतः ध्रुवीय भागात सूर्यकिरणे पोहोचत नाहीत. अशा भागांमध्ये अनेक विवरेही आहेत. या विवरांमधून पाण्याचा बर्फ असू शकतो, असे संशोधकांना वाटते. या खुजा ग्रहाच्या दक्षिण गोलार्धापेक्षा उत्तर गोलार्ध अधिक उजळ आहे. 'डॉन'वरील कॅमेऱ्याने त्याचा आकार, विवरे, मैदाने आणि अन्य भागांची छायाचित्रे टिपली आहेत. ही छायाचित्रे त्रिमितीय आहेत. त्यांच्या सहाय्याने एक अद्ययावत असे कॉम्प्युटर मॉडेल बनवण्यात आले आहे. 'सेरेस'च्या उत्तर गोलार्धात अनेक अशी ठिकाणे शोधण्यात आली आहेत जी कायमस्वरुपी अंधारातच असतात. त्यापैकी सर्वात मोठे ठिकाण हे सोळा कि.मी. व्यासाचे एक विवर आहे. ते उत्तर ध्रुवापासून ६५ कि.मी. अंतरावर आहे.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

क्रमांक ४३४

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | | | 4 |
| 3 | | 1 | |
| 4 | | 2 | |
| | | | 3 |

क्रमांक ४३३ चे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 3 | 1 | 4 | 2 |
| 4 | 2 | 3 | 1 |

**हास्यविनोद**

चुलबूल पांडेने रज्जोच्या हातावर काही पैसे ठेवले आणि म्हटले, हे पैसे घे आणि तुझ्यासाठी गाडी आण. रज्जो म्हणाली, मला नकोत हे पैसे. चुलबुल पांडे म्हणाला, प्रेमाने देतोय तर घे. नाही तर थप्पड मारूनही देऊ शकतो मी. रज्जो म्हणाली, प्रेम आणि थप्पडची मला भीती वाटत नाही, साहेब, पण ट्रॅफिकची भीती वाटते!

**महिलायन**

### बनवा 'मसाला गार्डन'

फोडणीसाठी लागणारी हिरवी मिरचीदेखील आपण घरी उगवू शकतो. हिरव्या किंवा लाल मिरचीच्या बिया सावलीत ठेवलेल्या कुंडीमध्ये पेरव्यात. काही दिवसांनी पाने येऊन त्याला मिरच्या लागतात.



अशाच प्रकारे पुदिन्याची दांडी आपण कुंडीत रोवून त्याचे रोप लावू शकतो. पुदिन्याला पाणी जास्त लागते. उन्हाळ्यात पुदिन्याची चटणी, जलजिरा, रायते किंवा कैरीच्या पन्ह्यात ही पाने उपयोगात आणली जाऊ शकतात. तुळस तर आपल्या घराघरात असतेच. तुळशी लावण्यासाठी सुकलेल्या मंजिऱ्या हाताने चोळून मातीत टाकाव्यात. काही दिवसांनी त्याला पालवी फुटते. तुळशीचं रोप वातावरण शुद्ध करते. तसेच सर्दी–खोकल्यामध्येदेखील तुळशीचा काढा औषधी ठरतो.

बडीशेप देखील आपण कुंडीत लावू शकतो. धन्याप्रमाणेच बडीशेपही थोडी हाताने रगडून एखाद्या पसरट खोक्यामध्ये पेरावी. हिरव्यागार रोपांमध्ये बडीशेपचे गुच्छ आणि बारीक–बारीक लांब पाने फार सुंदर दिसतात. शिवाय ओली बडीशेप चवीलाही फार गोड असते. दृष्टी सुधारण्यासाठी, पोट साफ ठेवण्यासाठी आणि माऊथ फ्रेशनर म्हणून असे बरेच उपयोग आहेत.

मसाल्याच्या रोपे उत्तम पध्दतीने वाढण्यासाठी नेहमी शेणखत वापरावे. या रोपट्यांना कीड लागल्यास लिंबाचा पाला पाण्यात उकळवून ते पाणी गार करून रोपांवर शिंपडावे. पाण्याच्या धारेने किडे टाकून टाकावेत. याबरोबरच या रोपांची सुकलेली पाणी वेळोवेळी काढून टाकावी आणि नियमित पाणी घालावे. एवढी काळजी घेतली तर तुमचे मसाला गार्डन नेहमीच ताजेपणा, स्वाद आणि स्फूर्ती देत राहील. **(उत्तरार्ध)**


**घरगुती औषध**

### कौंडळ

हे मोठे विरेचन द्रव्य आहे. कौंडळाच्या फळातील गीर अर्धा ग्रॅम १० ग्रॅम गोमूत्रातून घेतात. चांगले दोन दस्त (जुलाब) होतात. हे पोटातील सर्व विकारांवर देतात. सैंधव, पादेलोण (काळे मीठ किंवा संचळ) जवखार, ही सर्व औषधे पाव ग्रॅम घेतल्याने वाढलेले यकृत बरे होते. कौंडाळाची बारीक पूड करून कोमट अशा खोबरेल तेलात खलून एकजीव करावे. ते कानातील व्रण बरे होण्याच्या कामी फार उपयोगी पडते. या फळांचा रस काढून तो तेलात मिसळावा. नंतर आटून जाईपर्यंत ते तेल मंदाग्नीवर गरम करावे. मग थंड झाल्यावर ते डोक्यास चोळले असता पुष्कळ दिवसांचे डोके दुखणे थांबते.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com



# हिरे देणारी अनोखी नदी



जर नशिबात पैसा असेल, कोट्यधीश व्हायचे स्वप्न पाहात असाल, तर मध्य प्रदेशमधील एका नदीत नशीब आजमावण्यास निश्चितच हरकत नसेल. कारण, या नदीत वाहून येणारे छोटे-मोठे दगड, रेती चाळून रातोरात नशीब बदलू शकते. हे खरोखर घडले आहे. या नदीला पूर येतो तेव्हा पाण्याबरोबर हिरेही वाहून येतात, असे इथे सांगितले जाते.

ही नदी मध्य प्रदेशात बुंदेलखंडच्या पन्ना जिल्ह्यात आहे. अजयगड तालुक्यात उगम पावणाऱ्या या नदीचे नाव रुंझ असे आहे. पावसाळ्यात ही नदी पुराबरोबर हिरेही घेऊन येते, असे म्हटले जाते. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात नदीकाठी अनेक लोक खडी आणि दगड-रेतीमध्ये हिरे शोधताना दिसतात.

या नदीतून २ वर्षांपूर्वी एका शेतकऱ्याला ७२ कॅरेटचा हिरा सापडला होता. ही बातमी पसरताच हजारो लोक हिऱ्याचा शोध घेण्यासाठी पोहोचले होते; मात्र हा परिसर वनविभागाच्या हद्दीत येत असल्याने सर्वांना तेथून हटवून नदीकिनारी येण्यास बंदी घालण्यात आली. त्यानंतरही लोक गुपचूप नदीकाठी पोहोचतात. असे हिरे शोधून लोक आपले नशीब आजमावतात. हा हिरा जितका मौल्यवान आहे, तितकाच तो मिळवणे महाकठीण आहे, ही याची आणखी एक खासियत. नदीकाठी लोक फावडे, संबळ, तसला आणि जाळीच्या टोपल्या घेऊन हिऱ्यांच्या शोधात येतात. आजही रुंझ नदीच्या काठी काही नादिष्ट लोक हिऱ्याचा शोध घेताना दिसतील. नदीच्या खालच्या भागाव्यतिरिक्त दोन्ही किनाऱ्यांवर त्यांचा शोध सुरू असतो.

नदीतून आलेली रेती टोपलीत घालून बाहेर काढतात आणि त्यातून हिरा शोधतात. याशिवाय प्रवाह जास्त असलेल्या भागात जाळीच्या टोपल्यांच्या साहाय्याने शोध घेतला जातो. नदीकाठचे दगड खोदूनही हिरे शोधतात. प्रत्येकजण आपापल्या परीने मेहनत घेतो; पण जो सर्वात नशीबवान आहे त्याला खजिना मिळतो.

या नदीवर रुंझ धरण बांधण्यात येत असून, त्याचे काम वेगाने सुरू आहे. सुमारे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. लवकरच धरणाचे बांधकाम पूर्ण होईल आणि हा नदीचा परिसर बॅकवॉटर म्हणून पाण्यात जाईल. धरण बांधल्यानंतर नदीचा हा परिसर शेकडो फूट खोल पाण्यात बुडणार आहे. त्यानंतर कदाचित लोकांचे इथे येणेही बंद होईल आणि हिऱ्यांचा शोधही थांबेल.

# 'मिल्की वे'वर नवा प्रकाश

आपली सौरमालिका ज्या आकाशगंगेचा (गॅलेक्सी) एक भाग आहे तिला मिल्की वे असे नाव आहे. आपली ही आकाशगंगा पूर्वी वाटत होती त्यापेक्षा आकाराने अधिक मोठी आहे, असे एका अभ्यासात निष्पन्न झाले आहे. आपल्या आकाश गंगेसारख्या सर्पिलाकार दीर्घिका या फार मोठ्या व वस्तुमानाने आपण मानत होतो, त्यापेक्षा जास्त आहेत, असे कोलॅरडो विद्यापीठाच्या वैज्ञानिकांनी हबल दुर्बीण वापरून केलेल्या संशोधनात म्हटले आहे.

प्रा. जॉन स्टॉक यांनी या अभ्यासाचे नेतृत्व केले असून, त्यांनी सांगितले की, हबलच्या ७ कोटी डॉलर किमतीच्या कॉस्मिक ओरिजिन्स स्पेक्ट्रोग्राफ या उपकरणाचा वापर यात करण्यात आला आहे. त्यात असे दिसून आले आहे की, या सर्पिलाकार दीर्घिकांच्या सभोवती वायूंचे आवरण आहे. त्याचा व्यास १० लाख प्रकाशवर्षे इतका असू शकतो. सध्या आपल्या आकाशगंगेचा व्यास हा एक लाख प्रकाशवर्षे असल्याचे मानले जाते. यात एक प्रकाशवर्ष म्हणजे ६ ट्रिलियन मैल इतके अंतर असते. स्फोट होणारा अतिनवताऱ्यांच्या माध्यमातून दीर्घिका या त्यांच्या सभोवतालच्या वायुरूप आवरणातील घटक बाहेर टाकत असतात. हा बाहेर टाकला गेलेला वायू पुन्हा साठवला जाऊन त्याचे फेरचक्रीकरण केले जाते व तो पुन्हा दीर्घिकांच्या आवरणाकडे जातो व पुन्हा त्यातून नवीन ताऱ्यांच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू राहते. दीर्घिकांची निर्मिती कशी होती यातील निखळलेला दुवा आपल्याला आता सापडला आहे, त्यामुळे या निर्मितीच्या प्रक्रियेचे पूर्ण चित्र स्पष्ट होते, असे स्टॉक यांचे मत आहे. अगोदरच्या संशोधनात असे प्रतिपादन करण्यात आले होते की, सर्पिलाकार दीर्घिकांच्या भोवती असलेल्या ऑक्सिजन समृद्ध वायुमेघांचे अस्तित्व आहे. स्टॉक व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मते या मेघांचे वस्तुमान हे त्यांच्या संबंधित दीर्घिकांमधील एकूण ताऱ्यांइतके आहे. हे अतिशय आश्चर्यकारक आहे व त्यामुळे सर्पिलाकार दीर्घिका कशा बनत गेल्या या निर्मिती प्रक्रियेवर नवीन प्रकाश पडणार आहे, असे स्टॉक यांनी सांगितले. वैज्ञानिकांच्या मते सर्पिलाकार दीर्घिकांभोवतीच्या वायुमंडलाचे तापमान लाखो फॅरनहीट आहे. पण, त्यांची प्रभामंडले मात्र तुलनेने हजारो फॅरनहीट कमी तापमानाची आहेत.



# सावधान, झाड विषारी आहे!

***जगभरात अनेक गोष्टी सापडतील, ज्या अत्यंत विषारी आहेत. यामुळे मानवाचा जीवही जाण्याची शक्यता असते. आज आपण अशा काही झाडांविषयी माहिती जाणून घेणार आहोत, जे खूप विषारी आहेत. याच्या संपर्कात आल्यास क्षणात जीवही जाऊ शकतो.***



**एरंडेल बिया :** सर्वांना एरंडेल बियांची माहिती असेलच, तेल बनवण्यासाठी या बिया वापरल्या जातात. हे तेल खूप फायदेशीर आहे. रिसिन नावाचे विष त्याच्या बियांमध्ये आढळते. यामुळे एखाद्या मुलाचा जीव देखील जाऊ शकतो.

**वॉटर हेमलॉक :** वॉटर हेमलॉक ही सर्वात विषारी वनस्पती मानली जाते, ज्यामध्ये सिक्युटॉक्सिन नावाचे विष आढळते. हे चुकून मानवाच्या शरीरात गेल्यास मृत्यू होण्याची शक्यता असते.

**डेडली नाईटशेड :** डेडली नाईटशेड या वनस्पतीमध्ये ट्रॉपिन आणि स्कोपोलामाईन नावाची विषारी रसायने असतात. यामुळे शरीराचा काही भाग निकामी होऊ शकतो. त्यामुळे यापासून दूर राहावे.

**ऑलिंडर :** ऑलिंडर वनस्पतीमध्ये कार्डियाक ग्लायकोसाइड्स आढळतात. ही वनस्पती जर कोणी ते खाल्ली तर उलट्या आणि जुलाब सुरू होतात आणि यामुळे मृत्यू देखील होतो.

**रोझरी पी :** रोझरी पीच्या बियांमध्ये एब्रिन नावाचे प्रथिन आढळते, जे अत्यंत घातक आहे. हे शरीरातील राइबोसोम्सचे कार्य थांबवते, ज्यामुळे शरीरातील पेशी मरायला लागतात. हे जीवघेणे ठरू शकते.

**तंबाखू :** तंबाखूच्या वनस्पतीमध्ये अल्कलॉइड्स निकोटिन आणि ॲनाबासिन नावाचे विष आढळते. जे कर्करोग आणि हृदयाशी संबंधित आजारांना आमंत्रण देते. यामुळे मृत्यूही होऊ शकतो.

# अनोखा योगायोग



एखाद्या कुटुंबामध्ये दोन किंवा तीन अपत्ये असणे आधुनिक काळात आता वेगळी बाब राहिलेली नाही पण जेव्हा एखाद्या कुटुंबातील सर्व अपत्यांची जन्मतारीख समान असते तेव्हा मात्र ती कुतुहलाची गोष्ट होते. फ्लोरिडातील एका दांपत्याच्या नावावर अशाच प्रकारचा विक्रम जमा झाला आहे. या दांपत्याने चार वर्षांच्या कालावधीमध्ये तीन मुलींना जन्म दिला असून सर्व मुलींची जन्मतारीख ३ सप्टेंबरच आहे. या दाम्पत्यातील पत्नीने आपल्या तिसऱ्या मुलीला ३ सप्टेंबर २०२३ रोजी जन्म दिला. जेरेमी आणि सॉवरी टर्नर असे या दांपत्याचे नाव असून सॉवरीने गेल्या चार वर्षांच्या कालावधीमध्ये तीन मुलींना जन्म दिला असून प्रत्येकाची जन्मतारीख ३ सप्टेंबर हीच आहे. खरेतर तिसऱ्या मुलीच्या जन्मासाठी डॉक्टर्सनी ७ सप्टेंबर ही तारीख दिली होती, पण तिसऱ्या मुलीचा जन्म सुद्धा पहिल्या दोन मुलींप्रमाणेच ३ सप्टेंबर रोजीच झाला.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तीनही मुलींचा जन्म नैसर्गिक पद्धतीने झाला असून कोठेही सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आलेली नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या तीनही मुलींवर समान प्रकारची जन्मखूण आहे आणि जन्म होत असताना या तिन्ही मुलींचे वजनही समानच होते आणि उंची सुद्धा समान होती.

पहिल्या मुलीचा जन्म म्हणजे जसमीन टर्नरचा जन्म ३ सप्टेंबर २०२० रोजी झाला त्यानंतर वर्षभराने ३ सप्टेंबर २०२१ रोजी जेसीका टर्नरचा जन्म झाला. तर ३ सप्टेंबर २०२३ रोजी जुलिया टर्नरचा जन्म झाला.

आम्ही याबाबत कोणतेही नियोजन केले नव्हते. हा सर्व नैसर्गिक चमत्कार आहे. अशी माहिती टर्नर दांपत्याने दिली आहे. या मुलींचा जन्म ज्या

**जन्मदर वाढवण्यासाठी आर्थिक अनुदान**

लग्नाबद्दल समाजात अनेक प्रकारच्या समजुती आहेत. जगात दक्षिण कोरिया असाही एक देश आहे जिथे सरकार नवविवाहित जोडप्यांना ३१ लाख रुपये प्रोत्साहन म्हणून देतं. दक्षिण कोरिया एका वेगळ्याच संकटातून जात आहे. या देशाला जगातल्या सर्वांत कमी जन्मदराचं संकट भेडसावत आहे. या समस्येला तोंड देण्यासाठी सरकारने नागरिकांना पैसे देण्यास सुरुवात केली आहे. सरकार नागरिकांना लग्नासाठी प्रोत्साहन देत आहे, जेणेकरून जन्मदर वाढू शकेल. सध्या दक्षिण कोरियातला जन्मदर जगात सर्वात कमी आहे.

# इथे लग्नासाठीही सरकारी प्रोत्साहन

त्यामुळे लोकसंख्येचं संकट निर्माण झालं आहे. देशातला जन्मदर दर प्रति महिला ०.७२ पर्यंत घसरला आहे. इथलं स्थानिक आणि केंद्र सरकार जन्मदर वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहेत. सरकार नवीन धोरणांद्वारे, तसंच रोख रकमेद्वारे जोडप्यांना लग्न करण्यासाठी आणि मुलं जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहित करत आहे.

दक्षिण कोरियातलं सरकार लग्नासाठी पैसे देत असल्याची पोस्ट व्हायरल होताच या पोस्टवर लोकांनी खूप कमेंटही केल्या आहेत.

**जपानचेही लग्नासाठी प्रोत्साहन**

जपानही अशाच संकटातून जात आहे. जपानमधला जन्मदर ५० वर्षांतल्या विक्रमी पातळीवर घसरला आहे. ५० वर्षांपूर्वी तिथला वार्षिक जन्मदर ५० लाख होता, तो घटून ७ लाख ६० हजारांवर आला आहे. सरकारचा अंदाज आहे, की २०३५ पूर्वी त्यात वाढ होईल. सरकारने याबाबत अनेक नियम केले



आहेत. आता सरकार नागरिकांना मुलं जन्माला घालण्यासाठी आणि लग्न करण्यासाठी प्रोत्साहन देत आहे.

# जपानमध्येही 'लखपती दीदी'

जपानमध्ये वृद्धांची वाढणारी मोठी संख्या आणि तरुणांची कमी संख्या ही गंभीर बाब बनली आहे. जन्मदर कमी झाल्याने मुले आणि मुलींच्या प्रमाणात मोठी तफावत निर्माण झाली आहे. परिणामी, ग्रामीण भागातील महिलांची घटती संख्या व अविवाहितांची वाढती संख्या ही सरकारसमोरील नवे संकट आहे. महिलांच्या घटत्या लोकसंख्येमुळे तरुणांना लग्नासाठी मुली मिळत असल्याने या समस्येवर मात करण्यासाठी जपान सरकारने एक नवीन योजना सुरू केली आहे.

सरकार अविवाहित महिलांना मोठ्या प्रमाणात पैसे देऊन त्यांना ग्रामीण भागात स्थायिक होण्यासाठी मोठी ऑफर देत आहे. जेणेकरून त्यांनी तेथे लग्न करावे आणि महिलांच्या घटत्या लोकसंख्येचा प्रश्न सुटेल. अविवाहित महिलांना टोकियो शहरातून ग्रामीण भागात लग्नासाठी जाण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असून, असे करणाऱ्या प्रत्येक महिलेला ६ लाख रुपये सरकारतर्फे दिले जात शिक्षणासाठी किंवा कामासाठी येणाऱ्या तरुणींचा कल बदलेल आणि त्या ग्रामीण भागात राहून स्वयंरोजगार सुरू करतील. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांच्या लोकसंख्येमध्ये समतोल राखण्याचा आहे. जपान टाईम्सच्या मते, सरकार महिलांसाठी मॅचमेकिंग कार्यक्रमांसाठी प्रवास खर्चदेखील देण्याच्या तयारीत आहेत. या सोबतच त्यांना अतिरिक्त आर्थिक मदत करण्याचीदेखील सरकारची तयारी आहे.





# इस्रायलमध्ये फुटले ३५०० वर्षांपूर्वीचे भांडे !

प्राचीन काळातील वस्तूंचे कसोशीने जतन केले जात असते. वैज्ञानिक संशोधनाबरोबरच तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक स्थिती समजून घेण्यासाठी व लोकांसाठीच्या प्रदर्शनासाठीही अशा वस्तू जतन केल्या जातात. असेच एक प्राचीन भांडे इस्रायलमध्ये होते. इस्रायलच्या संग्रहालयातील तब्बल ३५०० वर्षे जुने असलेले हे भांडे चार वर्षांच्या मुलाच्या चुकीने नुकतेच तुटले. इस्रायलच्या हैफा युनिव्हर्सिटीमध्ये असलेल्या हेक्ट म्युझियममध्ये ही घटना घडली.

ॲलेक्स नावाचा एक गृहस्थ आपल्या चार वर्षांच्या मुलासोबत संग्रहालयाला भेट देण्यासाठी आला होता. येथे त्यांच्या मुलाने चुकून एक पुरातन भांडे पाडले. यामुळे ते भांडे फुटले. ॲलेक्स म्हणाला, ''माझ्या मुलाला भांड्यात काय आहे ते पाहायचे होते. त्यामुळे त्याने भांडे ओढण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे ते खाली पडले. यानंतर मी तेथील सुरक्षा अधिकाऱ्याला याबाबत सांगितले. हे भांडे कांस्य युगातील असल्याचे संग्रहालयाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. म्हणजे ते राजा शलमोनच्या काळापूर्वीचे आहे. हे भांडे इ.स.वी. सनपूर्व २२०० ते १५०० दरम्यान बनविले गेले असे मानले जाते. त्याची वैशिष्ट्ये प्राचीन कनानशी संबंधित असलेल्यांशी जुळतात. या भागात सध्याच्या इस्रायल आणि पॅलेस्टाईनचा काही भाग समाविष्ट आहे.



वाइन आणि ऑलिव्ह ऑईल वाहून नेण्यासाठी या भांड्याचा वापर केला गेला असावा, असे मानले जाते. संग्रहालयातील कर्मचाऱ्यांनी सांगितले की, अनेकदा खोदकाम करताना सापडलेली भांडी तुटलेली किंवा अपूर्ण असतात. हे भांडे अखंड सापडले होते, म्हणून ते खूप मौल्यवान होते. ते संग्रहालयाच्या मुख्य गेटजवळ ठेवण्यात आले होते. या भांड्याची पुन्हा दुरुस्ती केली जाणार असली, तरी ती पूर्वीसारखी कधीच होणार नाही. हेक्ट म्युझियममधील सर्व पुरातत्त्वीय वस्तूंसमोर काच लावलेली नाही. संग्रहालयाचे महासंचालक डॉ. इनबाल रिव्हलिन म्हणाले की, त्याचे संस्थापक डॉ. रुबेन हेक्ट यांनी हा ट्रेंड सुरू केला होता. याद्वारे लोक ऐतिहासिक वस्तू जवळून अनुभवू शकतात, असा त्यांचा विश्वास होता. डॉ. रिव्हलिन म्हणाले की, काहीवेळा वस्तूंचे हेतुपुरस्सर, खोडसाळपणाने नुकसान केले जाते. अशा प्रकरणांमध्ये कारवाई केली जाते. मात्र, या प्रकरणात तसे झाले नाही. त्यांनी सांगितले की, मुलाला आणि त्यांच्या कुटुंबाला पुन्हा संग्रहालयाला भेट देण्यासाठी आमंत्रित केले आहे. जगभरातील अनेक संग्रहालयांमध्ये अशा घटना घडल्या आहेत. २०१० मध्ये न्यूयॉर्क शहरातील मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्टमध्ये पिकासोच्या पेंटिंगला एका महिलेची टक्कर झाली. अशाच आणखी एका प्रकरणात, २०१६ मध्ये शांघाय म्युझियम ऑफ ग्लासमधील पुतळा एका मुलाने खाली खेचला होता.

## दहा वर्षांच्या प्रश्नाने चऱ्होली नागरिक बेजार

# निवडणुका येताच आ. लांडगेना आली जाग !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही महाराष्ट्रातील सर्वाधिक पुढारी महानगरपालिका समजले जाते. पिंपरी चिंचवड हे देखील एक सू-नियोजनबद्ध शहर म्हणून विकसित होत आहे तथापि येथील काही विस्तारित भागाच्या समस्या आजही संपलेल्या नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून येथे भाजप आमदार महेश लांडगे यांचे प्रभुत्व आहे. या भागांमध्ये चऱ्होली परिसरात विस्तारलेल्या भाजी मंडईचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला आहे. येथील भाजी विक्रेतेच नाही तर येथे येणाऱ्या नागरिकांना आणि आजूबाजूच्या ग्रामस्थांना देखील यामुळे मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करून देखील हा प्रश्न मिटलेला नाही.

सध्या निवडणुकांचे पडघम सुरू असल्यामुळे मात्र प्रत्येक आमदार अशा समस्याग्रस्त भागांना भेटी देऊन अधिकाऱ्यांना निर्देश देण्याचे काम करत आहेत. झपाट्याने विस्तारलेल्या चऱ्होली परिसरामध्ये म्हसोबा चौकातील भाजी मंडईचा हा प्रश्न सोडविण्यासाठी आता महेश लांडगे यांनी अधिकाऱ्यांच्या लवाजम्यासह येथे भेट दिली आहे.

गेली अनेक वर्ष येथे लोकप्रतिनिधी नव्हे तर महापालिकेमध्ये देखील भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे परंतु या भागात समाविष्ट झालेल्या विकास कामांना मात्र अपेक्षित चालना मिळालेली नाही.

महेश लांडगे यांनी यापूर्वी देखील व्हिजन 20-20 च्या माध्यमातून समाविष्ट गावांचा विकास करण्याच्या घोषणा केल्या. त्यापैकी बरेचसे कामे झाली. परंतु विस्तारित परिसरातील कामे मात्र मोठ्या प्रमाणामध्ये प्रलंबित आहेत. वाढत्या नागरिकीकरणामुळे या भागात भाजीपाला खरेदी करण्यासाठी चरोली बुद्रुक परिसरातील म्हसोबा चौकात भाजी मंडई उभारण्याची मागणी गेली अनेक वर्षे होत होती याबाबत सचिन तापकीर यांनी देखील अनेकदा आंदोलने केली. तसेच लांडगे यांच्याकडे देखील याबाबतचे मागणी करण्यात आली होती. भाजी मंडईचे काम हाती घेण्यात आले ते बहुतांशी पूर्ण झाले, परंतु तेथे मूलभूत सुविधांचा अभाव होता स्वच्छतागृहांची सुविधा नव्हती तसेच किरकोळ कामे राहिल्यामुळे ही भाजी मंडई उपयोगामध्ये येऊ शकत नव्हती. एकतर पूर्वीची अपुरी भाजी मंडई, रस्त्यावरती भाजीपाला विक्रेत्यांचे एक प्रकारचे अतिक्रमण, अपुरा रस्ता, स्वच्छतागृहाच्या असुविधा या सगळ्या समस्यांच्या जाळ्यामध्ये नवीन भाजी मंडई बांधून तयार असताना देखील ती विना वापरा पडून आहे.

आता निवडणुकांचे पडघम वाजल्यानंतर सर्वच लोकप्रतिनिधींना स्थानिक समस्यां-बद्दल आक्रमक भूमिका घेण्याची अपरिहार्यता असल्याचे दिसून येते. काल चऱ्होली भागातील या भाजी मंडई बाबत आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना बोलावत त्यांच्या समोर येथील कामे तातडीने मार्गी लावण्याचे आदेश सोडले.

किमान निवडणुकांची जाणीव झाल्यामुळे तरी चऱ्होली भाजी मार्केट अस्तित्वात येऊ दे आणि येथील भाजीविक्रेत्यांचे तसेच खरेदीदारांच्या अडचणी वरती मार्ग निघू दे अशी प्रार्थना आता येथील नागरिक गणरायाला करीत आहेत.

> "भाजी मंडईला अधिकृत जागा नसल्याने रस्त्यावर दुकाने लावावी लागत आहेत. या दुकानांवर महापालिका प्रशासनाच्या अतिक्रमण विरोधी पथकाची कधी वक्रदृष्टी पडेल ते सांगता येत नाही. त्यामुळे आमचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. तरी महापालिका प्रशासनाने आम्हा भाजीविक्रेत्यांसाठी भाजी मंडईचा प्रश्न लवकर सोडवावा
>
> - भाजी विक्रेता.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## उबाठा चालेल पण शरद पवार विरुद्ध नको...

### आमदारांना भीती

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणूक शरद पवार विरुद्ध, अशी नको, अशी भीती अजित पवार यांच्या गटाने व्यक्त केली आहे. काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) विरुद्ध निवडणूक व्हायला हरकत नसल्याचे या आमदारांनी म्हटल्याची माहिती समजते. लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांची ताकद दिसून आली आहे. याचा धडका सर्वच राजकीय पक्षांनी घेतला आहे.

विधानसभा निवडणूक काही दिवसांवर आली आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागण्याचा आढावा घेणे सुरू केले आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनीही निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पोल जाहीर होत आहे. काही पोल महायुतीच्या बाजूने तर, काही पोल महाविकास आघाडीच्या बाजूने समोर येत आहे. त्यामुळे शरद पवार यांनी संपूर्ण महाराष्ट्रात संपर्क वाढवायला सुरुवात केली आहे. त्यांचे तुतारी चिन्ह सध्या चांगलेच गाजत आहे. पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्याचा धसका घेतल्याचे दिसून आले.

कोणत्याही परिस्थितीत महायुतीचे सरकार पडणार पडणार असल्याचा निर्धार महाविकास आघाडीतर्फे करण्यात आला आहे. विश्वासघात करून आमदार पडविण्यात आल्याचा आरोप होत आहे. खासदार अमोल कोल्हे यांनीही या आमदारांना गद्दार म्हटले आहे. शरद पवार यांचा नाद भले भले करीत नाही. त्यामुळे आपले काही खरे नाही, अशी भीती हे आमदार भीती व्यक्त करीत आहे.



## कोंडीतून सुटका..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**रहाटणी :** नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या पुढाकाराने काल मध्यरात्री महापालिकेच्या बीआरटीएस विभाग व वाहतुक पोलीस विभाग यांच्या वतीने शिवार चौक याठिकाणी असलेला सर्कल काढुन टाकण्यात आला.

## शिवार चौकातील वाहतुक कोंडीतून नागरिकांची सुटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रहाटणी :** महापालिकेच्या बीआरटीएस विभाग व वाहतुक पोलीस विभाग यांच्या वतीने शिवार चौक याठिकाणी असलेला सर्कल काढुन टाकण्यात आला. त्यामुळे आता शिवार चौकातील वाहतुक कोडीतुन नागरिकांची सुटका होणार आहे. प्रभाग क्र.२८ रहाटणी - पिंपळे सौदागर येथील शिवार चौक हा नाशिक फाटा ते हिंजवडी बीआरटीएस रस्त्या वरील मुख्य चौक असुन शहरातील व परिसरातील नागरिकाना येण्या जाण्यास हा रस्ता सोयीस्कर असुन नागरिक या रस्त्याचा वापर जास्त प्रमाणात करतात. त्यामुळे शिवार चौक येथे नेहमीच वाहनांची वर्दळ असते यामुळे या चौकात नेहमीच वाहतूक कोंडी होत असते.

याचा नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत होता याबाबत परिसरातील नागरिकांनी व सोसायटीतील रहिवासी यांनी देखील या वाहतुक कोडी बाबत नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्याकडे तक्रारी करीत होते. त्यानुसार नाना काटे यांनी वेळोवेळी वाहतुक विभाग व संबधित महापालिकेच्या बीआरटीएस विभागाशी चर्चा करून वाहतुक कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी व नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी शिवार चौकातील सर्कल काढण्याचा सुचना केल्या होत्या. यानुसार काल मध्यरात्री महापालिकेच्या बीआरटीएस विभाग व वाहतुक पोलीस विभाग यांच्या वतीने शिवार चौक याठिकाणी असलेला सर्कल काढुन टाकण्यात आला . त्यामुळे आता शिवार चौकातील वाहतुक कोंडीतून नागरिकांची सुटका होणार आहे. नाना काटे यांनी दाखवलेल्या तत्परतेचे व नागरकिंची वाहतुक कोंडीतून सुटका केल्या बद्दल नागरिकांनी नाना काटे व शितलताई काटे यांचे आभार मानले आहेत.

## पिंपरीत बुजवले तब्बल 4000 खड्डे; महानगरपालिका प्रशासनाचा दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिंचवड भागामध्ये यंदाच्या पावसाळ्यात पडलेल्या खड्ड्यांपैकी तब्बल 4000 खड्डे बुजवल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. तथापि या पुढील रस्त्यांची निगा राखली जावी तसेच रस्ते बांधणी आणि दुरुस्ती यामध्ये दर्जात्मक आणि गुणात्मक वाढ व्हावी म्हणून पुढील वर्षीपासून कंत्राटदार उप अभयंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यावर रस्त्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. यंदाच्या पावसाळ्यामुळे पुण्यामध्ये रस्त्यांचे मोठे नुकसान झाले एक जून पासून पिंपरी चिंचवड मध्ये तब्बल पाच हजाराहून अधिक खड्डे असल्याचे प्रशासनाने सांगितले त्यापैकी 4487 खड्डे बुजवली असल्याचे अधिकृत माहिती देण्यात आली तर आणखी सहाशेहून अधिक खड्डे बुजवणे बाकी असल्याचे सांगण्यात येते.

पिंपरी चिंचवड नवी सांगवी जुनी सांगवी ताथवडे पुनावळे निगडी आकुर्डी चिखली थेरगाव या परिसरातील रस्त्यांवरती खड्डे पडले होते हे खड्डे या हंगामातील सर्वाधिक खड्डे असल्याचे देखील प्रशासनाने मान्य केले खड्ड्यामध्ये पाणी साचून राहत असल्यामुळे चालकांना खड्ड्याचा अंदाज येत नाही त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये अपघात घडतात.



रस्त्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पुढील वर्षीपासून मात्र काही कठोर निर्णय घेणार असल्याचे देखील सिंह यांनी सांगितले.

## शिवसेना उपनेत्या नीलमताई गोऱ्हे यांचा

# 'लाडक्या बहिणीं'शी मनमोकळा संवाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गौरी आवाहनाच्या निमित्ताने उपसभापती नामदार नीलमताई गोरे यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड मधील भागामध्ये सर्वसामान्यांच्या घरामध्ये जाऊन महिलांचे संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्री लाडके बहीण योजनेबाबत त्यांनी मते जाणून घेतली. उपसभापती आपल्या घरी आल्याचा आनंद येथे नागरिकांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.
नीलमताई गोरे यांनी देखील अत्यंत एक सामान्य गृहिणी प्रमाणे या कुटुंबाशी सहज संवाद साधला. त्यांच्या घरामध्ये बसून एखाद्या मैत्रिणी प्रमाणे त्यांनी कुटुंबाशी गप्पागोष्टी केल्या.



उपसभापती घरी आल्याचे पाहून महिला भारावल्या

लाडकी बहीण योजनेबाबत काय वाटते पैशाचे काय केले कुठे खर्च करणार पुढे काय करणार असे अनेक कौटुंबिक प्रश्न विचारून गोरे यांनी महिलांची कौटुंबिक संवाद साधला.

त्यावेळी अनेक महिलांनी अशा पद्धतीने पैसे मिळतील हे वाटले नव्हते असे मोकळेपणाने सांगितले तर आपल्या पतीनेही अशा पद्धतीचे पैसे कुठे मिळतात का असे प्रश्न केल्याचेही सांगितले या पैशाचा उपयोग मुलीच्या शिक्षणाकरता करणार असाही संकल्प अनेकांनी बोलून दाखवला.
त्यावेळी नीलम ताई यांनी सांगितले की महिला सक्षमीकरणाचा पुढचा पल्ला खूप आव्हानात्मक आहे मोठ्या प्रमाणात सुरक्षेसाठी कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा उभे करायचे आहे यावेळी त्यांच्यासोबत पुणे शिरूर लोकसभा महिला संपर्कप्रमुख सारिका पवार मनीषा पलांडे उपस्थित होते.

यावेळी मालम चौगुले अनिता गालफाडे नूर जहा सुर्वे पोर्णिमा पात्रे शोभा पात्रे अस्मिता राजगुरू मोना मोहिते या सर्वसामान्य महिलांनी गोरे यांच्याशी संवाद साधला.

## स्वरोपासना ग्लोबल म्युझिक अ‍ॅकॅडमी पुनावळे शाखेचे उद्‌घाटन

# "संगीत जीवनाला अर्थपूर्ण बनवते" - राजन लाखे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "संगीत आणि कोणत्याही कलेची साधना जीवनाला अर्थपूर्ण बनवते!" असे विचार सुप्रसिद्ध कवी आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी - चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे यांनी बुधवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजी थिआ बिझनेस पार्क, ईला, काटेवस्ती, पुनावळे येथे व्यक्त केले. स्वरोपासना ग्लोबल म्युझिक अ‍ॅकॅडमीच्या पुनावळे शाखेचे उद्‌घाटन करताना राजन लाखे बोलत होते. अभियंता सुधीर कुलकर्णी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी - चिंचवड शाखासदस्य किरण जोशी, मोहन कस्पटे, भाग्यश्री कुलकर्णी, प्रतीक पवार, अमोल सावंत, विद्या धोंडरकर, स्वरोपासना ग्लोबल म्युझिक अ‍ॅकॅडमीचे संचालक अभय कुलकर्णी, अर्पिता कुलकर्णी, अथर्व कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.



राजन लाखे पुढे म्हणाले की, "संगीत ही वैश्विक भाषा आहे. पिंपरी - चिंचवड सारख्या उद्योगनगरीत संगीत साधनेसाठी स्वरोपासना अ‍ॅकॅडमीच्या माध्यमातून एक सुसज्ज दालन उपलब्ध झाले आहे; तसेच सुमारे दहा देशातील विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने संगीत शिक्षण घेत आहेत, ही कौतुकास्पद बाब आहे!" लाखे यांनी आपल्या मनोगताचा समारोप करताना स्वरचित शारदास्तवन सादर केले. सुधीर कुलकर्णी यांनी आपल्या शुभेच्छापर मनोगतातून, "स्वरोपासनाच्या वाकड आणि कस्पटेवस्ती या दोन शाखांमधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय बालश्री, गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, झी सारेगमप लिटिल चॅम्प असे नामांकित पुरस्कार प्राप्त केले असल्याने या शाखेतील विद्यार्थ्यांनीसुद्धा असाच नावलौकिक प्राप्त करावा!" अशी अपेक्षा व्यक्त केली. अभय कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून, स्वरोपासना ग्लोबल म्युझिक अ‍ॅकॅडमीच्या वाकड आणि कस्पटेवस्ती येथील शाखा अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे अधिकृत परीक्षाकेंद्र म्हणून मान्यताप्राप्त असून गांधर्व महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमानुसार गायन - वादन शिकवले जाते, अशी माहिती दिली.

विद्यार्थ्यांच्या वतीने देवेंद्र जानी आणि पालकांच्या वतीने श्रद्धा पाटील यांनी नूतन शाखेला शुभेच्छा दिल्या. स्वरदिंडीने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. यामध्ये विद्यार्थी आणि पालक यांनी सहभाग घेऊन सरस्वतीस्तवन, राग भूप, बागेश्री, भीमपलास यांच्या सरगमगीतांचे गायन केले. पंडित पलुस्कर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. भाग्यश्री कुलकर्णी यांनी स्वागत केले. अर्पिता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अथर्व कुलकर्णी यांनी आभार मानले.

#रा

## » Selected



### एमआईटी मध्ये विविध आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन

**आळंदी :** एम. आई. टी. आर्टस, कॉमर्स आणि( Alandi)सायन्स कॉलेज येथील सायन्स आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाने सायफरी 3.0 या शीर्षका खाली आंतर महाविद्यालयीन स्तरावरील विविध स्पर्धेचे आयोजन केले .यामध्ये ट्रिविया क्विझ, गणेशमूर्तीला, बीजी एमआय, टेक्नो ऍक्ट, ब्लाइंड कोडिंग, वेबसाइट डिझायनिंग, रिसर्च पेपर प्रेझेंटेशन, कॅप्चर द फ्लॅग, ट्रेझर हंट आणि पोस्टर प्रेझेंटेशन या विविध स्पर्धा घेण्यात आल्या .

### दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा डाव उधळला; तिघांना अटक

**तळेगाव दाभाडे :** पोलिसांनी एका टोळीचा दरोड्याचा डाव उधळला. तिघांना दरोड्याच्या साहित्यासह अटक करण्यात आली. ही कारवाई मंगळवारी (दि. 10) रात्री नॅशनल हेवी कंपनीच्या आवारात तळेगाव दाभाडे येथे करण्यात आली.

कार्तिक शंकर काकडे (वय 21, रा. जांभूळ, ता. मावळ), श्रेयस उर्फ बंटी अनिल किरवे (वय 25, रा. तळेगाव दाभाडे), गणेश उर्फ गण्या अर्जुन करडे (वय 20, रा. तळेगाव दाभाडे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.



त्यांच्यासह निखिल दत्तात्रय पोकळे (वय 22), यश गराडे (वय 20, दोघे रा. सोमाटणे फाटा, ता. मावळ) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहाय्यक फौजदार दिलीप कदम यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या नॅशनल हेवी कंपनीच्या आवारात काही जण दरोड्याच्या तयारीत थांबले असल्याची माहिती तळेगाव दाभाडे पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावून टोळक्याचा डाव उधळला. पोलीस आल्याची चाहूल लागताच दोघेजण पळून गेले. त्यातील तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून 30 हजार रुपये किमतीचे एक लोखंडी पिस्टल, कोयता, मिरची पावडर, लोखंडी कटावणी, 50 हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन असे एकूण 81 हजार 225 रुपये किमतीचे साहित्य जप्त केले.

### पीसीएमसी व्यवस्थापनाचे शालेय विद्यार्थ्यांना धडे

**पिंपरी :** महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी, कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती व्हावी तसेच शाळा कचरामुक्त करण्यासाठी महापालिकेने शाळा स्तरावर कचरा मुक्त शाळा उपक्रम राबविणे, पुणे जिल्ह्यातील २० शिक्षकांचे महापालिकेत वर्गीकरण करणे यासह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीच्या विशेष बैठकीत मान्यता दिली. महापालिका आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय प्रशासक सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीत ठेवले होते. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर आदी उपस्थित होते. महापालिका स्वच्छ शहर अभियान राबवित आहे. त्याचा एक भाग म्हणून आरोग्य विभागामार्फत शाळांमध्ये झिरो वेस्ट शाळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जागृती करून त्यांच्यात लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची कौशल्य विकसित करण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या शाळांमध्ये तीन महिन्यांमध्ये एकूण चार टप्प्यांत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी शाळांना निधीही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एकूण ९७ शाळा या उपक्रमांतर्गत कचरामुक्त करण्यात येणार आहेत.

### नगरपरिषदेकडून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी आवाहन

**तळेगाव दाभाडे :** पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी तळेगाव दाभाडे नगरपरिषदेकडून विविध ठिकाणी मूर्तीदान केंद्रे, विसर्जन कुंड (कृत्रिम हौद) तयार करण्यात आले आहेत. याशिवाय, ज्या गणेशभक्तांना स्वतःच्या घरीच मूर्तीचे विसर्जन करायचे आहे. त्यांच्यासाठी दोन ठिकाणी अमोनियम बायकार्बोनेट पावडरचे मोफत वाटप करण्यात येत आहे.

गणेशोत्सव काळात निर्माण होणारे निर्माल्य संकलन करण्यासाठी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत दररोज ट्रॅक्टरद्वारे निर्माल्य कलश फिरविण्यात येत आहे. तसेच मूर्तीदान केंद्र व विसर्जन कुंड या ठिकाणीही निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत. शहरातील नागरिकांनी व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी निर्माल्य इतरत्र न टाकता निर्माल्य कलशात टाकावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या उपमुख्याधिकारी ममता राठोड यांनी केले आहे. गणेशभक्तांच्या सोयीकरिता शहरामध्ये विविध ठिकाणी मूर्तीदान केंद्र, विसर्जन कुंड उभारण्यात आली आहेत.

# तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत गौरी सजावटीची धामधूम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी:** श्रीक्षेत्र खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत श्री गणेशाच्या बरोबरच गौरींचे आगमन झाल्याने सर्वत्र उत्साहाचे,



आनंदाचे वातावरण आहे. जेजुरी शहरात पूर्वीपासून गौरीच्या स्वागता बरोबरच गौरी समोर विविध विषयांवर आकर्षक सजावट गृहिणी वर्ग करीत असतात. फळा फुलांची तसेच फराळाची उत्कृष्ट सजावट, धार्मिक, सामाजिक विषयावर देखावे सादर केले जातात. या सजावटीची धामधूम जेजुरीत पाहण्यास मिळाली.

जेजुरी येथील सुषमा राऊत, प्रियंका राऊत यांनी फुलांची आकर्षक सजावटी बरोबरच श्री स्वामी समर्थ, विठ्ठल रखुमाई व लक्ष्मी देवतांची आरास केली आहे. सचिन सातभाई यांनी खंडोबा मंदिर, जागरण गोंधळ आदी धार्मिक देखावे सादर केले तर अलका शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची रांगोळी साकारली आहे.

जेजुरी शहरात घरोघरी गौरी गणपतीच्या समोर आकर्षक सजावटी करण्यात आल्या असून या सजावट पाहण्यासाठी व हळदी कुंकू कार्यक्रमासाठी महिलांनी सहभाग घेतलेला पाहण्यास मिळाला.







## पोलीस ठाण्यात आत्महत्येचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** ता. शिरुर पोलीस स्टेशन येथे मोबाईल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीला नागरिकांनी पकडून आणल्यानंतर गुन्हा दाखल केला तर मी जीव देईन असे म्हणून खिडकीवर डोके आपटून एका आरोपीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून परमेश्वर नागनाथ धेवडे असे या इसमाचे नाव आहे. दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी परमेश्वर नागनाथ धेवडे वय २४ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रविकिरण जाधव हे करत आहे.

## Selected



## ज्येष्ठ महिला भजनी मंडळाची भावभक्तीपर गीतांची मैफल रंगली

**पिंपळे सौदागर :** येथील कुणाल आयकॉन रोडवरील साई पर्ल सोसायटी मध्ये ज्येष्ठ महिला भजनी मंडळाने विविध भावभक्तीपर गाणी सादर करुन श्री गणेशाच्या चरणी संगीतसेवा सादर केली. रविवारी सायंकाळी झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ मंजिरी बनसोडे यांनी गायलेल्या " गजानना श्री गणराया " या गीताने करण्यात आला. त्यानंतर रसिका काटे, मिनाक्षी कुलकर्णी, चंदा फुलेवाले, किरण तिर्थगिरीकर, उज्वला अहिरे, मंगला कुलकर्णी, शिला डुंबरे, मिनाक्षी माने, ललिता भाकरे, सुरेखा कुलकर्णी, मधु मेघानी, उज्वला बापट यांनी सादर केलेल्या गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. ज्योती भिडे यांनी गीतांना अनुषंगून समर्पक आणि अभ्यासपूर्ण सुत्रसंचलन केले. सुरेखा कुलकर्णी यांनी गायलेल्या भारुड गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. संदीप कोकराळे यांनी पखवाजवर आणि श्रीकांत माने यांनी झांजेवर साथसंगत करुन कार्यक्रमात रंगत आणली. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमास उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी भरभरुन दाद दिली.

## दुर्गापूजेच्या दरम्यान हिल्साचा तुटवडा: नवी दिल्ली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दुर्गापूजेच्या हंगामात हिल्सा माशाचा तुटवडा भासणार आहे. कारण: जगातील सर्वात मोठा मासळी उत्पादक देश असलेल्या बांगलादेशने भारतात हिल्सा निर्यात न करण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगालमधील दुर्गापूजेत या माशाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.



बांगलादेशाच्या मत्स्यव्यवसाय आणि पशुधन मंत्रालयाच्या सल्लागार फरीदा अख्तर यांनी असे म्हटले आहे की, ढाक्यात नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर महिनाभरानंतर हिल्साच्या निर्यातीबाबत प्रयत्न घेण्यात येईल. शेख हसीना सरकारने दुर्गापूजेच्या काळात ही बंदी उठवली होती. शेख हसीना यांनी भारतासोबतच्या प्रसिद्ध 'हिल्सा डिप्लोमसी'पासून ही भूमिका स्पष्टपणे वेगळी आहे, जिथे त्यांनी अनेकदा सणासुदीच्या काळात माशांच्या निर्यातीला परवानगी दिली होती. बंगालच्या उपसागरात मुबलक प्रमाणात आणि नद्यांमध्येही आढळून येत असलेल्या हिल्सा या माशांच्या प्रजातीचा बांगलादेश हा अग्रगण्य उत्पादक आहे.

## खास आकर्षण..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** पुण्यातील उंबरे कुटुंबीयांनी 100 वर्षा पूर्वीच्या गोड आठवणीची जोड देत गणरायाच्या देखाव्यातून १०० वर्षांपूर्वीचा विष्णुपुरा वाडा साकारला आहे .

## कारेगावात दोन महिन्याच्या बालिकेचा मृत्यू

**शिक्रापूर :** कारेगाव ता. शिरुर येथील गणेशनगर येथे पोपट पाचंगे यांच्या खोलीत राहणारे साजन सिंग व सिमा सिंग दांपत्य घरात झोपलेले असताना रात्री अचानक त्यांची दोन महिन्यांची बालिका राधिका रडू लागली, दरम्यान बालिकेला खोकला येऊ लागल्याने तिला उपचारासाठी शिरुर येथे नेले असता डॉक्टरांनी राधिका साजन सिंग वय २ महिने या बालिकेचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले, याबाबत सिमा साजन सिंग वय २० वर्षे रा. गणेश नगर कारेगाव ता. शिरुर जि. पुणे यांनी रांजणगाव एमआयडीसि पोलीस टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश कर्डिले हे करत आहे.

## सॅमसंगने केली कामगार कपात

**नवी दिल्ली :** कोरियाची इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील दिग्गज कंपनी सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने भारतीय उद्योगातील सुमारे २०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांकडून मागणी कमी झाल्यामुळे त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीवर परिणाम होत आहे. परिणामी, व्यवसायातील वाढ मंदावत आहे. नफ्यात सुधारणा करण्यासाठी खर्चात कपात केली जात असल्याचे चार वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. ही नोकरकपात कंपनीच्या मोबाईल फोन्स, कंझ्यूमर इलेक्ट्रॉनिक्स, होम अप्लायन्सेस आणि सपोर्ट फंक्शन्समध्ये केली जाणार आहे. ही नोकरकपात त्यांच्या सुमारे २ हजार एक्झिक्यूटिव्हज मनुष्यबळाच्या ९ ते १० टक्के एवढी असेल.

चेन्नईच्या कारखान्यातील कर्मचारी गेल्या तीन दिवसांपासून बेमुदत संपावर गेले आहेत. यामुळे सणासुदीच्या दरम्यान सॅमसंग टीव्ही, रेफ्रिजरेटर आणि वॉशिंग मशीनच्या उत्पादनाला मोठा फटका बसला आहे. सदर कंपनी अजूनही ५० ते ८० टक्के क्षमतेच्या उत्पादनासह प्लांट चालवण्याचा प्रयत्न करत असल्याचे वृत्तात पुढे म्हटले आहे. देशातील सर्वात मोठी कंझ्यूमर इलेक्ट्रॉनिक्स आणि मोबाईल फोन उत्पादक कंपनी असलेली सॅमसंग त्याच्या ऑपरेशनचीदेखील पुनर्रचना करण्याची शक्यता आहे. सॅमसंग इंडियाने नवीन भरतीदेखील थांबवली आहे. तसेच कंपनीमधील ऑफ-रोल कर्मचाऱ्यांची संख्यादेखील कमी होऊ शकते. ज्या कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले जाते; त्यांना एम्प्लॉयमेंट करारानुसार तीन महिन्यांचा पगार आणि कंपनीतील प्रत्येक वर्षाच्या सेवेसाठी एक महिन्याच्या पगाराचे विभाजन पॅकेज दिले जाते.

## सणसवाडीत युवतीचा मोबाईल हिसकावणाऱ्यांना कोठडी

**सणसवाडी :** ता. शिरुर येथील चौकात रुपाली कायंदे हि युवती तिच्या वडिलांची वाट पाहत उभी असताना अचानक दुचाकीहून दोघेजण आले त्यांनी युवतीचा मोबाईल हिसकावला यावेळी युवतीने आरडाओरडा केल्याने नागरिकांनी पळून जाणाऱ्या दोघांना पकडून दुचाकीसह पोलिसांच्या हवाली केले, तर याबाबत रुपाली परशुराम कायंदे वय २२ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे या महिलेने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी रामदास महादेव भालेराव व परमेश्वर नागनाथ धेवडे दोघे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे या दोघांवर गुन्हा दाखल करत पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांनी त्यांना अटक करत शिरुर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रविकिरण जाधव हे करत आहे.

पान १ वरून

## शिंदेंच्या शिवसेनेला हव्यात १०० जागा

मिळणार नाहीत. इंडिया आघाडीमुळे त्यांची मते कमी होणार आहेत. १०० पेक्षा जास्त जागा मिळाल्या, तरच आम्ही महाविकास आघाडीला टक्कर देऊ शकू आणि तिला पराभूत करू शकू, असे शिवसेनेचे म्हणणे आहे.या महिन्याच्या अखेरपर्यंत जागावाटपाच्या फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब होऊ शकते. शिवसेनेला ८० ते ९०, तर राष्ट्रवादीला ५० ते ६० जागा मिळतील, असा अंदाज आहे. मैत्रीपूर्ण लढतीसाठी कोणतीही बोलणी झालेली नाहीत, असे सूत्रांनी स्पष्ट केले आहे.विधानसभा निवडणुकीत भाजपला ६५ ते ७०, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला १७ ते २२ आणि राष्ट्रवादीला केवळ ७ ते ११ जागा मिळतील, असा अंदाज एका सर्वेक्षणातून समोर आला आहे. केंद्रात मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार पाच वर्षे राहणार हे वास्तव असून, महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यास केंद्र व राज्याच्या योजना सुरूच राहतील, हे राज्यातील जनतेला ठाऊक आहे. महाविकास आघाडी सत्तेत येणे, म्हणजे या योजना बंद करणे, महाविकास आघाडी सत्तेत येणे म्हणजे लाडकी बहिण योजना बंद करणे आणि शेतकऱ्यांना मोफत वीज बंद होतील. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडीने युती सरकारच्या १५ योजना बंद केल्या होत्या.

## उधमपूरमध्ये चकमक

निमलष्करी दल आणि पोलीस कर्मचाऱ्यांची एकत्रित तुकडी खंडारा टॉपच्या दिशेने जात होती. या दरम्यान, दहशतवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. पण सुरक्षा दलांनी या गोळीबाराला चोख प्रत्युत्तर दिले. अधिक मिळालेल्या माहितीनुसार, या परिसरात तीन ते चार दहशतवादी लपले आहेत. दुपारी १२.५० च्या सुमारास दहशतवाद्यांनी गोळीबार केला. स्थानिक पोलिस आणि लष्कराच्या संयुक्त पथकाने बसंतगडच्या खंडारा टॉपमध्ये घेराबंदी केली असून शोध मोहीम सुरू आहे. जेव्हा सुरक्षा दलाचे जवान दहशतवाद्यांच्या जवळ पोहोचले तेव्हा दहशतवाद्यांनी गोळीबार केला आणि चकमक सुरू झाली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. जम्मूच्या अखनूर सेक्टरमधील नियंत्रण रेषेवर (एलओसी) पाकिस्तान रेंजर्सच्या जवानांनी गोळीबार केल्याने सीमा सुरक्षा दलाचा (बीएसएफ) एक जवान जखमी झाला होता. या घटनेनंतर काही तासांत बसंतगड येथे चकमक झाली. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जम्मू आणि काश्मिरमध्ये गोळीबाराच्या काही घटना घडत आहेत.

## लिव्ह इनमधील महिलेची हत्या

उघडकीस आली. शिवानी सोमनाथ सुपेकर (वय २७, रा. थेरगाव) असे मृत महिलेचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित विनायक आवळे आणि शिवानी गेल्या दोन वर्षांपासून लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये होते. काल त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला, ज्यामुळे ही हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मध्यरात्रीच्या सुमारास विनायकने तिचा गळा दाबून खून केल्याचे समजते. त्यानंतर त्याने तिचा मृतदेह रिक्षातून आईच्या घरी नेऊन तिथेच सोडला. विनायक सध्या फरार असून वाकड पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## कालिंदी एक्स्प्रेस प्रकरणी...



रुळांवर लावलेल्या एलपीजी सिलेंडरला आदळली. लोको पायलटच्या सतर्कतेने सोमवारी मोठा रेल्वे अपघात टाळला. घटनास्थळी पेट्रोलची एक बाटली आणि आगपेटीही सापडली होती. स्थानिक पोलिसांनी त्यानंतर गुन्हा दाखल केला. नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी (एनआयए) आणि यूपी पोलिसांच्या दहशतवादविरोधी पथकासह तपास सुरू करण्यात आला असून, या घटनेचा दहशतवादी संबंध असू शकतो, असा संशय आहे.

## दिल्लीसह उत्तर भारतात भूकंप

आज दुपारी १२ वाजून ५८ मिनिटांनी पाकिस्तानमध्ये ५.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला, असे नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने म्हटले आहे. पाकिस्तानातील पेशावर, इस्लामाबाद आणि लाहोर आणि भारतातील नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब येथे याचे धक्के जाणवले. दिल्ली-एनसीआरमधील बहुमजली इमारतींमध्ये राहणाऱ्या अनेकांना ते जाणवले. भूकंपानंतर लोक घराबाहेर पडले.

## पुणे-नागपूर वंदे भारत ट्रेन

जाते. पुणे-नागपूर गाड्या बहुतेक वेळा पॅक असतात आणि तिकीट अगोदरच बुक करावे लागतात. त्यामुळे प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागतो.

## पुणेकर रिक्षावाल्यांकडून लूट

तसेच ठराविक भाडे देण्याबद्दल ते प्रवाशांना सूचना करीत आहेत शनिपार ते पुणे स्टेशन पर्यंत मीटर प्रमाणे शंभर ते 125 रुपये होतात तेथे सरसकट पाचशे रुपये भाडे सांगितले जात आहेत पेठ परिसर तसेच टिळक रस्ता एफसी कॉलेज रोड या ठिकाणी खूप गर्दी असल्यामुळे सरसकट 300 ते 400 रुपये भाडे सांगितले जात आहेत त्यामुळे गणेश दर्शनासाठी येणारे राज्यभरातील पर्यटक त्रासले असून या लुटीवर पोलीस प्रशासन किंवा आरटीओने कारवाई करावी अशी मागणी पर्यटकांकडून होत आहे.

## तुम्ही तर पवारांचे दलाल संजय शिरसाट यांचा घणाघात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** तुम्ही शरद पवारांचे दलाल आहात. इतरांबद्दल काय चर्चा करता? असा सवाल शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी संजय राऊतांना केला आहे. महायूतीच्या मुख्यमंत्रीपदाबाबत संजय राऊतांनी टीका केली होती. यावर आता



शिरसाटांनी त्यांना प्रत्युत्तर दिले. महायूतीत अजित पवार हे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार आहेत, असे वक्तव्य राऊतांनी केले होते. यावर संजय शिरसाट म्हणाले की, अजितदादा मुख्यमंत्री होणार की, नाहीत हे आमचे आम्ही पाहू. पण उद्धव ठाकरेंबद्दल तुमचे मत काय आहे? ज्यांनी शिवसेनाप्रमुखांचे विचार सोडले, त्यांना मुख्यमंत्रीपद देणार आहात का? यावर राऊतांनी भाष्य करावे. दिल्लीच्या आणि शरद पवारांच्या घरच्या वाऱ्या करून थकले पण दुर्दैवाने तुमचे नाव कुणीही घेत नाहीत. त्यामुळे आमची चिंता करू नका. शरद पवारांचे तुम्ही दलाल आहात. इतरांबद्दल काय चर्चा करता? शेवटी आता मी उबाठाला संपवले आहे, हे तुम्हाला सिद्ध करायचे असल्यामुळे तुम्ही असे बेताल वक्तव्ये करत आहात, असा घणाघातही त्यांनी केला.

## शिव्या देऊ नको म्हटल्याने मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**केंदूर :** ता. शिरुर येथे सरपंचांसह काही इसम शाळेच्या कामानीबाबत चर्चा करत असताना येथे आलेले राजू ताठे यांनी उपसभापती व त्यांच्या पतीचे नाव घेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली असता त्यांना शिव्या देऊ नका असे म्हटल्याच्या करणातून एका इसमाला लोखंडी गजाने बेदम मारहाण करत हाताला गंभीर दुखापत केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे राजू हिरालाल ताठे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या व पोलीस हवालदार राकेश मळेकर हे करत आहे.

## मांडवगण फराटात दोन दारु अड्ड्यांवर छापे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** मांडवगण फराटा ता. शिरुर येथील वडगाव रासाई रोड लगत असलेल्या तात्याश्री हॉटेल व रानजत्रा हॉटेल येथे काही इसम देशी विदेशी दारुच्या बाटल्यांची विक्री करत असल्याची माहिती शिरुर पोलिसांना मिळाली त्यांनतर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र कदम, पोलीस शिपाई किशोर वाघ, तानाजी बाबर, पोलीस हवालदार अमोल गवळी, यांनी दोन्ही हॉटेल मध्ये जाऊन छापा टाकला असता पोलिसांना तात्याश्री हॉटेल प्रकाश भालेराव तर रानजत्रा हॉटेल येथे सुनील दाते नागरिकांना देशी विदेशी दारुच्या बाटल्यांची विक्री करताना मिळून आले, यावेळी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत दारुसाठा जप्त केला, तर याबाबत पोलिसांनी प्रकाश पितांबर भालेराव व सुनील काशिनाथ दाते दोघे रा. मांडवगण फराटा ता. शिरुर जि. पुणे यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## जुन्नर तालुक्यात महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा तिढा सुटेना

# महाविकास आघाडीकडे इच्छुकांची संख्या वाढली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव : :** जुन्नर विधानसभेसाठी महाविकास आघाडीकडे इच्छुकांची संख्या वाढल्यामुळे व येथील जागा महा विकास आघाडीच्या कोणत्या घटक पक्षाला सुटणार? या बाबतचा तिढा सुटण्याऐवजी अधिकच वाढत चालला आहे. आघाडीच्या तिन्ही घटक पक्षाने या जागेवर दावा केला आहे.

शिवसेनेचे माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी प्रचाराला सुरुवात केली असून तालुक्यातील मोठ्या गावामध्ये स्वतःचे फ्लेक्स लावले आहेत. महाविकास आघाडीची उमेदवारी आपल्यालाच मिळणार असे गृहीत धरून त्यांनी कामाला सुरुवात केली आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांची त्यांनी मागील आठवड्यात भेट घेतली आहे. त्या भेटीनंतर त्यांच्या समर्थकांनी तालुक्यात त्यांच्या नावाचे फ्लेक्स लावले आहेत.

तसेच याच पक्षाचे तालुका अध्यक्ष माऊली खंडागळे पायाला भिंगरी बांधल्यागत प्रत्येक गावातील दशक्रिया व पूजा अर्चा कार्यक्रमाला हजेरी लावत आहेत. मीच महाविकास आघाडीचा उमेदवार असणार असे ते कार्यकर्त्यांना सांगत आहेत. शरद पवार यांच्या पक्षाकडून मोहीत




ढमाले व पक्षाचे तालुका अध्यक्ष तुषार थोरात उमेदवारीसाठी आघाडीवर आहेत. या दोघांनीही आपापल्या सोयीने प्रचाराला सुरुवात केली आहे.

काँग्रेसचे युवा नेते व विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर हे सुद्धा आपल्याला तुतारीकडून उमेदवारी मिळेल या आशेवर प्रचार करीत आहेत. त्यांनी शरद पवार, खा. सुप्रिया सुळे, खा. अमोल कोल्हे व प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेऊन उमेदवारी बाबत विचारपूस केली असून तालुक्यात आघाडीच्या इच्छुक उमेदवाराचा सर्व्हे काय येतोय, त्यावर पुढील निर्णय घेऊ" असे सांगत त्यांना "वेटिंग"वर ठेवले आहे. दरम्यान जुन्नरची महाविकास आघाडीची जागा नेमकी कोणत्या घटक पक्षाला सुटणार?: या बाबतचा तिढा अधिक गुंतागुंतीचा होत चालला आहे. तथापी महाविकास आघाडीकडून जुन्नरची जागा काँग्रेसला सोडली जावी अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. जुन्नची जागा जर महाविकास आघाडीकडून काँग्रेस पक्षाला सुटली तर सत्यशील शेरकर यांच्या नावाचा विचार होऊ शकतो. जुन्नरची जागा काँग्रेसला सोडली नाही तर लोकसभेसारखा "सांगली पॅटर्न" राबवू असा इशारा नेत्यांकडून महाविकास आघाडीला दिला जात आहे.

एकंदरीत जुन्नर तालुक्यात महाविकास आघाडीकडून इच्छुकांची संख्या जरी जास्त असली तरी "शरद पवार राबवरील ते धोरण, व बांधतील ते तोरण" असा निर्णय होण्याची शक्यता आहे.

#रा


BANGKOK
Swachhand
TOURS
4 NIGHTS PATTAYA
1 NIGHT BANGKOK
3* Hotel with
Breakfast
Rs.18000/-
Per Person
FREE ACTIVITIES
☑ Coral Island Tour Lunch
☑ Alcazar Show
☑ Pattaya City Tour
BOOK NOW:
Office No.: +91 8888440224
Contact: +91 +91 9699014013
Email: swacchandtours@gmail.com
Day 1:
Pick up from Bangkok Airport to Pattaya Hotel. Alcazar Show - 5.00P.M.
Dinner - 7.00 to P.M. - 9.00 P.M.
Day 2:
Morning Breakfast in Hotel - 7 A.M to 10 A.M Coral Island tour including lunch-9 A.M.
Dinner - 7 P.M. to 9 P.M.
Day 3:
Morning Breakfast in Hotel - 7 A.M. to 10 A.M. Pattaya city tour & Under water world - 11 A.M.
Dinner - 7 P.M. to 9 P.M.
Day 4:
Morning Breakfast in Hotel - 7 A.M. to 10A.M Free day (If you want any other activity then consider me)
Dinner - 7 PM to 9 P.M
Day 5:
Morning Breakfast in Hotel - 7 A.M. to 10 A.M.
Check out & transfer to Bangkok hotel - 11 A.M.
Dinner-7 P.M. to 9 P.M.
Transfer to airport
THANK YOU FOR CONTACTING US!
Swachhand
TOURS
Office: S. No. 41/B, Kausalya Niwas, Dattamandir, Jadhav Nagar Road, Vadgaon BK, Pune-411041 • Contact Office: +91 96990 14013, Mob: +91 8888440224
Email: swacchandtours@gmail.com

# पुणे जिल्ह्याच्या हवेली, आंबेगाव, बारामती, इंदापूर तालुक्यातील योजनांना गती देण्यासाठी तातडीने प्रस्ताव पाठवावा

■ जलस्त्रोतांचा अभ्यास करुन पर्याय सुचवावा ■ पुढील ५० वर्षांची पाण्याची गरज लक्षात घेण्याचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील घेरा, सिंहगड आणि प्रयागधाम, आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक, बारामती तालुक्यातील नीरावागज, खांडज, घाडगेवाडी तसेच इंदापूर तालुक्यातील बोरी या गावातील पाणीपुरवठा योजनांना गती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या गावांना भेट द्यावी. भौगोलिक परिस्थिती आणि शाश्वत जलस्त्रोतांचा अभ्यास करुन सर्वोत्तम व्यवहार्य पर्याय सुचवावा. या गावांची पुढील 50 वर्षांची गरज लक्षात घेऊन पाणीयोजनांचा परिपूर्ण प्रस्ताव तातडीने पाठवावा. या योजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, नवीन प्रस्ताव तयार करताना धरणातून बंद पाईपद्वारे पाणी आणणे किंवा नवीन साठवण तलाव बांधणे यासारख्या पर्यायांचाही विचार करावा. सध्याच्या अस्तित्वातील साठवण तलावाची दुरुस्ती, अशुद्ध पाणी गुरुत्वनलिका, अशुद्ध पाणी उद्धरणनलिका, पंपिंग मशिनरी, जलशुद्धीकरण केंद्र, अस्तित्वातील जल शुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती, शुद्ध पाणी ऊर्ध्वनलिका, उंच जलकुंभ, संतुलनटाकी, वितरण व्यवस्था, सौरऊर्जेसारख्या अपारंपरिक स्त्रोतांचा वापर, तसेच इतर अनुषंगिक कामांचा नव्या योजनेत समावेश करून, अंदाजपत्रकासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा. या प्रस्तावाचा शासनस्तरावर अभ्यास करुन त्यास तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. जिल्ह्यातील गावांच्या पाणीयोजनांचे काम तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**बारामती तालुक्यातील कांबळेश्वर येथे नव्या, पक्क्या साठवण तलावास मंजुरी**

बारामती तालुक्यातील मौजे कांबळेश्वर येथील मातीच्या साठवण तलावातून कांबळेश्वर-शिरवली-शिरष्णे-लाटे-माळेवाडी या पाच गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो. या साठवण तलावाचे बांधकाम जीर्ण झाले असल्याने मोठ्या प्रमाणावर गळती होते. या साठवण तलावाचे बांधकाम नव्याने आणि पक्क्या स्वरुपात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिले.

## साडेचार लाख रुपये किमतीचे आधुनिक पध्दतीचे शौचालय पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**उरुळी कांचन :** दौंड तालुक्यातील जावजीबुवाची वाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला येथील बोरा फुड्स प्रा.लिमिटेड या कंपनीच्या सी एस आर फंडातून आणि रोटरी क्लब ऑफ मिड ईस्ट, पुणे यांच्या संयुक्त प्रयत्नातून साडेचार लाख रुपये किंमतीचे आधुनिक पध्दतीचे शौचालय पूर्ण सोयीसुविधा सह बांधून देण्यात आले आहे. शौचालय हस्तांतरण सोहळा मंगळवारी पार पडला.

शाळेतील यापूर्वीच्या शौचालयाची जीर्णावस्थेमुळे पडझड आणि दुरावस्था झाली होती. त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांची खूपच गैरसोय होत होती. हे पाहून बोरा फुड्स कंपनीच्या " टॉयलेट ब्लॉक प्रकल्प " अंतर्गत आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त सहकार्याने शौचालयाचे बांधकाम करण्यात आले.

## धामणीत तमाशाचा देखावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**धामणी** (ता.आंबेगाव ) येथे दिनकर रोकडे यांनी संगीतरत्न स्व. दत्ता महाडिक पुणेकर यांचा तमाशाचा हुबेहूब देखावा साकारून महाराष्ट्राची लोककला जपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

रोकडे यांनी सदर देखावा साकारण्यासाठी सहा महिने आगोदर तयारी केली असून देखाव्यात दत्ता महाडिक यांचा तिकीटिवर सूरू होण्याच्या आगोदरचे हुबेहूब दृश्य त्यानी आपल्या देखाव्यात उतरवले आहे. त्यामधे तमाशाचे प्रवेश द्वार, राहुट्या, स्टेज, वाहतूक करणाऱ्या ट्रक, कणाद इ अगदी जशेच्या तसे दाखविण्यात आले आहे. या साठी त्यांनी कापड, प्लायवूड, फायबर, रेडियम, पुठ्ठे इ चा वापर केला आहे.

या देखाव्याची सोशल मीडियावर चर्चा असुन आजूबाजूच्या गावातील रसिक देखावा पाहण्यासाठी गर्दी करत आहे. जुन्या काळी मनोरंजनाची कुठली साधने नव्हती त्यावेळी लोकनाट्य तमाशातील कलाकारांनी महाराष्ट्राची लोककला जिवंत ठेवली. त्यामुळे आजही जुन्या काळातील लोकांना तमाशाचे आकर्षण वाटते आहे.

संगीतरत्न स्व.दत्ता महाडिक यांचे मूळ गाव बेल्हे (जुन्नर) असुन एके काळी दत्ता महाडिक या नावाने महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य राज्यातील रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते.

त्यांची स्वतः रचलेली व स्वतःच्या आवाजात स्वरबध्द केलेली गाणी अजरामर झाली आहेत

धामणीतील देखावा सोशल मीडियावर पाहिल्यावर स्व. दत्ता महाडिक यांचे चिरंजीव संजय महाडिक, साईनाथ पतसंस्थेचे अध्यक्ष, वसंत जगताप,

संजय विश्वासराव, राकेश डोळस, दत्तात्रय लामखेडे यांनी भेट दिली व रोकडे यांचे कौतुक केले

या वेळी माजी सरपंच सागर जाधव, उपसरपंच अक्षय विधाटे, माधव बोऱ्हाडे, संतोष पंचरास, पमाजी पंचरास व ग्रामस्थ उपस्थित होते .

## तरुण शेतकऱ्यांनी कृषीमाल निर्यात करण्याचे ध्येय ठेवावे - शरद नानपुरे



**सासवड** : सध्या शिक्षण घेतलेले तरुण नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करीत आहेत. या सर्व शेतकऱ्यांनी नवा दृष्टिकोन स्वीकारून दर्जेदार व सेंद्रिय शेती करावी. रासायनिक खतमुक्त शेती करून आपला कृषीमाल आखाती देशामध्ये पाठविण्याचे ध्येय ठेवावे. असे विचार शेतीमाल निर्यातीचे सल्लागार संगमनेरचे शरद नानपुरे यांनी व्यक्त केले.

पिसर्वे ता.पुरंदर येथे जयमल्हार फळ व भाजीपाला प्रक्रिया सहकारी संस्थेने आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते.

### रांजणगावात अॅस्ट्रॉसिटी प्रकरणी ६ जणांवर गुन्हे

**शिक्रापूर** : रांजणगाव गणपती पैशाच्या झालेल्या वादातून महिलेला जातीवाचक शिवीगाळ दमदाटी केल्याची घटना घडली असल्याने रांजणगाव एमआयडीसि पोलीस स्टेशन येथे सहा जणांवर अॅट्रॉसिटी प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील भांबर्डे रोड लगत राहणाऱ्या अमर साळुंखे यांचे रोमन नावाच्या व्यक्तीसोबत पैशाच्या व्यवहारातून वाद झाले.

## गणपती बरोबरच गौरी सजावट पाहण्यासाठी गर्दी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** लाडक्या गणरायाचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. सर्वत्र गणेशोत्सव सुरु असून मंगळवारी दि. १० सप्टेंबर रोजी लाडक्या गौरी अर्थात लक्ष्मीचे सोन पावलांनी आगमन झाले. गौरींचे स्वागत समस्त महिलांनी मोठ्या उत्साहात केले. मंगल गौरींचे आगमन प्रसंगी महिलांनी हळदी कुंकवाचा वाण देत मोठ्या उत्साहात घरात आगमन झाले. परंपरेप्रमाणे प्रथम भाजी भाकरीचा नैवद्य देण्यात आला. बुधवार ११ रोजी गौरीपूजन निमित्त ठिकठिकाणी हळदकुंकू तसेच संगीत भजन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

अनेक ठिकाणी सामाजिक, पारंपारिक, धार्मिक संदेश देणारे देखावे तयार केले आहेत. तालुक्यातील अनेक महिलांनी विविध देखावे सादर केले आहेत.

सासवडला संत सोपानदेव मंदिर परिसरात अश्विनी नितीन शिवरकर, सुनंदा शिवरकर, हेमांगी टिळेकर, वैशाली गायकवाड, सुषमा रायकर, शारदा वाडकर, मीरा ढगारे यांनी संतांच्या भक्तीचा देखावा तयार केला आहे. संत तुकाराम महाराज यांच्या वेशातील गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली असून संत निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम, सावता महाराज या संतांचे चित्र साकारले आहेत. सोपाननगर येथील साक्षी संदीप जगताप, नीलम भीमराव शिंदे, सिद्धी संदीप जगताप, विनायक संदीप जगताप, गणेश संजय जगताप, विक्रांत भीमराव शिंदे यांनी उत्तराखंड येथील केदारनाथधाम मंदिराची प्रतिकृती साकारली आहे. त्याचप्रमाणे हडको रोड वरील सस्ते पार्क मधील दीपा सुहास कांबळे, सुहास दिगंबर कांबळे यांनी गौरी गणपती समोर प्रगतशील शेतकरी आणि अध्यात्मिक देखावा साकारला आहे

## गौरी-गणपती सणामुळे वाढली मागणी

# जयाद्रीच्या रानमळ्यात फुलतेय गुलाब शेती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** सध्या गुलाब फुल शेती हा व्यवसाय भारतीय शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत असून देशात सध्या एका आकडयानुसार 19 लाख मेट्रिक टानाहून अधिक उत्पादन होत आल्याचे चित्र दिसून येत आहें दीर्घ काळाच्या प्रतीक्षेनंतर पुरंदरला पाणी आल्याने जयाद्रीची कऱ्हानदी खळखळून वाहू लागल्याने जयाद्री खोऱ्याच्या मल्हारसागर धरण परिसरातील रानमळा येथील शेतकरी परिवाराने अपार मेहनत करून गुलाब शेती फुलवली आहें. कमी पाण्यात लाल रंगाचा देखणा गुलाब फुलल्यामुळे शेतकरी समाधान व्यक्त करीत आहें रानमळा भोसलेवाडी, कोथळे नाजरे मधून साठ ते सत्तर एकरात फुलशेती लागवड झाल्याचे समजते त्यात गौरी गणपतीत फुलांची मागणी पाहता एकट्या पुरंदर च्या या परिसरातून गुलाब फुल उत्पादन झाल्याचे दिसून येते रस्त्याच्या लगत शेतीत फुललेल्या या लाल गुलाबी देखण्या फुलांनी लक्षवेधून घेतले नाही असे होत नाही सौंदर्य खुलावणारा प्रेमालाही भुरळ पाडणारा भक्तीभाव श्रद्धा मधून मंदिरात साजणारा सुंदर गुलाब भाव खाऊन गेला आहें नेहमीच दुष्काळच्या झळा सोसणाऱ्या पुरंदरच्या बळी राजाला डोळ्यांना सुखवणारा आणि पोटाला हातभार लावणाऱ्या गुलाब फुल शेतीचा आधार वाटतो एवढे मात्र खरं

छाया : विजयकुमार हरिश्चंद्रे #रा





## Selected



### गौरीगणपतीसाठी उत्तराखंडतील केदारनाथ मंदिर प्रतिकृती

**सासवड :** सासवड येथील गौरी गणपती साठी विविध सामाजिक तसेच धार्मिक देखावे सादर करण्यात येतात दरवर्षी विविध धार्मिक देखावे सादर करण्याची परंपरा कायम राखत यंदा देखील सासवड मध्ये उत्तराखंड येथील केदारनाथ धाम ची प्रतिकृती साकारली आहे सौ.साक्षी संदीप जगताप व सहपरिवार सासवड यांच्यावतीने घरच्या गौरी गणपती सजावट केली आहे



### तात्यासाहेब भुजबळांचे स्वातंत्र्यलढ्यातही मोलाचे योगदान

**नारायणगाव :** ही कर्तृत्वाची आणि त्यागाची भूमी असून ह्याच त्यागातून गुरुवर्य रा.प.सबनिस यांनी रुजविलेले शैक्षणिक रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. यामध्ये तात्या साहेबांसारख्या असंख्य हातांनी प्रचंड काम केले आहे, म्हणूनच आज लाखो विद्यार्थी या ग्रामोन्नती मंडळाच्या विविध विभागांमध्ये शिक्षण घेऊन उज्ज्वल भवितव्य आजमावत आहेत. आज परदेशामध्ये जपान आणि जर्मनीमध्ये कृषी क्षेत्रातील सक्षम मनुष्यबळाची प्रचंड गरज आहे. यासाठीही विद्यार्थ्यांनी प्रयत्न करण्याची गरज आहे असे प्रतिपादन ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर यांनी केले. तात्यासाहेब भुजबळ कृषी शिक्षण संकुल नारायणगाव येथे श्रीमान महादेव विठोबा तथा तात्यासाहेब भुजबळांची 50 वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.



### आप्पासाहेब जगदाळे यांना उमेदवारी देण्याची मागणी

**भवानीनगर :** सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे यांना विधानसभेची उमेदवारी मिळावी यासाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांना निवेदन दिले. यावेळी इंदापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विलास माने खरेदी विक्री संघाचे संचालक अमोल भोईटे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास कदम हिंदुराव भोईटे यासीन सय्यद रमेश घोरपडे विष्णुपंत कदम विजय सपकळ आदींसह पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते पुणे जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे यांना येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातून इंदापूर तालुक्यातून विधानसभेचे उमेदवारी मिळावी यासाठी निवेदन देण्यात आले आहे

**डॉ. विकास खरात उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर यांचे कार्यालय**

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविणेत येते की, भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११/०८/२०२३ रोजीच्या राजपत्रान्वये जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मध्ये कलम ११(२) व ३ नुसार जन्म मृत्युच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणामध्ये अशा जन्म मृत्यूची नोंद करणेबाबत अनुषंगिक कार्यवाही करुन आदेश देणेकामी संबंधित कार्यक्षेत्रातील उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. त्याअनुषंगाने अर्जदार सचिन पांडुरंग दिघे, रा. विंझर, ता. वेल्हा, जि.पुणे यांनी या कार्यालयाकडे जन्म मृत्यू नोंदणी कायदा २०२३ मधील कलम १३(३) नुसार अर्ज दाखल केला आहे. सदर तरतुदीनुसार अर्जदार यांचा मुलगा श्लोक सचिन दिघे याचा जन्म मौजे कारी ता. भोर जि. पुणे येथे दि. २४/०३/२०१८ रोजी झालेचे नमूद करुन सदर जन्माची नोंद होवून दाखला मिळणेबाबत मागणी केली आहे. तरी सदर जन्म-मृत्यु नोंदणी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसाचे कालावधीमध्ये लेखी स्वरुपात या कार्यालयास अवगत करावे. सदर विहित कालावधीमध्ये लेखी आक्षेप / हरकत अथवा मागणी तपशिलामध्ये दुरुस्ती प्राप्त न झाल्यास या कार्यालयाकडून जन्म मृत्यु नोंदणी कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार आदेश पारित करणेत येईल,

आज दि. १०/०९/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे शिक्यानिशी हि जाहीर नोटीस देणेत आली आहे.

क्र. फौज/मृत्यू/एस. आर/ /२०२४
दिनांक :-१०/०९/२०२४
ठिकाण :- भोर

सही/-
**डॉ. विकास खरात**
डॉ. उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी भोर उपविभाग भोर

**यंत्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कात्रज पुणे**
स.नं. १२३ अ विंग गणेश पार्क संतोषनगर, कात्रज, पुणे -४६ नोंदणी क्र. पी.एन.ए./ पी. एन. ए / (४) आर. एम. आर/सी. आर/२८५४ २००३-२००४

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरिता)**

यंत्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कात्रज पुणे या संस्थेची २०वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २८/०९/२०२४ वार शनिवार सायंकाळी ६ वा. माऊली गार्डन पुणे येथे बोलवण्यात आली आहे. तरी या सभेस सर्व सभासद बंधु-भगिनींनी अवश्य उपस्थित रहावे.

**: सभेपुढील विषय :**

१. मागील सर्वसाधारण सभा दि. ३०/०९/२०२३ रोजीचा वार्षिक सभा इतिवृत्तांत वाचुन कायम करणे.
२. सन २०२३-२४ या वार्षिक अहवाल दि. ३१ मार्च २०२४ अखेरचा वार्षिक ताळेबंद व नफा नोटा पत्रक वाचुन मंजुर करणे.
३. सन २०२३-२४ अखेरचा व्यवस्थापक समितीने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
४. सन २०२३-२४ अखेरीस वैधाधिक लेखापरिक्षकाची यांनी दिलेल्या अहवालची नोंद घेणे.
५. सन २०२३ अखेरचे लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
६. सन २०२३-२४ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा झालेल्या अधिक खर्चास मान्यता देणे व सन २०२४-२५ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकात मान्यता देण्याबाबत.
७. दि. ३१ मार्च २०२४ अखेर संचालक व त्यांचे नातेवाईकाचे कर्जाची येणे बाकी व थकबाकीबाबत माहिती देणे.
८. सामोपचार परतफेड योजना दिलेल्या कर्जखात्यांची माहिती घेणे.
९. सन २०२४-२५ सालाकरिता अंतर्गत व वैधाधिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणेबाबत.
१०. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणुक/वसुली इत्यादी विषयांबाबतचे वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
११. पोटनियम दुरूस्तीबाबत विचार विनिमय करणे
१२. म.स.सो. अधिनियम १९६० व नियम १९६१ कलम २४ अ प्रमाणे अहवाल वर्षात संस्थेने आयोजित केलेल्या प्रशिक्षणाची माहती घेणे.
१३. सहकार विभागाकडुन आलेल्या व त्याबाबत संस्थेने केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती घेणे.
१४. दि ३१ मार्च २०२१ अखेर शिल्लक लाभांश राखीव निधीत वर्ग करण्याबाबत.
१५. संस्थेच्या सभासदांकडुन आलेल्या सुचना व ठरावाबाबत (असल्यास) चर्चा करणे.
१६. मा. अध्यक्ष यांच्या अनुज्ञेने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**मा. व्यवस्थापक समितीच्या आदेशावरून**
**श्री. महेश महांगरे,** सचिव

**स्थळ :** पुणे दि. १३/०९/२०२४

**सुचना :**
१. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी दुपारी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल यामधला गनसंख्या पूर्ततेची आवश्यकता राहणार नाही.
२. दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी सभासदांना काही सुचना करावयाच्या असतील तर त्यांनी दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी पर्यंत मुख्य कार्यालयाच्या कामकाजाच्या वेळेत (सकाळी १०.०० ते २ व दुपारी २.३० ते ६.००) मा. व्यवस्थापक यांचेकडे लेखी घ्याव्यात. अन्यथा त्याबाबत सभेत विचार करण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.
३. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी ते मुख्य कार्यालयात त्वरीत कळविणे आवश्यक आहे.
४. कृपया आपला सभासद दाखला घेऊन जाणे.
५. ज्या सभासदाचे संस्थेचे बचत ठेव खाते नसेल त्यांनी ते संस्थेच्या नजीकच्या शाखेत सुरू करावे. संस्थेस त्यांची लाभांशाची रक्कम सदर खातेवर वर्ग करता येईल ३ वर्ष लाभांश न नेल्यास ती रक्कम राखीव निधीत वर्ग होते.

## राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर शिंदे यांची टीका

# महायुती आरक्षणाच्या बाजूने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आरक्षण संपवण्याचा मनसुबा अमेरिकेत व्यक्त केला आहे. आरक्षण संपवण्याची भाषा करणारे राहुल गांधी यांचे हे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आहे. शिवसेना व महायुतीतील सहकारी पक्ष आरक्षणाच्या बाजूने आहेत आणि आरक्षण संपवू देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही हाणून पाडू, असेही शिंदे यांनी सांगितले.

आरक्षणावरुन राहुल गांधी यांनी केलेल्या विधानाची सध्या देशभर चर्चा सुरु आहे. जेव्हा योग्य वेळ येईल, त्यावेळी काँग्रेस आरक्षण संपविण्याचा विचार करेल. पण सध्या ती योग्य वेळ नाही, असे राहुल गांधी एका कार्यक्रमात म्हणाले.

**राहुल गांधींच्या या विधानावरुन शिंदे यांनी टीकास्त्र सोडले आहे.**

विदेशात जाऊन सातत्याने भारताची, येथील नागरिकांची बदनामी करण्याचा उद्योग विरोधी पक्षनेते, लोकप्रतिनिधी राहुल गांधी करतात. परदेशात जाऊन मनाला येईल ते बरळणे, बेछूट आरोप करणे लोकप्रतिनिधीला शोभत नाही. मात्र बोलताना त्यांनी काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा उघड केला, अशी टीका शिंदे यांनी केली.

'आपला भारत देश ही 'फेअर प्लेस' नाही, असे परदेशात जाऊन तिथल्या विद्यार्थ्यांसमोर बोलणं हे भारतातील नागरिकांसाठी अत्यंत अवमानकारक आहे. राहुल गांधी हे परकीय मानसिकतेलाच धार्जिणे आहेत, हे या निमित्ताने सिद्ध होते. अनेक सर्वसामान्य भारतीय विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर आपल्या बुद्धितेजाने लोकांची मने जिंकली आहेत. स्वामी विवेकानंदांपासून ते आजच्या आयटी क्षेत्रातील बुद्धिमंत विद्यार्थ्यांपर्यंत अनेकांनी अमेरिकेत भारताचा ध्वज उंचावला आहे. त्या सगळ्यांचा अवमान राहुल गांधी यांनी केला आहे. देशाचा, आमच्या अस्मितांचा आणि नागरिकांचा अपमान आम्ही कधीही सहन करणार नाही', असे शिंदेंनी सांगितले.

**राहुल गांधी काय म्हणाले ?**

जेव्हा योग्य वेळ येईल, त्यावेळी काँग्रेस आरक्षण संपविण्याचा विचार करेल. पण सध्या ती योग्य वेळ नाही, असे राहुल गांधी म्हणाले होते. त्यांच्या विधानावर टीका केली जात आहे. यावर राहुल गांधी यांनी स्पष्टीकरण दिले आहे. आमचा आरक्षणाला विरोध नाही. काँग्रेस पक्षाने कायमच पाठिंबा दिला आहे. ५० टक्क्यांच्या पुढे आरक्षण घेऊन जाण्याचा आमचा हेतू आहे. मी जे बोललो ते चुकीच्या प्रकारे पसरवले जात आहे. माझा आरक्षणाला विरोध नाही. मी आरक्षणाच्या बाजूनेच आहे, असे राहुल गांधींनी म्हटले आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## हेलिकॉप्टरने रक्त; गर्भवतीचे वाचले प्राण!

### आरोग्य यंत्रणेचे कौतक




**गडचिरोली :** जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेवर ताशेरे ओढण्यात येत असतानाच एक गर्भवती महिलेचे प्राण वाचविण्यासाठी हेलिकॉप्टरने रक्त युनिट भामरागडला रवाना करण्यात आल्याने जिल्हा प्रशासनाचे कौतुक करण्यात येत आहे.

आरेवाडा येथील मातोश्री चौधरी नामक गर्भवती महिलेची प्रसूती झाल्यामुळे रक्त कमी असल्याने हेलिकॉप्टरने या महिलेसाठी रक्त पाठविण्यात आले. प्रसूतीच्या वेळी रक्तस्राव होत असल्यामुळे आपत्कालीन स्थितीत या महिलेला रक्ताला अति आवश्यकता होती. हेलिकॉप्टरने रक्त पाठवणे अधिक सोपे आणि जलद असल्याने झटपट निर्णय घेण्यात आला. आरोग्य केंद्राच्या आवारातच हेलिकॉप्टर उतरवण्यात आले. तिथून तातडीने रक्त असलेले युनिट रक्त घेऊन पोहचले. या महिलेची प्रसूती झाली असून बाळ व माता सुखरूप आहे. सध्या या भागात पूर परिस्थिती असून अनेक मार्ग बंद पडले आहेत. सध्या पावसाने जिल्ह्यात थैमान घातले आहे. या महिलेचे प्राण धोक्यात आले. तिला अशा स्थितीत तालुका अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी हलविण्याचे प्रयत्न करणे सुद्धा धोक्याचे ठरू शकतात हे वेळीच ओळखून अशा परिस्थितीत वेळ खर्ची घालण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे आरोग्य यंत्रणेने झटपट चक्रे फिरवली.

» Selected

## मलायकाच्या वडिलांचा इमारतीवरून पडून मृत्यू

**मुंबई** : अभिनेत्री मलायका अरोराचे वडील अनिल अरोरा यांचा बुधवारी सकाळी ते राहत असलेल्या उंच इमारतीवरून पडून मृत्यू झाला. त्यांनी आत्महत्या केली की ते तोल जाऊन पडले याचा तपास पोलिस करत आहेत. या घटनेमुळे दुःख व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. अभिनेता अरबाज खान याने तातडीने येत कुटुंबाला धीर दिला. अनिल अरोरा यांचे पार्थिव वांद्रे येथील डॉ. भाभा हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले आहे. वांद्रे येथील अल्मेडा पार्क या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून उडी घेऊन अरोरा यांनी आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती होती. पोलिसांना कोणतीही सुसाईड नोट सापडलेली नाही. अनिल अरोरा यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. मागील वर्षी अरोरा यांना प्रकृती अस्वास्थामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अनिल यांनी आत्महत्या केली नसून ते सहाव्या मजल्यावरील बाल्कनीमधून खाली पडले, असे पोलीस म्हणत आहेत. ते बाल्कनीजवळ उभे होते आणि अचानक खाली पडले. अरोरा हे ८० वर्षांचे होते. बाल्कनीच्या ग्रिलची उंची कमी असल्याने त्यांचा तोल जाऊन खाली पडले का, याचा तपास पोलीस करत आहेत.



# संकेत बावनकुळेला वाचवायचा प्रयत्न : अंधारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूरमध्ये ऑडी कार प्रकरणात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत हा असल्याने त्याला वाचवायचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला.

अंधारे थेट नागपूरमधील सीताबर्डी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल्या आणि त्यांनी पोलिसांवर प्रश्नांची सरबत्ती केली. अपघातग्रस्त गाडीचा नंबर एफआयआरमध्ये का नाही? अपघात झाल्यावर गाडी पोलिस स्टेशनला आणण्याऐवजी ती गॅरेजमध्ये दुरूस्तीला का पाठवण्यात आली? हा अपघात झाल्यावर त्या गाडीतील दोघांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, पण संकेत बावनकुळे याची मेडिकल का केली नाही ? असे एकामागोमाग एक सवाल विचारत अंधारे यांनी आक्रमक भूमिका घेतली.



अपघात झाला तेव्हा संकेत हाही कारमध्येच होता, असे समोर आले आहे. अंधारे म्हणाल्या, रात्री बार – साडेबाराच्या दरम्यान यांनी लाहोर बारमध्ये मद्य घेतले, बीफ कटलेटही खाल्लं. अपघात झाल्यावर गाडीचा नंबर, डिटेल्स एफआयआरमध्ये का नाहीत? गाडीचे डिटेल का आले नाही? अपघातावेळी गाडीचा वेग १५० च्या आसपास होता, रॅश ड्रायव्हिंगमुळेच हा अपघात झाल्याचा दावा अंधारे यांनी केला.

बावनकुळे म्हणतात माझ्या मुलाची चौकशी करा, पण अजून त्यांच्या मुलाचे नाव एफआरआय मध्ये आलेच नाही. बावनकुळे यांची ताकद भारी पडत असेल म्हणून पोलीस संकेतचे नाव एफआरआय मध्ये घेत नाही, असे म्हणत पोलिसांना ३६ तास का लागले असा सवाल त्यांनी केला. जितेंद्र सोनकांबळे या फिर्यादीवर दबाव असल्याने ते एफआरआय मागे घेणार असल्याचे कळते असा आरोपही अंधारे यांनी केला.

संकेतने दारू प्यायली नव्हती असे म्हटले जाते, मग तो मित्रांसोबत बारमध्ये दूध प्यायला गेला होता का ? असा सवाल विचारत संकेत बावनकुळेवर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे, अशी मागणी अंधारे यांनी केली.

## कांदा भाव वाढूनही शेतकरी लाभाविना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** किरकोळ बाजारात कांद्याचा दर ८० रुपये किलोवर पोहोचला असला तरी थोड्या प्रमाणातच कांदा उत्पादकांकडे शिल्लक असल्याने त्यांना फारसा दिलासा मिळालेला नाही. सरासरी कांद्याचा दर ५० रुपये किलोच्या आसपास आहे. ज्या मोजक्या शेतकऱ्याकंडे सध्या कांदा आहे, त्या शेतकऱ्यांना फायदा होत आहे. दरम्यान, ग्राहकांच्या खिशाला फटका बसू नये म्हणून सरकारने उपाययोजना करुन देखील कांद्याचे दर वाढत आहेत.

अनेक शहरात सरकारने कमी दरात कांद्याची विक्री सुरु केली आहे. मात्र, तरीही कांद्याच्या दरात घसरण होत नाही. सरकारने सवलतीच्या दरात कांदा विकण्यास सुरुवात केली आहे. तरीदेखील किरकोळ बाजारात कांद्याचा दर ८० रुपये किलोवर कायम आहे.

# अजित पवार बारामतीतूनच लढतील : पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गोंदिया:** उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीतूनच निवडणूक लढवतील, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

बारामतीला एकदा माझ्याशिवाय दुसरा आमदार मिळाला पाहिजे. दुसरा आमदार आला की माझी किंमत तुम्हाला कळेल. मीही आता ६५ वर्षांचा झालोय, न मागताही विकासकामं होतात, तरीही बारामतीकर वेगळा विचार करतात, अशी खंत पवार यांनी व्यक्त केली होती.



पवारांच्या वक्तव्यानंतर ते बारामतीमधून निवडणूक लढणार नसल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत का? अशा चर्चांना उधाण आले आहे. याच मुद्द्यावरून जयंत पाटील यांनी अजित पवार यांच्यावर टीका करत टोला लगावला आहे.

पाटील म्हणाले की, अजित पवार हे काय बोलतात त्यासाठी त्यांच्याकडे कन्सल्टंट आहेत आणि कन्सल्टंट हे काय सांगतात त्यानुसार ते बोलत असतात. ते स्वतःच्या बुद्धीने आणि स्वतःच्या इच्छेने ते बोलत नाहीत. त्यांचे कन्सल्टंट जे सांगतात त्यानुसार ते बोलतात.

भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाच्या गाडीने अपघात झाला. यावर बोलताना पाटील म्हणाले की, याबाबतीत खराखुरा तपास पोलिसांनी करावा, सर्व सीसीटीव्ही तपासावे आणि त्यानंतरच आम्ही बोलू. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची शिवस्वराज यात्रा तिरोडा येथे येणार होती. परंतु त्यापूर्वीच काही अज्ञात व्यक्तींनी त्यांचे पोस्टर पाडले होते. यावर पाटील म्हणाले की, या विधानसभा क्षेत्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मोठे अस्तित्व आहे. त्यामुळे येथील विरोधी लोक घाबरलेले आहेत आणि आमच्या पक्ष या ठिकाणी वाढतो आहे, त्यामुळे आमचे पोस्टर फाडले असतील.

## गणेश दर्शनातून राज यांची तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** ज्यातील विधानसभा निवडणुकीला दोन महिने शिल्लक राहिले आहेत. सर्व पक्षांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झाली असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेही ॲक्शन मोडवर आले आहेत. मनसेने ठाण्यातून विधानसभा निवडणूक लढवण्याची जोरदार तयारी सुरु केली आहे. याच पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी ठाण्यातील चार विधानसभा क्षेत्रातील गणेश मंडळांना भेट दिली.

ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असल्याने ठाण्याला राजकीयदृष्ट्या महत्व आहे. शिंदे आतापासूनच मैदानात उतरले आहेत. तर दुसरीकडे मनसेकडूनही गणेशोत्सवाचे निमित्त साधत विधानसभेच्या मोर्चेबांधणीला सुरुवात करण्यात आली आहे. राज ठाकरे यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी केली आहे.

## २० मिनिटात : १० एकर शेतीची फवारणी

# नंदूरबारच्या तरुणाने बनवले बूम-स्प्रे मशीन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नंदूरबार :** जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील एक तरुण शेतकऱ्याने भंगार साहित्याचा उपयोग करत घरच्या घरी ५५ फूट बूम स्प्रे मशीन बनवले आहे. याद्वारे फक्त २० मिनिटात १० एकर शेतीची फवारणी होते. कमलेश अशोक चौधरी असे या ३३ वर्षीय शेतकऱ्याचे नाव आहे.

अलिकडच्या काळात तरुण शेतकरी आपल्या शेतात विविध प्रयोग करताना दिसत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भरघोस उत्पादन घेत आहेत. यातच कमलेश एक आहे. प्रकाशा येथील कमलेश चौधरी हा खासगी कंपनीत काम करत होता. पण वडिलांच्या आजारामुळे नोकरी सोडून ५ वर्षापूर्वी गावाकडे परतला. वडिलांच्या निधनानंतर त्यांची दहा एकर शेती तो करू लागला. कमलेश कृषी पदवीधर आहे. गावाबाहेर वैजाली रस्त्यावरील एका गोडाऊनमध्ये सर्व टाकाऊ वस्तू त्याने संग्रह करून ठेवलेल्या आहेत. दरवर्षी तो नवीन नवीन शेती अवजारावर प्रयोग युट्युबवर पाहून करीत असतो. टाकाऊपासून टिकाऊ तयार करण्याची त्याला आवड आहे. गेल्या वर्षी कमलेशने २७ फूट लांब बूम स्प्रे पूर्णपणे हाताने तयार केला होता. त्यातून त्याने १८५० एकरावर औषध फवारणी केली.

यावर्षी चक्क हायड्रोलिक आणि तोही ५५ फूट लांब बूम स्प्रे तयार केला. कमलेशने दोन महिन्यांमध्ये हायड्रोलिक बूम स्प्रे मशीन तयार केले आहे. वीस ते पंचवीस मिनिटात दहा एकरात कीटकनाशक, तणनाशकाची फवारणी ते करते. कमलेश चौधरीची ही कामगिरी पाहण्यासाठी शेतकरी गर्दी करीत आहेत.

या मशीनमुळे फवारणी करताना समप्रमाणात फवारणी केली जाते. कमी वेळामध्ये व पैशाची बचत होत फवारणी केली जाते.

### कसे तयार केले मशीन?

कमलेशने जुने ट्रॅक्टर साडेतीन लाखाला खरेदी केले. त्यासाठी पंजाबमधून एक लाख ७५ हजाराचे इजरायली बनावटीचे बुस्टनचे एअरलेस टायर मागवले. त्याला एक हजार लिटरची टाकी बसवली. ही टाकी ट्रॅक्टरच्या मधोमध बसवली; जेणेकरून ट्रॅक्टर पुढून उचलले जाऊ नये. टाकीतील औषधी फवारणीसाठी स्पीड पंप बसवला. तो एका मिनिटाला १८५ लिटर पाण्याच्या प्रेशर करतो. कीटकनाशक फवारणी करताना अंगावर येऊ नये म्हणून काचेची केबिन बनवली. त्यात पंखा बसवला आहे.

## कृषिक्रांती..!

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**नंदूरबार:** नंदूरबारच्या कमलेश चौधरी या तरुण शेतकऱ्याने भंगार साहित्याचा उपयोग करत घरच्या घरी ५५ फूट बूम स्प्रे मशीन बनवले आहे. याद्वारे फक्त २० मिनिटात १० एकर शेतीची फवारणी होते.

## महिनाअखेरीस मुसळधार पावसाचा अंदाज

# १६ सप्टेंबरपर्यंत पावसात खंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात गुरुवारपासून पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. सध्या १५ ते १६ सप्टेंबरपर्यंत खंड पडणार आहे. त्यानंतर राज्यात काही ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २७ पासून पुन्हा मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

राज्याच्या अनेक भागात पावसाने विश्रांती घेतली आहे. अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.



गोसीखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस होत आहे. परिणामी, धरणाच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाल्याने धरण प्रशासनाने धरणातून होणाऱ्या पाण्याच्या विसर्गात मोठी वाढ केली आहे. धरणाचे सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आले असून बुधवारी सकाळपासून धरणाचे सात दरवाजे दोन मीटरनी तर, २६ दरवाजे दीड मीटरनी सुरू करण्यात आले आहेत. सध्या धरणातून ३ लाख ९३ हजार ६१९ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. पाऊस सुरू राहिल्यास पाण्याच्या विसर्गात आणखी मोठी वाढवण्याची शक्यता असल्याने नदीकाठावरील गावातील नागरिकांनी सतर्क रहावे, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले होते. अनेक भागाला पुराचा फटका बसला होता. नदी नाले तुडुंब भरून वाहत होते. अनेक मार्ग बंद करण्यात आले होते. नदी आणि नाल्याच्या बाजूला असणाऱ्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## शक्तिपीठ, भक्तीपीठ, औद्योगिक महामार्ग भूसंपादन रद्द

# तीन महत्वाकांक्षी महामार्गांना ब्रेक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शक्तिपीठ महामार्गापाठोपाठ भक्तीपीठ महामार्ग आणि औद्योगिक महामार्गालाही ब्रेक लागला आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी भूसंपादनाला विरोध केल्याने या तीनही महामार्गांचे भूसंपादन थांबवण्यात आले आहे. नागपूर गोवा असा शक्तिपीठ महामार्ग, तर पुणे नाशिक औद्योगिक महामार्ग आणि सिंदखेड राजा ते शेगाव असा भक्तीपीठ महामार्ग होणार होता. या तीन महामार्गांमध्ये जवळपास सव्वालाख कोटी रुपयांची गुंतवणूक होती. समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर हे तीन महामार्ग उभारण्यात येणार होते.



शक्तीपीठ, भक्तीपीठ आणि औद्योगिक महामार्ग हा महायुती सरकारचा सर्वात महत्वकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखला जात होता. आता या तिन्ही महामार्गाचे भूसंपादन थांबवण्यात आले आहे. राज्यातील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यात या महामार्गाची महत्वाची भूमिका होती. मात्र भूसंपादनाला स्थानिक शेतक-यांनी विरोध केल्यानंतर एमएसआरडीसीने भूसंपादन थांबवले आहे.

तिन्ही महामार्ग वादाच्या भोवऱ्यात अडकल्याने सरकारला बॅकफूटवर जावे लागले आहे. शक्तीपीठ महामार्गामध्ये राज्यातील २७ हजार हेक्टर जमिनी अधिग्रहित करण्याची योजना होती. मात्र, शेतकऱ्यांच्या विरोधानंतर राज्य सरकारने एक पाऊल मागे घेतले आहे.

### शेतकऱ्यांचा विरोध; सरकार मागे

पुणे ते नाशिक अतिजलद प्रवासासाठी 'औद्योगिक महामार्ग' बांधण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या महामार्गामुळे दोन शहरातील अंतर केवळ दोन तासात पार होणार होते. या महामार्गासाठी भूसंपादन देखील सुरू होते. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गावरून तीर्थक्षेत्र शेगावला अतिजलद वेगात जाता यावे यासाठी सिंदखेडराजा – शेगाव दरम्यान समृद्धी महामार्गाचा विस्तार करण्याचा निर्णयही एमएसआरडीसीने घेतला होता. मात्र बुलढाण्यातील शेतकऱ्यांनी विरोध केल्याने भक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यात आला. सरकारने मान्यता दिल्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्याची तयारी सुरू होती.

## संचारबंदी कायम : इंटरनेट सेवाही बंद

# मणिपूर पुन्हा एकदा पेटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** मणिपूरमधील वातावरण पुन्हा एकदा तणावपूर्ण बनले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे तीन जिल्ह्यांमध्ये संचारबंदी लागू करावी लागली असून, इंटरनेटही बंद करण्यात आले आहे. अफवा पसरू नयेत म्हणून ही उपाययोजना करण्यात आली आहे.

दरम्यान, गृहमंत्री अमित शाह यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करावा, असे काँग्रेसचे म्हणणे असून, राज्यात गेल्या वर्षभरापासून कुकी आणि मेईतेई समाजात संघर्ष सुरू आहे. मणिपूरचे काँग्रेसचे खासदार ए. बिमोल अकोइजाम यांनीही अमित शाह यांना पत्र लिहून नुकत्याच घडलेल्या हिंसाचाराच्या घटनांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मणिपूरच्या उच्च शिक्षण विभागाने १२ सप्टेंबर रोजी सर्व सरकारी आणि खासगी महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. राज्यभरात सुरू असलेल्या आंदोलनामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. परिस्थिती अशी आहे की, मणिपूरमध्ये अनेक ठिकाणी समाजकंटकांनी ड्रोन आणि रॉकेटने हल्ले केले आहेत. दरम्यान, राज्य पोलिसांनी एटीटी ड्रोन यंत्रणा तैनात केली आहे. गेल्या आठवड्यात मणिपूरच्या जिरीबाम जिल्ह्यात पुन्हा एकदा हिंसाचार उसळला. त्यामुळे ६ जणांचा मृत्यू झाला. संशयित कुकींनी मैतेई समाजाचे प्राबल्य असलेल्या नुंगछप्पी या गावावर हल्ला केला. हे गाव इंफाळपासून २२९ किमी अंतरावर आहे. यानंतर हिंसाचार उसळला.

गुंडांनी मणिपूर रायफल्सच्या कॅम्पवर हल्ला केला आणि शस्त्रे लुटण्याचा प्रयत्न केला. अखेर सुरक्षा दलांनी हवेत गोळीबार तसेच अश्रुधुराचे गोळे सोडल्याने हा प्रकार आटोक्यात आला. थौबल जिल्ह्यात सोमवारी दरोडेखोरांनी पोलिसांकडून शस्त्रे हिसकावून घेतली. याशिवाय पोलिसांवर गोळीबारही करण्यात आला. मणिपूरमधील परिस्थिती इतकी बिघडली आहे की मेघालयचे मुख्यमंत्री कोनराड संगमा यांनीही चिंता व्यक्त केली आहे. त्याचा परिणाम इतर राज्यांवर होऊ नये यासाठी केंद्र सरकारने हस्तक्षेप करावा, असे त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने मणिपूरमध्ये सीआरपीएफच्या दोन बटालियन पाठवल्या आहेत.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पाकिस्तानने केले शस्त्रसंधीचे उल्लंघन

आंतरराष्ट्रीय

**पाकिस्तानने पुन्हा** एकदा शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आहे. बुधवारी पाकिस्तानी सैन्याने गोळीबार केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत बीएसएफ अर्थात सीमा सुरक्षा दलाचे जवान जखमी झाले. भारतीय जवानांनीही पाकिस्तानच्या आगळिकीला



प्रत्युत्तर देत गोळीबार केला. सीमेपलीकडे जीवितहानी झाली आहे की नाही, हे स्पष्ट झालेले नाही. दुपारी २.३५ च्या सुमारास अखनूर भागात सीमेपलीकडून गोळीबार झाला. बीएसएफने गोळीबाराला चोख प्रत्युत्तर दिले. जवानांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले असून, आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेवर कडक पहारा ठेवण्यात आला आहे. २५ फेब्रुवारी २०२१ रोजी भारत आणि पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी कराराचे नूतनीकरण करण्यात आले. मात्र, गेल्या वर्षी रामगड सेक्टरमध्ये पाकिस्तानी रेंजर्सने केलेल्या गोळीबारात बीएसएफचा एक जवान शहीद झाला होता. विशेष म्हणजे जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक होत असताना, शस्त्रसंधीचे उल्लंघन झाले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये १८ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी तीन टप्प्यांत मतदान होणार असून, जम्मू जिल्ह्यातील अखनूर सेक्टरमध्ये १ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील मतदान २५ सप्टेंबर रोजी होणार असून मतमोजणी ८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. गेल्या दशकभरात पहिल्यांदाच तेथे विधानसभा निवडणुका होत आहेत. पुलवामा हल्ला आणि कलम ३७० हटवल्यानंतर भारत-पाक संबंध ताणले गेले होते.

» Selected

## निर्देशांकात घसरण

**मुंबई :** बुधवारी भारतीय बाजारात घसरण पहायला मिळाली. निर्देशांक ३९८ अंकांनी घसरून ८१,५२३.१६ वर आणि निफ्टी १२२.६५ अंकांनी घसरून २४,९१८.४५ वर बंद झाला. सुमारे १,६१९ समभाग वाढले, २,३४५ घसरले आणि १०६ स्थिर राहिले. एशियन पेंट्स, बजाज फायनान्स आणि सन फार्मा यांचे समभाग वधारले, तर टाटा मोटर्स, एनटीपीसी आणि अदानी पोर्ट्स अँड सेझ यांचे समभाग सर्वाधिक घसरले. कच्च्या तेलासारख्या कमॉडिटीच्या किमती ७० डॉलरपर्यंत घसरल्याने देशांतर्गत बाजारात आशियाई समभागांच्या तुलनेत किरकोळ घसरण झाली. चिनी अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे बाजारातील धारणा सावध राहिली.

## केजरीवालांना दिलासा नाहीच

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिलासा मिळाला नसून, सीबीआय प्रकरणी राऊस अव्हेन्यू न्यायालयाने केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत २५ सप्टेंबरपर्यंत वाढ केली आहे. दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने आप नेते दुर्गेश पाठक आणि इतरांना १ लाख रुपयांच्या जामीनाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. राऊस ॲव्हेन्यू कोर्टाने जारी केलेल्या समन्सवर तो हजर झाला होता. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि इतर ताब्यात घेतलेल्या आरोपींना तिहार तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले. केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत २५ सप्टेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, दिल्ली विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजेंद्र गुप्ता यांनी सांगितले की, आपने संविधानाचे उल्लंघन केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी राष्ट्रपतींना पत्र पाठवून आम आदमी पक्षाच्या सरकारने संविधानाचे भंग केल्याप्रकरणी दिल्लीतील त्यांचे सरकार बरखास्त करण्याची मागणी केली असल्याचे वृत्त आहे. भाजप आमदारांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन सादर केले असून, हे निवेदन गृह मंत्रालयाला पाठवण्यात आले आहे.

## राहुल गांधींचा वादग्रस्त अमेरिका दौरा

# इल्हान ओमरची घेतली भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा अमेरिका दौरा वादाच्या भोवऱ्यात सापडलेला दिसत असून, त्यांनी या दौऱ्यात भारताच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या अमेरिकी खासदार इल्हान ओमर यांची भेट घेतली. इल्हान ओमर हा पाकव्याप्त काश्मिरमध्ये भेट दिल्यानंतर, चर्चेत आला होता.

याच ओमर याने काश्मिरवर असलेल्या भारताच्या नियंत्रणावरही टीका केली होती. ओमरचा पाकव्याप्त काश्मिर दौरा पाकिस्तानने प्रायोजित केल्याचे मानले जाते. तसेच २० कोटी मुस्लिम नरसंहाराच्या उंबरठ्यावर असल्याची खोटी बातमी पसरवल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात भारतीय समुदायासह विद्यापीठांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधला होता. यावेळी त्यांनी अमेरिकी खासदारांचीही भेट घेतली. या बैठकीचे आयोजन काँग्रेस सदस्य ब्रॅडली जेम्स शेरमन यांनी केले होते आणि त्यात अमेरिकन काँग्रेसचे सदस्य जोनाथन जॅक्सन, रो खन्ना, राजा कृष्णमूर्ती, बार्बरा ली, मिस्टर ठाणेदार, इल्हान ओमर, हँक जॉन्सन आणि जान शाकोवस्की उपस्थित होते. राहुल यांनी अमेरिकेचे मुत्सद्दी डोनाल्ड लू आणि काँग्रेस सदस्य प्रमिला जयपाल यांचीही भेट घेतली.

राहुल गांधी आणि इल्हान ओमर याचे एक छायाचित्र सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. भाजपकडून काँग्रेस आणि राहुल गांधींवर हल्लाबोल केला जात आहे. पक्षाचे प्रवक्ते आणि आयटी सेलचे अध्यक्ष अमित मालवीय यांनीही राहुल यांच्यावर जोरदार टीका केली. राहुल गांधी यांनी अमेरिकेत कट्टर इस्लामी आणि स्वतंत्र काश्मिरचे पुरस्कर्ते, पाकिस्तानी नेते ओमर याच्यासोबत दिसून आले. काँग्रेस आता उघडपणे भारताविरोधात काम करत आहे, अशा शब्दांत त्यांनी राहुल यांच्यावर टीका केली.

## पीटी उषा यांच्यावर फोगटची टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कुस्तीपटू आणि काँग्रेस नेत्या विनेश फोगटने भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या प्रमुख पीटी उषा यांच्यावर टीका केली आहे. ऑलिपिंकमध्ये कुस्तीच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या फोगटला वजनामुळे अपात्र ठरवण्यात आले होते. नुकताच तिने काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून, हरयाणातील जुलाना मतदारसंघातून उमेदवारीही दिली आहे. फोगाट रुग्णालयात दाखल झाली, तेव्हा पीटी उषा तिला भेटायला आल्या होती. फोगाट यांच्यासोबत त्यांनी फोटोही काढला होता. वजन कमी करण्याच्या प्रयत्नात फोगटच्या तब्येतीवर परिणाम झाला आणि तिला रुग्णालयात दाखल करावे लागले होतेय हा फोटो शेअर करून पीटी उषा यांनी राजकारण केल्याचा आरोपही केला आहे.

# केदारनाथच्या चरणी ११ लाख भाविक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** बाबा केदार यांच्याप्रती देश-विदेशातील प्रवाशांची अढळ श्रद्धा असल्याने, यात्रा मार्गावर अपघात होऊनही भाविकांची पावले थांबत नाहीत. सोनप्रयागपासून केदारनाथ धामपर्यंत आपत्तीची भीती भाविकांच्या श्रद्धेला थांबवू शकत नाही. म्हणूनच, सोनप्रयागमध्ये झालेल्या अपघातानंतरही मंगळवारी सुमारे २,५०० भाविक केदारनाथला रवाना झाले आहेत. ११ लाखांपेक्षा जास्त भाविकांनी केदारनाथला यावर्षी भेट दिली आहे.

हिमालयात ११,७०० फूट उंचीवर असलेले भगवान केदारनाथचे मंदिर कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे ठिकाण असून, अत्यंत कठीण परिस्थितीतही बाबांचे भक्त येथे पोहोचत आहेत. यावर्षी १० मे रोजी केदारनाथ मंदिराचे कपाट उघडल्यापासून दरड कोसळण्याच्या आणि डोंगरावरून दगड पडण्याच्या मोठ्या घटना घडल्या असून त्यात १९ भाविकांचा मृत्यू झाला आहे. असे असूनही भाविकांचा विश्वास कमी होत नाही. गेल्या वर्षी २०२३ मध्ये जवळपास १९ लाख यात्रेकरू केदारनाथला पोहोचले होते. यावर्षी आतापर्यंत ११.१७ लाखांहून अधिक भाविकांनी यात्रा पूर्ण केली आहे.

आदल्या दिवशी सुमारे ५ हजार भाविक पाऊस आणि अनेक अडथळे पार करून केदारनाथ धाममध्ये पोहोचले. मंगळवारी सोनप्रयागहून सुमारे २,५०० प्रवासी केदारनाथला रवाना झाले आहेत.

## अवैध मशिदीला आक्षेप

# शिमला येथे तणाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शिमल्यातील संजौली भागातल्या एका मशिदीवर काही हिंदू संघटनांनी आक्षेप घेतला असून तिथलं अनधिकृत बांधकाम पाडण्यात यावं, अशी मागणी केली जात आहे. या मागणीसाठी आज हिंदू संघटनांकडून मोर्चा काढण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकारली होती. या पार्श्वभूमीवर आंदोलक व पोलिसांमध्ये आज सकाळी वाद झाला. परिणामी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला. यावेळी संजौली भागातली परिस्थिती तणावपूर्ण झाली.

मशिदीवरून तेथे तणाव निर्माण झाला. आंदोलकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पोलिसांशी त्यांची चकमक झाली. पोलिसांनी लाठीचार्जही केला. शेवटची बातमी येईपर्यंत आंदोलक मशिदीच्या ठिकाणी पोहोचले होते. संजौली भागातल्या एका मशिदीमध्ये बेकायदेशीर बांधकाम करण्यात आल्याचा दावा काही हिंदू संघटनांनी केला होता. त्यावरून तीव्र भावना व्यक्त होऊ लागल्या होत्या. हे बांधकाम पाडण्यात यावे, अशी मागणी आंदोलकांकडून केली जात होती. आपल्या मागण्यांसाठी शिमला विधानसभेच्या जवळच असणाऱ्या चौरा मैदानात हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी सर्वतोपरी प्रयत्न केले. मध्यरात्रीपर्यंत जिल्हा प्रशासनाकडून कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

## ऑरेंज काउंटी पेटली

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**ऑरेंज काउंटी :** कॅलिफोर्नियाच्या ऑरेंज काउंटीच्या टेकड्यांमध्ये लागलेला वणवा शमविण्यासाठी एक विमान शर्थीचे प्रयत्न करताना दिसून आले.

## राशीद इंजिनियरला अंतरिम जामीन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयाने जम्मू-काश्मिरच्या बारामुल्ला मतदारसंघाचा खासदार शेख राशीद उर्फ राशीद इंजिनियरला अंतरिम जामीन दिला आहे. न्यायालयाने जम्मू-काश्मिर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी दहशतवादी राशीद याला २ ऑक्टोबरपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे.

बारामुल्ला लोकसभा मतदारसंघाचा खासदार असलेला राशीद इंजिनियर याला २०१७ च्या दहशतवादी फंडिंग प्रकरणात दिल्लीच्या तिहार तुरुंगात आहेत.

# स्टॅच्यू ऑफ युनिटीला अपाय झालेला नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटीला तडे गेल्याने त्याच्या स्थैर्याविषयी भीती निर्माण झाली आहे, असा आरोप करणारी पोस्ट सोशल मीडियावर टाकल्यानंतर अज्ञात व्यक्तीविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. १८२ मीटर उंचीचे हे स्मारक नर्मदा जिल्ह्यातील केवडिया येथे आहे. भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मरणार्थ ते उभारले आहे.

८ सप्टेंबर रोजी 'रागा4इंडिया' हँडलवरून करण्यात आलेल्या आणि नंतर डिलीट करण्यात आलेल्या या पोस्टमध्ये दावा करण्यात आला आहे की, या कथित दरडींमुळे पुतळा कोसळू शकतो. त्यासोबतचे छायाचित्र पुतळ्याच्या बांधकामाच्या टप्प्यातील जुने छायाचित्र होते, त्यात त्याची सद्यस्थिती दिसत नव्हती.

स्टॅच्यू ऑफ युनिटी एरिया डेव्हलपमेंट अँड टुरिझम गव्हर्नन्स ऑथॉरिटीचे उपजिल्हाधिकारी अभिषेक रंजन सिन्हा यांनी भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम ३५३ (१) अन्वये एफआयआर दाखल केला आहे. हा विभाग लोकांची भीती किंवा भीती निर्माण करण्याच्या हेतूने खोट्या माहितीच्या प्रसारावर लक्ष केंद्रित करतो.

अशा चुकीच्या माहितीमुळे सार्वजनिक शांतता तर भंग होतेच, शिवाय महत्त्वाच्या राष्ट्रीय स्मारकांवरील विश्वासही कमी होतो, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

ऑक्टोबर २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटीला दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देतात.

# २० किमीसाठी टोल नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम, २००८ मध्ये सुधारणा केली असून, यानुसार २० किमीपर्यंत खासगी वाहनांना टोल शुल्क भरावे लागणार नाही. नवीन दुरुस्तीमध्ये प्रदान केलेल्या शुल्क सवलतीचा फायदा केवळ ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टीम (जीएनएसएस) असलेल्या खासगी वाहनांनाच होणार आहे.

मंत्रालयाच्या नवीन अधिसूचनेनुसार, खासगी वाहने जीएनएसएसने सुसज्ज असल्यास महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवर दररोज २० किमीपर्यंत प्रवास करण्यासाठी कोणतेही टोल शुल्क आकारले जाणार नाही. मात्र, त्यापेक्षा जास्त अंतरासाठी वास्तविक प्रवास केलेल्या अंतरानुसार टोल लागेल. फास्टॅग प्रणालीच्या बरोबरीने जीएनएसएस आधारित टोल संकलन प्रणाली प्रायोगिक प्रकल्प म्हणून सुरू करण्याची आली आहे.

## राहुल यांच्या व्यक्तव्यामुळे खळबळ

# काँग्रेस आरक्षणविरोधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राहुल गांधी यांनी अमेरिकेतील आरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे भारताच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. आरक्षणाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राहुल गांधी म्हणाले की, आरक्षण रद्द करण्याची योग्य वेळ अजून आलेली नाही. त्यांच्या या उत्तरावरून वाद निर्माण झाला असून, गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे.

अमित शहा म्हणाले की, आरक्षण संपवण्याची भाषा करून राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा काँग्रेसचा आरक्षणविरोधी चेहरा उघड केला आहे. प्रादेशिकता, धर्म आणि भाषेच्या आधारे फूट पाडण्याचे काँग्रेसचे राजकारण राहुल यांच्या वक्तव्यातून उघड झाले आहे.

दरम्यान, वॉशिंग्टनमध्ये माध्यमांशी संवाद साधताना राहुल म्हणाले की, आरक्षणाच्या मुद्द्यावरून त्यांच्या विधानाचा विपर्यास केला गेला आहे. काँग्रेस ५० टक्क्यांच्या पेक्षा जास्त आरक्षण काँग्रेस देईल. काँग्रेस कधीही आरक्षणाच्या विरोधात नसून, मी आरक्षणाच्या विरोधात आहे, हे माझे विधान चुकीच्या पद्धतीने मांडले गेले, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

अमित शाह यांनी असे म्हटले की, देशविरोधी बोलणे आणि देशाला तोडू इच्छिणाऱ्या शक्तींच्या पाठीशी उभे राहणे ही राहुल आणि काँग्रेसची सवय आहे. जम्मू-काश्मिरमध्ये देशविरोधी आणि आरक्षणविरोधी अजेंड्याला पाठिंबा देणे असो किंवा परदेशी व्यासपीठांवर भारतविरोधी बोलणे असो, राहुल यांनी नेहमीच देशाची सुरक्षा आणि भावना दुखावल्या आहेत. प्रदेशातून प्रदेशापर्यंत आणि धार्मिक भेदभावावर बोलणे, हे राहुल यांच्या विभाजनवादी विचारसरणीचे द्योतक आहे, असा आरोपही त्यांनी केला.

## ३३ महिन्यांनंतर दरात झाली घसरण

# कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ३३ महिन्यांच्या निचांकी पातळीवर (जवळपास ३ वर्षांच्या निचांकी पातळीवर) आल्या आहेत. मंगळवारी बेंचमार्क ब्रेंट क्रूड फ्यूचर्स डिसेंबर २०२१ नंतर पहिल्यांदाच प्रति बॅरल ७० डॉलरच्या खाली आले. ओपेक आणि त्याच्या सहयोगी देशांनी यंदाचा आणि २०२५ वर्षासाठी जागतिक बाजारातून तेल मागणी कमी राहणार असल्याचा अंदाज व्यक्त केल्यानंतर, कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली. विशेष म्हणजे ओपेकने दोन महिन्यांत दुसऱ्यांदा मागणीचा अंदाज कमी केला आहे.

ब्रेंट क्रूड फ्यूचर्सचा दर याआधी ३.२४ टक्क्यांनी घसरून प्रति बॅरल ६९.५१ डॉलरवर आला होता. तर यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडचा दर ३.६४ टक्क्यांनी घसरून ६६.२१ डॉलरवर आला होता. सोमवारी दोन्ही बेंचमार्क सुमारे १ टक्का वाढले होते. पण क्रूड फ्यूचर्सने मल्टी-कमोडिटी एक्सचेंजवर ४.१९ टक्क्यांच्या घसरणीसह प्रति बॅरल ५,५३४ रुपयांवर बॅरलवर व्यवहार केला. ओपेकने त्यांच्या मासिक अहवालात म्हटले आहे की २०२४ मध्ये जागतिक तेलाची मागणी प्रतिदिन २.०३ दशलक्ष (सुमारे २० लाख) बॅरलने वाढणार आहे. हा आकडा गेल्या महिन्यातील २.११ दशलक्ष बॅरल अंदाजापेक्षा कमी आहे. गेल्या महिन्यापर्यंत ओपेकने अंदाजात कोणताही बदल केला नव्हता. पहिल्यांदा जुलै २०२३ मध्ये जो अंदाज व्यक्त केला होता; तो त्यांनी गेल्या महिन्यांपर्यंत जैसे थे ठेवला होता. ओपेकने २०२५ च्या जागतिक मागणी वाढीचा अंदाज प्रतिदिन १.७८ दशलक्ष बॅरलवरून १.७४ दशलक्षपर्यंत कमी केला आहे. जगातील सर्वात मोठा क्रूड आयातदार असलेल्या चीनमधील खप कमी झाल्यामुळे ओपेकने ऑगस्टमध्ये मागणीचा अंदाज कमी केला होता. गेल्या काही महिन्यांपासून तेलाची मागणी असलेल्या चीनमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीत वाढ झाली आहे. यामुळे चीनमधील तेलाची मागणी कमी होण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीतील घसरण ही भारतासाठी एक सकारात्मक संकेत म्हणून पाहिले जाते आहे. कारण देशात कच्च्या तेलाच्या मागणीपैकी ८० टक्क्यांपेक्षा अधिक तेल आयात केले जाते.

#रा



"मला ऑलिम्पिकमध्ये कोणते सहकार्य मिळाले, हा प्रश्न आता पडला आहे. पीटी उषा मला भेटायला आल्या, त्यांनी एक फोटो घेतला आणि त्यानंतर बंद दाराआड राजकारण शिजले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये बरेच राजकारण घडले. त्यामुळेच मला खूप धक्का बसला. अनेक लोक मला म्हणतात की, कुस्ती सोडू नको. पण कोणत्या कारणासाठी मी कुस्ती सुरू ठेवायची? प्रत्येक क्षेत्र आता राजकारणाने व्यापले आहे" "जेव्हा तुम्ही रुग्णालयात बेडवर निपचित पडलेले असता, तेव्हा बाहेरच्या जगात काय चालले आहे, याची कल्पना नसते. तेव्हा तुम्ही आयुष्याच्या कठीण काळातून मार्गक्रमण करत असता. अशावेळी तुम्ही फक्त एकदा भेटायला येऊन फोटो काढता आणि सोशल मीडियावर असे भासवता की, तुम्ही माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहात. पाठिंबा दर्शविण्याचा हा कोणता मार्ग आहे? तुम्ही या पेक्षा अधिक करू शकला असता."

— विनेश फोगट

### आर. प्रज्ञानंद, डी. गुकेशसह अनेक भारतीय खेळाडू खेळणार

# भारताला पुन्हा पदकाची आशा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेची स्पर्धा समजल्या जाणाऱ्या बुद्धिबळ ऑलिंपियाडला बुधवारपासून बुडापेस्ट येथे सुरुवात होणार आहे. आतापर्यंत या स्पर्धेमध्ये भारताला दोन ब्राँझपदके पटकावता आली आहेत. भारतीय बुद्धिबळपटूंनी २०२१ व २०२२ मध्ये ब्राँझपदकांवर मोहोर उमटवली होती. आता पुन्हा एकदा भारताला बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये पदक पटकावण्याची आशा बाळगता येणार आहे.

महिला विभागात पदक जिंकण्याची सुवर्णसंधी भारताकडे असणार आहे. जागतिक बुद्धिबळ संघटनेकडून सप्टेंबर महिन्यात क्रमवारी जाहीर करण्यात आली. या क्रमवारीत चीनच्या चार महिला खेळाडूंना अव्वल क्रमवारी देण्यात आलेली आहे, मात्र यापैकी एकाही महिला खेळाडूचा बुद्धिबळ ऑलिंपियाडमधील सहभाग अद्याप निश्चित झालेला नाही.

रशियन खेळाडूंना बंदीमुळे सहभागी होता आलेले नाही. युक्रेनच्या संघानेही आपला सर्वोत्तम संघ या स्पर्धेमध्ये उतरवलेला नाही. त्यामुळे कोनेरु हम्पी या अनुभवी खेळाडूच्या अनुपस्थितीतही भारतीय महिला खेळाडूंना पदक जिंकण्याची उत्तम संधी असणार आहे.

भारतीय महिला बुद्धिबळ संघाची मदार डी. हरिका हिच्या खांद्यावर असणार आहे. आर. वैशाली, दिव्या देशमुख व वंतिका अगरवाल या खेळाडूंनादेखील आपली सर्वोत्तम कामगिरी करावी लागणार आहे.

खुल्या गटात अमेरिकन संघ तगडा आहे. फॅबियानो कॅरुआनाच्या उपस्थितीमुळे अमेरिकन संघाचे पारडे जड असणार आहे. भारताच्या संघात युवा खेळाडूंचा भरणा आहे. आर. प्रज्ञानंद, डी. गुकेश, अर्जुन एरीगेसी व पी. हरिकृष्णा यांच्यासह विदित गुजराथी यांना भारतासाठी चमक दाखवावी लागणार आहे. चीनकडूनही सर्वोत्तम संघ सहभागी करण्यात आला आहे.



**अशी रंगेल स्पर्धा**
- महिला व खुल्या विभागात ११ फेऱ्या
- प्रत्येक सामन्यातील विजयानंतर दोन गुण मिळणार
- टायब्रेकर झाल्यास सामन्यातील गुण महत्त्वाचे
- खुल्या विभागात १९१ संघांचा सहभाग निश्चित होण्याची शक्यता
- महिला विभागात १८० संघांचा सहभाग निश्चित होण्याची शक्यता

## डायमंड लीगमध्ये नीरज चोप्रा करणार धमाका


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ब्रसेल्स डायमंड लीगच्या अंतिम फेरीत दोन भारतीय सहभागी होणार आहेत. त्यापैकी एक नीरज चोप्रा आणि दुसरा अविनाश साबळे. ३००० मीटर स्टीपलचेस धावपटू अविनाश साबळे ब्रुसेल्स येथे होणाऱ्या डायमंड लीगच्या अंतिम फेरीत आव्हान देईल. स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा यांच्यासह या स्पर्धेत पोहोचणारा तो दुसरा भारतीय आहे.

२९ वर्षीय साबळेने प्रथमच १२ खेळाडूंच्या डायमंड लीगच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यांचा कार्यक्रम शुक्रवारी आयोजित केला जाईल जिथे सर्व १२ स्पर्धक थेट अंतिम शर्यतीत सहभागी होतील. साबळेने या मोसमात डायमंड लीगच्या दोन स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे आणि तीन गुणांसह गुणतालिकेत १४व्या स्थानावर आहे. त्याच्यापेक्षा वरच्या क्रमांकाच्या चार खेळाडूंनी स्पर्धेतून माघार घेतल्याने त्याने अंतिम फेरीत प्रवेश केला.

## किल्ले लोहगड

**पुण्याहून मुंबईकडे जाताना लोणावळ्याच्या** अलीकडे डाव्या बाजूस किल्ल्याची एक जोड गोळी दिसते ती म्हणजे किल्ले लोहगड-विसापूर होय. लोमेश ऋषींच्या आश्रमामुळे पावन झालेला, सातवाहन, राष्ट्र- कूट, चालुक्य यांच्या राजवटी लाभलेला तसेच निजामशाही, मोगलाई, शिवशाई, व पेशवाई नंतर १९४४ पर्यंत इंग्रजी फौजेच्या तैनातीत राहिलेला किल्ला म्हणले किल्ले लोहगड होय. आज विकऐंडला पिकनिक स्पॉट बनत चाललेला किल्ले लोहगडावर लोहगडवाडी कडून गडावर जाताना चार दरवाजांची आकर्षक रचना दिसून येते. त्यामध्ये पहिला पूर्वाभिमुख गणेश दरवाजा होय. या गणेश दरवाजाच्या दोन्ही बाजूंना सुंदर अशा श्री गणेश प्रतिमा आहेत. या गणेश दरवाजाच्या दोन्ही बाजूंना देवळी असून त्या देवळी मध्ये असलेले गणराज सर्वांचे लक्ष नक्कीच वेधून घेतात. या देवळीतील श्री गजाननाची मूर्ती आकाराने लहान असून मूर्तीची ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक आपत्तीमुळे फारच झीज झालेली आहे. या कारणास्तव बाप्पाच्या हातातील शस्त्रे व अंगावरील अलंकार ओळखू येत नसले तरीपण आपले ऐतिहासीक अस्तित्व टिकवून आहेत. या दरवाजाची निर्मिती पेशवाईत नाना फडणीसांनी १७८९ मध्ये केली असून सध्या एका दुर्गसंवर्धन संस्थेने सागवानी दरवाजा देखील बसविलेला आहे जो संध्याकाळी ७ नंतर बंद केला जातो. किल्ले लोहगडाचे विंचूकडा हे सर्वांचे आवडते आकर्षण असून या शिवाय गडावर नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा, महादरवाजा, श्री त्रंबकेश्वर मंदिर, श्री हजरत हाजी उमरशा दर्गा किंवा मळवली पीर दोन थडग्याची मशीद, गणेश टाके, त्रिंबक टाके व लक्ष्मी कोठार अशा अनेक वास्तु पाहण्यासारखे आहेत.



गड गणेश
**सुरेश तरलगट्टी**
शिवसुर्य प्रतिष्ठान पुणे



## बॉल बॅडमिंटन मध्ये न्यू इंग्लिश स्कूल पुणे जिल्ह्यात प्रथम

**सासवड :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा परिषद पुणे व क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जवळार्जुन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धा वयोगट १४, १७, १९ मुले व मुली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष धुंडीराज गोसावी सचिव पुणे जिल्हा बॉल बॅडमिंटन कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली उदघाटन झाले श्री प्रकाश मोहरे तालुका क्रीडाअधिकारी संजय महाजन मार्गदर्शक महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन सिलेक्शन कमिटी सदस्य, श्री मयूर जांभळे राष्ट्रीय बॉल बॅडमिंटन खेळाडू, मुख्याध्यापक उत्तमराव निगडे, या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे उद्घाटन झाले प्रमुख उपस्थिती नवनाथ राणे व्हाईस चेअरमन विविध विकास सेवा सोसायटी जवळार्जुन, सुरेश नाना टेकवडे सामाजिक कार्यकर्ते, सतीश काका साळुंखे ग्रामपंचायत सदस्य व सृष्टी हॉटेलचे संचालक, जनार्दन बापू टेकवडे शिवसेना शाखाप्रमुख, ओंकार टेकवडे सामाजिक कार्यकर्ते या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये न्यू इंग्लिश स्कूल जवळार्जुन या विद्यालयांमध्ये बॉल बॅडमिंटन स्पर्धा संपन्न झाल्या.

## भारतीय संघाचा मलेशियावर सर्वात मोठा विजय; पालची हॅट्ट्रिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय पुरुष हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीत बुधवारी मलेशियावर ८-१ अशा दणदणीत विजय मिळवला. जपान, चीन आणि मलेशिया यांना पराभूत करून भारताने विजयी हॅटट्रिक साजरी केली आहे. राजकुमार पालने सर्वाधिक ३ गोल केले, तर अराइजित सिंगने दोन, जुगराज सिंग, हरमनप्रीत सिंग व उत्तम सिंग यांनी प्रत्येकी १ गोल केले. क्रेग फुल्टनच्या संघाचा हा मलेशियावरील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय ठरला. भारतीय पुरुष हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून इतिहास घडवला. तब्बल ५२ वर्षांनंतर भारताने सलग दोन ऑलिम्पिक स्पर्धेत पदक जिंकण्याचा पराक्रम केला होता.

राजकुमार पालने तिसऱ्या मिनिटाला भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यात ३ मिनिटानंतर अराइजीतने गोल केला. पहिल्या क्वार्टरच्या ८व्या मिनिटाला जुगराज व सुखजित सिंग यांनी पेनल्टी कॉर्नरवर गोल करून भारताची आघाडी ४-० अशी मजबूत केली.



दुसऱ्या क्वार्टरमध्ये हरमनप्रीत सिंग आणि राज कुमार पालने प्रत्येकी १ गोल केले. तिसऱ्या क्वार्टरमध्ये राज कुमार, अराइजीत आणि उत्तम सिंग यांनी प्रत्येकी एक गोल करून भारताचा ८-१ असा विजय पक्का केला. मलेशियाकडून अनुअर अखिमुल्लाहने गोल केला. भारतीय खेळाडूंनी या संपूर्ण सामन्यात वर्चस्व गाजवले आणि आता १२ सप्टेंबरला त्यांच्यासमोर दक्षिण कोरियाचे आव्हान असणार आहे. भारत सलग तीन विजय मिळवून तालिकेत अव्वल स्थानावर आहे. आशियाई हॉकी चॅम्पियन ट्रॉफी स्पर्धेच्या इतिहासात भारतीय पुरुष हॉकी संघाने वर्चस्व गाजवले आहे.

## सेरेन स्ट्रायकर्स, फाल्कन्स् क्रिकेट क्लब संघांची विजयी कामगिरी !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब तर्फे आयोजित चौथ्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत सेरेन स्ट्रायकर्स आणि फाल्कन्स् क्रिकेट क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत रोमित जोशी याने फटकावलेल्या १०३ धावांच्या जोरावर सेरेन स्ट्रायकर्सने रायझिंग बॉईज संघाचा २१ धावांनी पराभव करून पाचवा विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना सेरेन स्ट्रायकर्सने २० षटकामध्ये २१८ धावांचे आव्हान उभे केले. रोमित जोशी याने ४६ चेंडूत ११ षटकार आणि ५ चौकारांसह १०३ धावांची खेळी साकारली. या आव्हानाचा पाठलाग करताना रायझिंग बॉईजचा डाव १९७ धावांवर मर्यादित राहीला. पीटर वॉल्टर याने ६१ धावांची तर, राहूल कुशवा याने ४२ धावांची खेळी केली.





प्रविण गायकवाड याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे फाल्कन्स् क्रिकेट क्लबने स्पाटर्न्स क्रिकेट क्लबचा ११७ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळताना फाल्कन्स् क्रिकेट क्लबने प्रविण गायकवाड (५२ धावा), मेघराज निकम (नाबाद ५१ धावा), नितीन कुचेकर (४८ धावा) आणि आदित्य जगताप (नाबाद ४४ धावा) या खेळाडूंच्या फलंदाजीमुळे २० षटकामध्ये २५३ धावांचा डोंगर उभा केला. या लक्ष्याचा पाठलाग करताना स्पाटर्न्स क्रिकेट क्लबचा डाव १३६ धावांवर गडगडला. रोहीत शिंदे याने ४१ धावांची तर, अमित देशपांडे याने २३ धावांची खेळी केली. फाल्कन्स्च्या मीत कारीया याने ३४ धावात ३ गडी तर, प्रविण गायकवाड आणि प्रथमेश महाडीक या दोघांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

## पीआर श्रीजेश यांचे पीएम मोदींनी पत्र लिहून केले अभिनंदन

**नवी दिल्ली :** देशाचे हॉकीला अलविदा करणारा गोलकीपर पीआर श्रीजेश याने अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून मिळालेले एक पत्र सोशल मीडियावर शेअर केले आहे, ज्यामध्ये पंतप्रधानांनी त्यांच्या खेळातील योगदानाचे कौतुक केले आहे.



नवीन राष्ट्रीय ज्युनियर प्रशिक्षक म्हणून तो तितकाच प्रभावी ठरेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. टोकियो ऑलिम्पिकनंतर पॅरिसमध्येही कांस्यपदक जिंकल्यानंतर श्रीजेशने हॉकीमधून निवृत्ती घेतली. भारतीय हॉकीची भिंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 36 वर्षीय श्रीजेशने आशियाई क्रीडा स्पर्धेतही दोन सुवर्णपदके आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दोन रौप्यपदके पटकावली आहेत. हॉकी इंडियाने त्यांना कनिष्ठ संघाचे नवे मुख्य प्रशिक्षक बनवले आहे. पंतप्रधान मोदींनी पत्रात लिहिले आहे की, 'मला विश्वास आहे की, तुमच्या नव्या भूमिकेत तुमचे काम तितकेच प्रभावी आणि प्रेरणादायी ठरेल.' पंतप्रधान मोदींनी १६ ऑगस्ट रोजी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'तुम्ही खेळातून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे आणि भारतीय हॉकीमधील तुमच्या अतुलनीय योगदानाचे मी मनापासून कौतुक करतो.'

## अव्वल असूनही इंडियाचे फायनलमधील स्थान पक्के नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जागतिक अजिंक्यपद स्पर्धा २०२३-२५ ची फायनल लॉर्ड्सवर खेळवली जाणार आहे. या स्पर्धेतील १२ मालिका अजून बाकी आहेत आणि गेल्या WTC Final मध्ये पोहोचलेले भारत आणि ऑस्ट्रेलिया हे सध्या आघाडीवर आहेत. मागील WTC मध्ये ऑस्ट्रेलिया आणि भारत हे अनुक्रमे ६६.६७ आणि ५८.८ टक्के गुण मिळवून फायनलमध्ये पोहोचले होते. अशा परिस्थितीत यंदाच्या WTC च्या अंतिम फेरीच्या शर्यतीत असलेल्या सर्व संघांना किमान ६० टक्के गुण मिळवावे लागणार आहे. श्रीलंका ४२.८६ टक्के गुणांसह अजूनही शर्यतीत आहेत.




इंग्लंडविरुद्धच्या मागील कसोटीत विजय मिळवल्यानंतर त्यांची शक्यता बळावली आहे. श्रीलंकेला उर्वरित मालिकेत न्यूझीलंड (घरच्या मैदानावर दोन कसोटी सामने), दक्षिण आफ्रिका (घरच्या मैदानावर दोन कसोटी सामने), ऑस्ट्रेलिया (घरच्या मैदानावर दोन कसोटी सामने) या संघाविरुद्ध खेळावे लागणार आहे. त्यांनी उर्वरित सर्व सामने जिंकले, तर ते अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित करू शकतात. सर्व सामने जिंकल्यानंतर त्यांचे गुण ६९.२३ टक्के होतील आणि अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी हे पुरेसे असू शकते. सहापैकी पाच सामने जिंकल्यास ते ६१.५४ गुणांपर्यंत पोहोचू शकतील, ज्यामुळे ते अंतिम फेरीच्या शर्यतीत कायम राहतील.


इंग्लंडचे ४२.१९ टक्के गुण आहेत आणि उर्वरित मालिकेत त्यांना पाकिस्तान ( ३ कसोटी अवे) व न्यूझीलंड ( ३ कसोटी अवे ) यांचा सामना करायचा आहे. ओव्हलवर श्रीलंकेविरुद्ध इंग्लंडचा पराभव म्हणजे या WTC सायकलमध्ये ते आता ६० टक्क्यांचा टप्पा ओलांडू शकणार नाहीत. आता ते जास्तीत जास्त ५७.९५ टक्के गुण मिळवू शकतात. त्यासाठी त्यांना उर्वरित सहा कसोटी सामने जिंकावे लागतील. पण, त्याचवेळी भारताचा पराभव त्यांच्या फायद्याचा ठरू शकतो.

## कर्णधारपदी समर्थ पाटील व आर्या कंधारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गोंदिया येथे २० ते २२ सप्टेंबर २०२४ दरम्यान होणाऱ्या ४३ वी राज्यस्तरीय सब जुनिअर बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेसाठी पुणे महानगर मुलांच्या संघाच्या कर्णधार पदी साधना विद्यालयाचा समर्थ पाटील व मुलींच्या संघाच्या कर्णधार पदी महावीर विद्यालयाची आर्या कंधारे यांची निवड करण्यात आली. पुणे महानगर मुले संघ १) समर्थ पाटील (कर्णधार ) २)मानस सरडे (उपकर्णधार) ३)संघर्ष खरात ४) पवन कचवे ५)आदित्य हनुमंते ६) मिहीर सरडे ७)अथर्व हसरमणी ८) स्वरीत जगताप ९)हर्षद जाधव १०) स्वरित शहा पुणे महानगर मुलींचा संघ १)आर्या कंधारे (कर्णधार) २)इशा आहेर (उपकर्णधार) ३) संघमित्रा खरात ४)पलक जैन ५) समीक्षा खरात ६) दिव्या जोंगरा ७)अक्षरा गांधी ८) स्वरांगी तन्नू ९) कृतज्ञा बरके १०) सानिका व्यवहारे प्रशिक्षक विजय औताडे,मॅनेजर राजू कंधारे यांची निवड करण्यात आली संघांची व प्रशिक्षक मॅनेजर यांची निवड पुणे महानगर बॉलबॅडमिंटन असोशिएशन चे अध्यक्ष .दिलीप आबा तुपे व सचिव .डॉ.सुदाम शेळके यांनी निवड केली असुन संघास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे





### ऑल इंडिया पोलीस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डाची झुंज अपयशी, आरएसपीबीविरुद्धच्या पराभवामुळे आव्हान संपुष्टात

## साई, स्टील प्लांट्स स्पोर्ट्स बोर्ड उपांत्यपूर्व फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) आणि स्टील प्लांट्स स्पोर्ट्स बोर्ड संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवत चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत स्थान पटकावले.

हॉकी महाराष्ट्र आयोजित आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या (पीसीएमसी) सहकार्याने नेहरूनगर-पिंपरी येथील मेजर ध्यानचंद स्टेडियमवर सुरू असलेल्या स्पर्धेत करा किंवा मरा अशा स्वरूपाच्या लढतीत मंगळवारी साईने सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसचा (सीडीटी) ५-१ असा पराभव करून अ गटामध्ये ९ गुणांसह दुसरे स्थान मिळवले. या गटात पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघ अव्वल स्थानी आहे. ललित नेगी (६वे), नीरज (२८वे), पंकज (३८वे - पीएस, ५३वे - पीसी) आणि रजत मिंज (५४वे) यांनी साईकडून गोल केले. सीडीटीकडून केवळ नचप्पा याला (४४ व्या) गोल करता आला. स्टील प्लांट्स स्पोर्ट्स बोर्ड संघाने ब गटात दुसरे स्थान मिळवले. गटातील शेवटच्या लढतीत देना बँकेने लेट गोलच्या जोरावर त्यांच्याविरुद्ध ३-३ अशी बरोबरी साधली. प्रधान सोमन्ना पुडियोक्काडा सोमय्याने पेनल्टी कॉर्नरचे गोलात रूपांतर करताना देना बँकेला एक गुण मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. तत्पूर्वी, चंदा अय्यान्ना निक्किन थिम्मय्या (चौथा) आणि सोमन्ना किमीने (३३वा) गोल केले होते. स्टील प्लांट्स स्पोर्ट्स प्रमोशन बोर्डकडून दिलबर बार्ला (५वे); बारा रबी (५३वा) आणि अब्दुल कादिरने (५५वा) गोल केले.



देना बँकेविरुद्धच्या बरोबरीनंतरही स्टील प्लांट्स स्पोर्ट्स बोर्डने ४ सामन्यांतून ७ गुणांसह गटात दुसऱ्या स्थानासह आगेकूच केली.

ब गटात उपांत्यपूर्व फेरीसाठी आधीच पात्र ठरलेल्या रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाला (आरएससीबी) ऑल इंडिया पोलीस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डाची संघाने (एआयपीएससीबी) चांगलेच झुंजवले.

#रा